# आनंदलहरी

## संत संग

श. दि. नागले

।। श्री गणेशदत्तरेणुकादेवी प्रसीदताम् ।।

# संतसंग

## प.पू.दत्तमहाराज कवीश्वर यांची प्रवचने

संकलन

श्री. गोपाळ गोडसे

संपादन

डॉ.सौ.माधुरी पणशीकर

प्रकाशक

श्री भगवती प्रकाशन

सर्व हक्क प्रकाशकाचे स्वाधीन



प्रकाशन दिवस
श्रीराम नवमी, चैत्र शु. ९
शके १९१६
रविवार, ९ एप्रिल, १९९५.

मुखपृष्ठ
आमोद दामले

मुद्रक
के.जोशी अँड को.
सदाशिव पेठ, भिकारदास मारुतीमंदिराजवळ
पुणे४११०३०. फोन.४७१४०९

प्रकाशक
श्री भगवती प्रकाशन
६/१, साईविहार,कर्वेनगर,
पुणे-४११०५२. फोन.३६९०६०

किंमत रु- १७/-




प. पू. दत्तमहाराज कवीश्वर

जो ब्रह्मज्ञान उपदेसी। अज्ञानअंधार निरसी।
जीवात्मया परमात्मयासी। ऐक्यता कारी॥
विघडले देव आणि भक्त। जीव शिवपणें द्वैत।
तया देवभक्ता येकांत। करी तो सद्‍गुरु॥

जेथें सारासार विचार। तेथ होय जगोध्दार।
नवविधाभक्तीचा आधार। बहुत जनांसी॥
म्हणोनी नवविधा भजन। जेथे प्रतिष्ठिलें साधन।
हें सद्‍गुरूचें लक्षण। श्रोतीं वोळखावे॥


तो बहुतांचा पाळणकर्ता। त्यास बहुतांची असे चिंता।
नानासाधने समर्था। सद्‍गुरूपासीं॥
अंतरी शुध्द ब्रह्मज्ञान। बाह्य निष्ठेचे भजन।
तेथे बहु भक्त जन। विश्रांति पावती॥

ओम् नमो सद्‍गुरु तूं ज्योतिषी। एकात्मतेचे घटित पाहसी।
चिद्‌ब्रह्मेंसीं लग्न लाविशी। ओम् पुण्येंसीं तत्त्वतां॥
वधूवरां लग्न लाविती। हें देखिलें असे बहुतीं।
आपुली आपणा लग्नप्राप्ती। हे अलक्ष्य गती गुरुराया॥


ओम् नमो सद्‍गुरु धन्वंतरी। ज्याची दृष्टीचि निरुज करी।
त्यावांचोनि संसारीं। भवरोगु दुरी न करवे।
ज्या भवरोगाचेनि दर्पे। फुंफात तापली त्रिविधतापें।
'मी माझें' येणें संकल्पें। वाग्जल्पें जल्पती॥

जय जय सद्‍गुरु परम। जय जय सद्‍गुरु पुरुषोत्तम।
जय जय सद्‍गुरु परब्रह्म। ब्रह्मा ब्रह्मनाम तुझेनी॥
जय जय सद्‍गुरु चिदैक्यस्फूर्ती। जय जय सद्‍गुरु चिदात्मज्योति।
जय जय सद्‍गुरु चिन्मूर्ती। मूर्तामूर्ती चिद्रूप॥


श्री सद्गुरु मांदियाळी




श्री दत्तात्रेय



पू. श्रीपादश्रीवल्लभ



पू. नृसिंह सरस्वती



पू. वासुदेवानंद सरस्वती

॥ गुरो तुझी ही पदवारीधारा । धुवो सदा कायिक दोष सारा ॥

# अनुक्रम


| | | |
|---|---|---|
| १. | देव सान्निध्य | १ |
| २. | ततः किम् | ८ |
| ३. | संत संग देई जरा | ३५ |
| ४. | सततं कीर्तयंतो मांम | ६१ |
| ५. | नामस्मरणाचे महत्व | ६९ |

## आगामी प्रकाशने-

श्रीमद् भागवत

द्विसाहस्त्री चिंतनात्मक टीका

विवेक चूडामणी भाष्य

श्रीकृष्ण चरित्र

विविध विषयांवरील प्रवचने

## प्रकशित झालेली पुस्तके-

दैवी संपदा (प्रवचने)

द्विसाहस्त्री भाग १ व २ (गुरुचरित्र)

चांदणे कैवल्याचे (प्रवचने)

नारायणी नमोस्तुते (श्री देवी भागवत)

# आवाहन


*सदर पुस्तकातील प्रवचनांच्या ध्वनिफिती उपलब्ध करुन दिल्याबद्दल व ती प्रवचने छापायला परवानगी दिल्याबद्दल श्री भगवती प्रकाशन श्री. मोरेश्वर चऱ्होलीकर उर्फ कीर्तनकार श्री चऱ्होलीकर बुवा, श्री मयुरेश्वर मंदीर कर्वेनगर पुणे यांचे अत्यंत आभारी आहे.*

*प.पू. दत्तमहाराजांचे अक्षर वाङमय अक्षररुपात आणण्याची श्री भगवती प्रकाशनाची इच्छा आपणा सर्व सज्जनांच्या मदतीमुळे फलद्रूप होणार आहे. ही मदत आर्थिक रुपात अपेक्षित नाही तर शब्दरुपाने आहे. प.पू.महाराजांचे शब्द आपल्याकडे कोणत्याही स्वरुपात उपलब्ध असतील उदा.ध्वनिफीत, चित्रफीत, पत्रव्यवहार, लिहून काढलेली प्रवचने इ. तर ते वाङमय श्री भगवती प्रकाशनाला छापण्याकरता उपलब्ध करुन देण्याबद्दल जाहीर आवाहन आम्ही आपल्याला करत आहोत. सर्वांचे कल्याण साधणारे प.पू. महाराजांचे शब्द जास्तीत जास्त लोकांपर्यंत पोहोचण्यास आपली मदत झाल्यास ते एक पुण्यकर्म ठरुन, ईश्वर त्याचे फल आपणांस देण्यास समर्थ आहे. तरी आपणापैकी ज्या सज्जनांकडे असे वाङमय उपलब्ध असेल त्यांनी ते आमच्याकडे त्वरित पाठवल्यास आम्ही आपले अत्यंत ऋणी राहू.*


*चऱ्होलीकर घराण्याबद्दल प.पू. दत्तमहाराजांनी काढलेले गौरवोद्गार-*

*'भगवान मंगलमूर्तींची उपासना यांच्या घराण्यामध्ये आहेच आहे. लहानपणापासून त्यांना संत महात्म्यांची संगती घडली आहे. धारवाडलाही शंकराचार्य पाठशाळेत ह्यांचा निवास होता. मुद्दाम इतक्या लांबून ते आले होते. आम्ही कांही मंडळी विद्यार्थी म्हणून तिथे होतो. पूर्वीपासून त्यांचे अध्ययन चालू आहे. इथे आल्यापासून कीर्तनाचा त्यांनी उत्तम व्यासंग केला. रोज पवमान पठण, अभिषेक ते करत होते. ते सदाचार संपन्न असून कीर्तनद्वारा त्यांनी भगवत् भक्तीचा प्रसार केला. अनेक कीर्तनकारांचा सहवास त्यांना लाभला. त्यांनी ह्या कीर्तनकारांकडून मिळालेले शिक्षण लिहून ठेवले आहे. त्यांचे चिरंजीव, नातूही हळू हळू ह्यात पुढे येत आहेत. नवविधा भक्तीपैकी कीर्तन ही भक्तीच आहे. शुक्राचार्य महाराजांनीही कीर्तन केले आहे. तर भगवान् मंगलमूर्तींनी आपल्या घरात येऊन राहावे अशी ह्यांना इच्छा उत्पन्न झाली. तळमळीने केलेला संकल्प भगवंताच्या कृपेने पूर्ण झालेला आहे. मंगलमूर्तींची स्थापना या ठिकाणी झाली. देवावर सर्व भार घालून उपासक निश्‍चिंत मनाने राहिला म्हणजे सगळे कार्य होते.'*


## श्री सद्गुरु मांदियाळी



पू. लोकनाथतीर्थ स्वामी



पू. दीक्षित स्वामी



पू. गुळवणी महाराज



पू. धुंडिराज महाराज

॥ सदैव माझे मन वाणी शुध्द । करो तुझे नाम पवित्र सिध्द ॥

ओम् नमो जी श्रीगुरुराया। म्हणोनि सद्भावें लागें पायां।
तवं मीपण गेलें वायां। घेऊनियां तूंपणा॥
नवल पायांचें कठिणपण। वज्रें न तुटे लिंगदेह जाण।
त्याचेंही केलें चूर्ण। अवलीळा चरण लागतां॥

ओम् नमो श्रीगुरु शिवशिवा। नमनें जीवत्व जीवा।
नुरविसी, तेथें देहभावा। कैसेनि रिघावा होईल॥
जीवें घेऊनि जीवा। देहत्व मोडूनि देहभावा।
याहीवरी करविसी सेवा। हें लाघव देवा नवल तुझें॥

एवं स्वस्वरूप द्यावयासी। उदारत्व तुजपासीं।
हें न ये गा आणिकांसी। हृषीकेशी कृपाळुवा॥
तो तूं परम उदार ऐसा। राया रंका समभावें सरिसा।
भावो तेथ भरंवसा। तू आपैसा आतुडसी॥



प. पू. ताईमहाराज चाटुफळे

'जागृती ' जागे तुझेनि हरिखें। ' स्वप्न ' स्वप्ना तुझेनि देखे।
' सुषुप्ती ' सुखावे जेणें सुखें। पूर्ण संतोखें तुझेनि ॥
मी जे जे ' विषय ' भोगीं। तें भोक्तेपण तुझे अंगी।
तुझेनि निजसंयोगीं। मी पणें जगीं वर्तविशी मज ॥

सुखेंचि तुझें नाम घेतां। घातु करिसी जीविता।
जीवु घेऊनि तत्त्वतां। होसी सर्वथा कृपाळू ॥
तुझे नामाचें प्रबळ बळ। माथा नुधविती कळिकाळ।
चारी मुक्ति केवळ। होती निश्चळ निजदासी ॥

आतां सद्गुरु वर्णवेना। जेथे माया स्पर्शो सकेना।
ते स्वरूप मज अज्ञाना। काय कळे ॥
न कळे न कळे नेति नेति। ऐसें बोलतसे श्रुती।
तेथें मज मूर्खाची मती। पवाडेल कोठे ॥

## श्री गणेशदत्त गुरूभ्योनमः

**परमेश्वरीकृपेने** एक सुखद योगायोग घडला. लोकनाथतीर्थ स्वामीमहाराजांच्या उत्सवाच्या वेळी (फेब्रुवारी१९९५) श्रीचऱ्होलीकरबुवांची वासुदेव निवासात कीर्तने होती. पहिल्या दिवशी कीर्तन झाल्यावर बुवांची भेट झाली तेव्हां त्यांनी आपणहून सांगितले की त्यांच्याजवळ प.पू.दत्तमहाराजांच्या प्रवचनांच्या काही ध्वनिफिती असून त्या ते देऊ इच्छितात.

नंतर त्यांनी दिलेल्या ध्वनिफितीविषयी कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी मी त्यांच्या घरी गेले तेव्हां प.पू महाराजांच्या काही आठवणीही त्यांनी सांगितल्या. बुवांच्या घरादाराला जिव्हाळ्याचा, आत्मीयतेचा एक विलक्षण स्पर्श आहे. त्यांनी आणि त्यांच्या सौभाग्यवतींनी त्यांचे घर प.पू.महाराजांच्या कृपेने कसे कसे आकाराला येत गेले ते सांगितले. ते सांगताना त्यांचे डोळे प.पू.महाराजांवरच्या प्रेमाने सारखे ओले होत होते. त्यांच्या कृपेने घर बांधून झाले म्हणून बुवांनी घराचे नांवही 'दत्तनिवास' ठेवले आहे. त्यांचे वडील कीर्तनकार आहेत म्हणजे कीर्तनाचा वारसा त्यांच्याकडे परंपरेने चालत आला आहे. वासुदेव निवासच्या पहिल्या उत्सवात बुवांच्या वडिलांचे कीर्तन झाले. ते मृत्युंजयाचा जप करून योगिराज गुळवणी महाराजांना अंगारा देत असत असेही त्यांच्या बोलण्यात आले. स्वतः बुवांचे पहिले कीर्तन इयत्ता सहावीत असताना रामनवमीला झाले. त्यांच्या घराच्या पुढच्या भागात गणपती मंदिर आहे. किंबहुना मंदिरात घर आहे असे म्हटले तर अधिक योग्य होईल. प.पू. महाराजांनी त्या मंदिरात जाऊन मयूरेश्वराचे दर्शन घेतले आणि ' इथे सिध्दीबुध्दिपति

बसलेला आहे, काही काळजी करु नका ' असे निघतांना उद्गार काढले.

**'संतसंग'** ह्या पुस्तकातली प्रवचने श्री. चऱ्होलीकरबुवांच्या ह्या गणेशमंदिरातली आहेत. ती त्यांनी उपलब्ध करुन दिल्याबद्दल त्यांचे विशेष आभार.

प्रस्तुत पुस्तकातल्या प्रवचनांचे विषय वेगवेगळे आहेत. त्यात एक शंकराचार्यांच्या 'ततः किम्' ह्या श्लोकरचनेवर प्रवचन आहे. आचार्य हा प.पू. महाराजांच्या प्रेमादराचा विषय! अवैदिक पंथोपपंथाचे प्राबल्य भारतात वाढत चाललेले असतांना आचार्यांनी वैदिक धर्माची धुरा खांद्यावर उचलून धरली. उपनिषदे गीता आणि ब्रह्मसूत्रे ह्या प्रस्थानत्रयीवर भाष्य करुन वैदिक धर्माला बळकट आधार दिला. ' एक आत्मवस्तूच तेवढी सत्य आहे' असे प्रतिपादन करणाऱ्या आचार्यांनी भक्तीत रममाण होऊन स्तोत्र रचनाही केली. 'ततः किम्' हा त्यांनी विचारलेला प्रश्न अत्यंत भेदक आणि खडबडून जागे करणारा असा आहे. 'सुंदर पत्नी आहे, धन धान्य, संपत्ती सर्व आहे, पण पुढे काय?' ह्या त्यांच्या रचनेवर सुलभ भाष्य प.पू.महाराजांनी केले आहे.

'कीर्तना' विषयी सांगताना प.पू.महाराज म्हणतात की कीर्तन म्हणजे केवळ शाब्दिक बडबड नाही तर कीर्तन करणाऱ्याची प्रवृत्ती भक्तीप्रधान झाली पाहिजे. मनुष्याची वृत्ती बदलावी आणि बुद्धि निर्दोष व्हावी ह्यावर त्यांचा सतत भर असतो. आपली बुद्धि सदोष असते, भगवंताच्या भक्तीने तिच्यातले दोष दूर होतात हे प्रतिपादन करतांना ते म्हणतात,'निर्दोष फक्त परमात्मा आहे म्हणून सर्वांच्या बुद्धीत उत्पन्न झालेला दोष तोच दूर करुन शकतो.' संतसंगतीचे महत्वही त्यांनी वेळोवेळी सांगितले आहे. संत हे परमेश्वराचेच अवतार आहेत ही प.पू. महाराजांची भूमिका



आहे. 'महापुरुषांच्या सहवासाने बुद्धीत बदल घडतो' हे त्यांचे सातत्याने प्रतिपादन असते.

प.पू. महाराजांचे आचरण शास्त्राधिष्ठित असते. शास्त्राने सांगितलेल्या मार्गानेच त्यांचे प्रत्येक पाऊल पडते. एका प्रवचनात त्यांनी म्हटले आहे की 'शास्त्र म्हणजे ईश्वराची आज्ञा आहे' ईश्वराला जे जे प्रिय ते ते महाराजांना प्रिय आहे. शास्त्र विरुद्ध वर्तणूक ईश्वराला संमत नाही आणि महाराजांनाही संमत नाही.

नामस्मरणात रमून जाणे, मन निर्वासन होणे महत्वाचे आहे. हा त्यांच्या प्रतिपादनात नेहमीच येणारा विषय आहे. एकदा आश्रमात सकाळी त्यांच्याशी काही बोलत असतांना ते म्हणाले,'ईश्वराकडे काय मागावं? कोणतं दान मागावं? तर 'कोणाही जीवाचा न घडो मत्सर' हे दान मागावं' वरवर विचार करता सोपे वाटणारे हे मागणे तितके सोपे नाही, हे खोल विचार करतांना ध्यानात येते. कारण लौकिक जगात स्पर्धात्मकता इतकी जबरदस्त आहे की 'मी मी' म्हणणारे ह्या स्पर्धेला आणि मत्सराला बळी पडतात. आणि दुसऱ्याचा मत्सर केव्हा वाटणार नाही? तर सर्वत्र एकच चैतन्य कोंदाटून भरले आहे याची खऱ्या अर्थाने जाणीव होईल तेव्हा! म्हणजे वास्तविक त्या चैतन्याचा विचार, उपासना,नामस्मरण सतत करायला हवे. तथापि आपल्याला हे लौकिक जगच खरे वाटत असते. ह्या संदर्भात एकदा महाराजांना विचारले की,' ज्ञानेश्वरीच्या तेराव्या अध्यायात शेवटी भगवंत असं सांगतात की ' देहाचा आणि माझा संबंध नाही. तो संबंध आहे असं म्हणणं म्हणजे अग्नि आणि पाणि किंवा वारा आणि वाळू यांची गाठ घालण्यासारखं आहे' ह्याचं काही स्पष्टीकरण करता येईल का?' यावर महाराजांनी उत्तर दिले की,' बरोबर आहे, चैतन्य असंग, निर्विकार आहे

ना!'यावर मी विचारले की,'तसं असेल तर आपण चालतो बोलतो हे कोणाच्या सत्तेने?' ह्यावरचे महाराजांचे उत्तर लौकिकातून आपल्याला बाहेर काढून अगदी वेगळ्या पातळीवर नेणारे आहे. ते म्हणाले,' भागवतातही त्या जडभरताने हाच प्रश्न केला. तो म्हणाला आम्ही अग्नि लावतो, पाणी उकळत ठेवतो, तांदूळ शिजवतो, भात खातो त्याने आमची तृप्ती होते, हे सर्व खोटे कसे मानायचे? यावर त्याला उत्तर मिळाले की तू हे प्रश्न करतोस कारण तू हे सर्व खरं आहे असं मानतोस. पण ज्ञान दृष्टीने पहाणाऱ्याला हे काही नाहीच आहे. 'अगा जे झालेची नाही । तयाची वार्ता पुससी काही।।'

प.पू. महाराज म्हणजे ज्ञानसागर आहेत. त्यांच्या सहवासात, त्यांच्याशी बोलतांना, त्यांचे शब्द ऐकतांना जे आनंदतरंग मनात उमटतात, त्याचे वर्णन शब्दातीत आहे.

रामनवमी हा ती. सौ. ताईमहाराजांचा वर्धापन दिन. त्यांचा अध्यात्माच्या क्षेत्रातला अधिकार सर्वज्ञात आहे. त्यांना आणि त्यांच्या कुटुंबियांना ह्या निमित्ताने हार्दिक शुभेच्छा. त्यांना दीर्घायुरारोग्य लाभो ही श्रीरामांच्या चरणी प्रार्थना.

महाभारतात 'धर्मश्र्च सूक्ष्मो निपुणोपलभ्यः' म्हणजे धर्म गहन असून ज्ञानी पुरुषांकडून त्याचा निर्णय करावा लागतो असे म्हटले आहे. प.पू. महाराजांच्यासारख्या संतांच्या आचरणातून, वर्तणुकीतून तो सिद्ध होत असतो. अशा ज्ञानी सद्गुरुंना मनःपूर्वक प्रणाम!

डॉ.सौ. माधुरी पणशीकर,
११,गुडविल बिल्डिंग,मनमाला टँक रोड,माहीम, मुंबई-१६



# देव सान्निध्य

**वक्रतुंड महाकाय सूर्यकोटी समप्रभ**
**निर्विघ्नं कुरुमे देव सर्व कार्येषु सर्वदा ।।**

**भगवान** सिध्दी बुद्धीपति मंगलमूर्तींच्या कृपेने या ठिकाणी एक स्थान निर्माण झाले. त्यांचा निवास याठिकाणी झाला. निर्गुण निराकार परमात्मतत्व आहे. वेदांत शास्त्राचा सिध्दांतही तसा आहे. तरीसुध्दा सगुण साकार भगवंतांची भक्ती ज्ञानी महात्मेही करीत असतात.

जीवन असेपर्यंत रोज थोडेतरी वेदांताचे चिंतन घडले पाहिजे, सद्गुरुंची सेवा आणि ईश्वराची उपासना घडली पाहिजे. अज्ञानदशेमध्ये या उपासनेचे फल म्हणजे "ज्ञान" प्राप्त होते. आणि "ज्ञान" ज्यांच्या कृपेने झाले त्यांच्याबद्दल पुढे कृतघ्नता येऊ नये. याकरता नंतरही उपासना चालू राहिली पाहिजे. अशी शास्त्राज्ञा आहे.

भगवंताचीही स्तुती केली आणि भगवत् भक्ताचीही स्तुती करताहेत, आचार्य महाराज. भगवान् प्रसन्न झाल्यावर जगामध्ये अलभ्य कांही नाही असं आचार्य महाराज म्हणतात. परंतु भगवत् भक्त हे कांही मागत नाहीत. ही दुसरी बाजूही त्यांनी सांगितली.

भगवंताचे अखंड चिंतन राहावे अशी ज्यांना खरी इच्छा आहे, निर्वासन ज्यांचे मन झालेले आहे ते देवाजवळ काहीही इच्छा करत नाहीत, मागत नाहीत, म्हणतात. मागितल्याशिवाय देव देतात हेही खरे आहे. सुदामजींना त्यांनी दिले. पत्नीच्या आग्रहावरून सुदामजी निघाले. अगोदर दोन चार वेळेला पत्नीने आग्रह केला," जाऊन या, जाऊन या ; ते तुमचे मित्र आहेत, द्वारकेचे राजे. तुम्हाला पुष्कळ धन मिळेल." भगवान् गोपालकृष्णांबरोबर ज्यांचे अध्ययन झाले त्यांचा अधिकार केवढा मोठा असला पाहिजे. तेव्हां निरिच्छ वृत्तीने राहाणारे सुदामजी पत्नीच्या इच्छेवरून द्वारकेला जायला निघाले. पत्नीने जरी सांगितले तरी जाताना त्यांच्या मनांत असे विचार आले नाहीत की श्रीकृष्णांना भेटलो म्हणजे पुष्कळ धन, संपत्ती मिळेल. त्या ' उत्तम श्लोकाचे' (श्रीकृष्णांचे)दर्शन मला आज पत्नीच्या आग्रहामुळे घडणार आहे हा मोठा लाभ आहे.निघताना अशी वृत्ती आहे.

भगवंतांचे द्वारकेत पोहोचल्यावर दर्शन झाले, भेट झाली. भगवान् गोपालकृष्णांनी अत्यंत प्रेमाने, आदराने त्यांची पूजा वगैरे केली. आपल्या गुरूमहाराजांच्या घरी असताना काय काय झाले त्या आठवणींबद्दल रात्रभर बोलत बसले. आणि दुसऱ्या दिवशी सकाळी निघून आले. सुदामजींनीही कांही मागितले नाही. श्रीकृष्णांनीही कांही दिले नाही. परंतु सुदामजींच्या मनाची भूमिका अशी होती की भगवंतांनी द्रव्य मला दिले नाही याबद्दल गोपालकृष्णांच्याबद्दल मनामध्ये अनादर नव्हता. घरी गेल्यानंतर पत्नी मला आता काय विचारेल आणि गोपालकृष्णांची निंदा जर ती करायला लागली तर! तुकाराम महाराजांची पत्नी विठ्ठलाची निंदा करीत असे असं लोक सांगतात. आता ती तिची भक्ती होती की काय (सांगणार?) भक्तीचे अनेक प्रकार



आहेत.

तर सुदामजींच्या मनांमध्ये ते काहीही विचार नव्हते. हा जन्मापासून दरिद्री असलेला ब्राह्मण. देव दयाळू आहे. मला त्याने धन दिले नाही याचा अर्थ त्याची दया माझ्यावर आहे. या दरिद्री बाह्मणाला जर द्रव्य मिळाले तर याला अहंकार होईल. मदामध्ये याचे सगळे आयुष्य जाईल. मला विसरून जाईल. माझे विस्मरण ह्याला होऊ नये असे देवाने मनामध्ये आणलेले आहे. ही त्याची केवढी दया आहे. असे सुदामजींना वाटले.

तेव्हां अशाप्रकारचे अधिकारी महात्मे होऊन गेले. काहीही देवाजवळ मागायचे नाही अशी त्यांची वृत्ती होती. परंतु काहीतरी सेवा घडावी अशी मनामध्ये तळमळ आहे. समर्थांनी सांगितल्याप्रमाणे

**सत्कर्म योगे वय घालवावे ।**

हे वैयक्तिक आहे. संपूर्ण आयुष्यामध्ये सत्कर्मच घडली पाहिजेत. देहाने, इंद्रियांनी, मनाने, वाणीने सगळी सत्कर्म घडली पाहिजेत आणि त्याच्या बरोबरच

**सर्वा मुखी मंगल बोलवावे ।**

अशी एक इच्छा असते. आपल्याकडून भगवंतांची सेवा घडत असताना इतरही मंडळींचा सहभाग असावा, इतरही मंडळी इच्छा करणारी असली तर त्यांनाही सेवा करता यावी हे सात्विक लक्षण आहे. धनाचा विभाग करणं, आपल्याप्रमाणे इतरांनाही उपासना घडावी, त्यांचेही कल्याण व्हावे अशी इच्छा त्यांच्या

मनामध्ये आली. भगवंतांनीही ती मान्य केली. आणि त्यांचा निवास याठिकाणी झालेला आहे. तो अखंड निवास होण्याकरता पूजा, अर्चा वगैरे हेही कारण आहे.

आवाहन देवाचे झालेले आहे. देवाचे अखंड सान्निध्य होण्याकरता अर्चन जे आहे तेही व्यवस्थित चालू पाहिजे. श्रद्धेने चालू पाहिजे. हे अर्चकाचे गुण आहेत. जास्तीत जास्त अखंड अर्चन व्हावे. उत्सव, महोत्सव वगैरे व्हावेत असेही भगवंतांनी उध्दवजींना उपदेश करताना सांगितले आहे. म्हणजे भगवंतांचे सान्निध्य त्याठिकाणी निरंतर असते आणि देवाचे सान्निध्य आहे त्याठिकाणी दैवी संपत्तीही आपोआप मिळते. सध्या दैवी संपत्ती काय असते, कशी असते, त्याचा उपयोग काय आहे याची सर्वसाधारण माणसाला कल्पनाच नाहीये. भारत राष्ट्र म्हणजे दैवी संपत्तीने परिपूर्ण भरलेले असायचे. ती सगळी दैवी संपत्ती हळूहळू कमीकमी होत चालली. देव सान्निध्याचा उपयोग म्हणजे दैवी संपत्तीचा लाभ, तसे जे अधिकारी महात्मे असतील त्यांना होतो. आणि त्यांच्या द्वाराने इतरत्रही त्या दैवी संपत्तीचा प्रसार होतो. तो प्रसार झाला पाहिजे. मनामध्ये येणारे दुर्विचार दूर झाले पाहिजेत. आणखी सर्वांची मनं शुद्ध, पवित्र झाली पाहिजेत.

देवाने येऊन राहायचं कुठं ? शुद्ध मन झाल्याशिवाय त्या मनामध्ये देवाचे वास्तव्य होणार नाही. तेव्हां या दृष्टीने भगवान् मंगलमूर्तींचे या ठिकाणी जे आगमन झाले आहे ते उपासकांच्या तळमळीमुळे झाले आहे. त्यांचे अर्चन श्रद्धेने अखंड चालू राहिल्यानंतर त्यांचे सान्निध्य अखंड होणार आहे. आणि देवाच्या सान्निध्याचा उपयोग म्हणजे दैवी संपत्ती निर्माण होणार आहे. त्याची सध्या जरूर आहे. बाह्य संपत्ती पुष्कळ मिळेल. परंतु त्या बाह्यसंपत्तीपेक्षा दैवी संपत्ती ही महत्वाची आहे. ती मोक्षदायी



आहे असे भगवान् सांगतात.

भारतामध्ये अशा रितीने गणेश, देवी, शैव, उपासक वगैरे निरनिराळ्या परंपरा चालू आहेत. त्यांचीही स्थाने आहेत. गणेशाचे स्वरूप जसे ईश्वररूप आहे तसे गुरूस्वरूपही आहे. सद्‌गुरूमूर्तीमध्ये गणेश, अग्नि आणि महाविष्णू या तिघांचा समन्वय झालेला आहे, असे शास्त्रकार सांगतात. त्याप्रमाणे गणेश हे सद्‌गुरूरूपही आहेत. म्हणजे ज्ञानदान देणारे आहेत.

भगवान् गोपालकृष्णांनी जन्माला आल्यापासून आपली ईशशक्ती जिकडे तिकडे वापरली. ज्ञानाची इच्छा करणारा त्यांना कोणी मिळाला नाही की काय असे कांही म्हणता येणार नाही. एक उद्धवजींना शेवटी त्यांनी आपला ज्ञाननिधी दिला आणि नंतर ते निजधामाला गेले. संरक्षण करणारा पाहिजे कोणी तरी. एवढं त्यांना पहावं लागलं. अर्जुनाला ज्ञान दिलं. मोह त्याचा तेवढा दूर झाला. कर्माधिकारी तो आहे. त्यामुळे त्या कर्माला प्रतिबंधक जो मोह उत्पन्न झालेला होता, अविवेक, तो अविवेक दूर केला. आणि " करिष्ये वचनं तव " ईश्वराची आज्ञा आपण पालन केली पाहिजे. अशी दृढ बुद्धी त्याला झाली. आणि सगळा मोह दूर झाल्यामुळे तो पुढे विजयी झालेला आहे.

तर भगवान् गणेश हे ईश्वररूप आहेत आणि अनेक अवतार त्यांनी धारण करून "परित्राणाय साधूनां विनाशाय च दुष्कृताम्" ही जी अवतार परंपरा ज्याच्याकरता आहे ते कार्य केले. धर्म स्थापना केली. प्रत्येक युगात अवतार धारण केले. त्यांनीच वरेण्य राजाला गणेशगीताही सांगितली आहे. भगवंतांनी जशी अर्जुनाला गीता सांगितली त्याचप्रमाणे गणेशांनी वरेण्य राजाला, जालन्यापासून राजूर नांवाचे एक स्थान १०-१२ मैलावर आहे, तिथे ही गीता सांगितली, अशी आख्यायिका आहे. गणेशांनीही

यात्रमाणे ज्ञानोपदेश केला आहे. आणि तो ज्ञानोपदेश करीत असताना योगाचे लक्षण त्यांनी असे सांगितले.

**शिवेविष्णुंच शक्त्यौच सूर्येमयि नराधिप या अभेद बुद्धी योगःसः।**

हा उत्तम योग आहे. आचार्य महाराजांनी पंचायतन पूजेची स्थापना, उपासना सर्वांना करायला सांगितली. यद्यपि त्यांचा अद्वैत सिध्दांत आहे. परंतु व्यवहार दृष्टीने सर्वांचे कल्याण होण्याकरता, अधिकार वाढण्याकरता, उपासना मार्गही चांगला चालावा म्हणून भगवान् शंकराचार्य महाराजांनी पंचायतन पध्दती चालू केली. सद्गुरु वासुदेवानंद सरस्वती स्वामी महाराज हेही त्या संन्यास परंपरेतलेच आहेत. त्यांची दत्तात्रेय उपासना आहे पण आचार्य महाराजांच्या प्रमाणे त्यांनी सर्वही देवतांवर स्तोत्रे केलेली आहेत. सर्वत्र एक परमात्मा आहे, ही अभेद बुद्धी आहे. ही अभेद बुद्धी अंतःकरणामध्ये राहाणं हाच मुख्य योग आहे असं भगवान् गणेश वरेण्य राजाला सांगताहेत. अभेद बुद्धी असल्यानंतर एक शक्ती आहे. ईश्वर हा एकच मानायला पाहिजे. असं तर्कशास्त्रकार सांगताहेत ना ! सर्वोच्च शक्ती एक असली पाहिजे. राष्ट्रपती दोन असू शकत नाहीत. एकच असतो. मतभेद होऊ नयेत. हाही उद्देश असेल. तसं आणखी परमात्मा एक आहे ही ज्यांच्या अंतःकरणामध्ये भावना आहे, भेद नाहीये परंतु ज्यांचे चरित्र ऐकल्याबरोबर अंतःकरण द्रुत होतं आहे ती उपासना करायला हरकत नाही असंही सांगितलंय.

अप्पय्या दिक्षितांनी सांगितले, पुरारी किंवा मुरारी एकच आहे हे मला माहित आहे. पण माझं प्रेम त्या चंद्रचुडावर आहे.



ते योग्य आहे. त्याप्रमाणे भारतामध्ये भगवान गणेशाची उपासनाही पुष्कळ ठिकाणी चालू आहे. भारत राष्ट्राचा बुद्धिविकास हा मुख्य आहे. तो व्हायला पाहिजे. ज्ञानेश्वर महाराजांनी ज्ञानेश्वरीच्या शेवटी जे पसायदान मागितले आहे. त्यात हा बुद्धिविकास मांडला आहे. बुद्धिविकास म्हणजे राष्ट्राचा खरा विकास आहे. धनाचा विकास कमी जास्त होतो. मोठी मोठी राष्ट्रं आज निःसत्व स्थितीला आलेली आपण पहातो आहोत. भगवान गणेश हे सिद्धिबुद्धीपति आहेत. बुद्धीला प्रेरणा करणं आणि कार्यसिद्धि करणं ही शक्ती त्यांची आहे. त्यांच्या कृपेने भारत वर्षाचा बुद्धिविकास व्हावा. हा खरा विकास आहे. महात्म्यांनी भक्तीचे संरक्षण केले आहे. भक्तीची परंपरा जपली आहे. ही ईश्वरभक्ती आमच्या चित्तामध्ये राहावी, त्या भक्तीच्या योगाने आमचे अंतःकरण शुद्ध व्हावे. भगवत् कृपेने भगवंताचा साक्षात्कार व्हावा आणि सर्वांचे कल्याण व्हावे एवढी भगवान् मंगलमूर्तींच्या चरणाजवळ प्रार्थना करून हे अखंड कार्य चालवलेले आहे. ह्यांच्यावरही भगवान मंगलमूर्तींची कृपा व्हावी ही प्रार्थना. सत्कर्मयोगे वय घालवावे । सर्वामुखी मंगल बोलवावे।। हे जे वैयक्तिक आणि सामुदायिक कार्य भगवान मंगलमूर्तींनी ह्यांच्या द्वाराने करवून घ्यावे आणि दैवी संपत्तीचा विकास सर्वत्र व्हावा एवढीच आणखी मंगलमूर्तींजवळ प्रार्थना.

**अवधूत चिंतन श्री गुरूदेव दत्त।**
**मयुरेश्वर महाराज की जय।।**

# ततः किम्

**भारतवर्षामध्ये** भगवान शंकराचार्य महाराजांचा अवतार कधी झाला, या कालनिर्णयाचा विचार करण्याची काही आवश्यकता नाही. शंकराचार्य महाराजांचा अवतार झाला त्या वेळेला वैदिक वाङमयाचा योग्य अर्थ सगळ्यांना समजला नव्हता.

बुद्ध होऊन गेले पूर्वी. कुमारीलभट्टाचार्यांनी अवतार घेऊन, 'कर्म मार्गाची आवश्यकता आहे, वेद प्रमाण आहेत.' असे सिद्धांत सिद्ध केले आणि बौद्धांना या भारतवर्षातून बाहेर जावे लागले. राजसत्ताच त्यांनी आपलीशी केली होती. त्यानंतर शंकराचार्य महाराजांनी विशेषतः ज्ञान मार्गाचा पुरस्कार केला. भगवत् गीतेवरही त्यांचे भाष्य आहे. भगवत् गीतेमध्ये तिन्ही योग आहेत. कर्मयोग आहे, भक्तीयोग आहे, उपासनायोग आहे. अष्टांगयोगही आहे. सगळी साधनं आहेत. त्यांनी आत्मज्ञान हे प्रधान साधन किंवा साध्य मानले. आपण कोण आहोत हे समजून घ्यायचे आहे, प्रत्येक जीवाने. देहापर्यंतच आपण थांबलेले आहोत. देहाच्याही पलिकडे समजून घेण्यासारखे पुष्कळ पदार्थ आहेत. त्याची कल्पना नाही आपल्याला. तर ही देहात्म बुद्धी कमी कमी करून त्याच्या पुढे जे पदार्थ आहेत आणि शेवटी जो आत्मा आहे, परमात्मा, त्याचे ज्ञान झाले म्हणजे त्याला 'मोक्ष' असे म्हणतात. मोक्ष याचा अर्थ आत्यंतिक दुःख निवृत्ती. दुःख कायमची जाणे. हे सगळ्यांनाच पाहिजे आहे. कोणाला नकोय?



मोक्ष हे शास्त्रीय पारिभाषिक नाव जरी असले तरी सर्वही दुःखं कायमची सुटायला प्रत्येकाला हवी आहेत. त्याच्याकरता फार प्रयत्न केला पाहिजे.

जन्म झालेला आहे. जन्म याचा अर्थ नवीन देहाचा संबंध. म्हणजे जुना देह आपला गेलेला आहे. याच्या पूर्वी एक देह होता. याच्या पुढेही एक देह मिळणार आहे. हा जो वारंवार देहाचा संबंध येतो म्हणजे पुन्हा पुन्हा जन्म जो येतो तो जन्म आल्यानंतर मृत्यू येतो. तर हा पुन्हा पुन्हा देहाचा संबंध आल्याबरोबर सुखदुःख हे सुरू झाले. कांही सुखं आहेत, काही दुःखं आहेत. केवळ सुख मात्र आपल्याला मिळत नाहीये. कोणत्याही जीवाला नुसतं सुख मिळत नाही. आणि ते जरी कदाचित एखाद्याला मिळाले - पुण्यवान् कोणी असेल - तरी ते टिकत नाही. पूर्ण सुख मिळत नाही आणि ते राहातही नाही.

तर ही अशी स्थिती केव्हां बदलता येईल की नाही? हाच मोठा विचारणीय प्रश्न आहे. कायमचं सुख आपल्याला मिळावं, पूर्ण सुख मिळावं, त्याच्यामध्ये काहीही कमी जास्तीपणा असू नये. व्यवहारामध्ये जे कांही सुख आपल्याला दिसते त्याच्यामध्ये कमी जास्तीपणा असतो. उच्चनीच भाव असतो. हा कमी होऊन केवल सुख मिळावं आणि ते कायम टिकणारं असावं अशी सर्वांनाच इच्छा असते. पुन्हा पुन्हा सुख मिळवायचं ते गेल्यानंतर दुसरी साधनं जमवायची, त्या साधनांनी पुन्हा सुख मिळवायचं हेच आपल्याला करीत राहावे लागते. एक दुःख गेले की दुसरे दुःख येते. तर ही सर्वही दुःखाची साधनं नाहीशी करता आली पाहिजेत. म्हणजे कायमची पूर्ण दुःखाची निवृत्ती होईल. आणि यालाच शास्त्रकार मोक्ष असे म्हणतात. तर याच्याकरता काय केलं पाहिजे?

प्राचीन जे मोठे मोठे तत्ववेत्ते होऊन गेले त्यांनीसुद्धा ह्याचा पुरस्कार केला आहे. ईश्वराची कांहीतरी भक्ती घडली पाहिजे असे ते म्हणतात. जी घडेल ती काया, वाचा, मनाने! ही तीन साधनं आपल्याजवळ आहेत. शरीर आहे, वाणी आहे आणि मन आहे. या तीन साधनांनी ईश्वराची कांहीतरी भक्ती जर आपल्याकडून झाली तर या दुःख निवृत्तीचा किंवा सुखप्राप्तीचा कांही तरी संभव आहे. हे सांगितले त्यांनी. प्राचीन तत्वज्ञानी पुरुषांनी, संत महात्म्यांनी आणि त्यांनी स्वतःही त्याप्रमाणे आचरण केले. आचरण करून त्यांना जो अनुभव आलेला आहे, त्या अनुभवामुळे आणि त्यांनी हा प्रचार केला.

ज्ञानेश्वर महाराजांनी हा एक भक्तिमार्ग, वारकरी सांप्रदाय याचा आपल्या महाराष्ट्रात पुरस्कार केला, जास्तीत जास्त. आणखी आज सातशे वर्षे झाली तरी ते कार्य अखंडपणे चालू आहे. आषाढी एकादशी आली की हजारो लोक पुण्यातच जमतात. ज्ञानेश्वर महाराजांची पालखी पुण्यावरूनच जाते. किती लोक दर्शनाला जातात! प्रत्येक वर्षी आषाढी एकादशीला येणाऱ्या पालखीचे दर्शन घ्यायला लोक जातात. पण त्यांना असं वाटत नाही ' पुरे आता ' पालखी आली की दर्शन झालंच पाहिजे. हा त्यांच्या मनाचा कायमचा निश्चय आहे. साधन म्हणून जे सांगितले आहे संत महात्म्यांनी, त्या साधनांवर विश्वास पाहिजे. आणि तो विश्वाससुद्धा पक्का पाहिजे. डळमळीत उपयोग नाही. दरवर्षी आषाढी एकादशीला पंढरपूरला जायचे हा विश्वास संतांच्या वाणीमुळे उत्पन्न झाला आहे. राष्ट्रपतींनी असा वटहुकूम काढला असता तर झालं असतं का हे? पंढरपूरला जायला पाहिजे. पंढरपूरच्या रस्त्याला लागतील. शेवटपर्यंत जातील की नाही सांगता येत नाही. आपल्या बुद्धीप्रमाणे सगळी मंडळी कार्य



करतात. सांगणाऱ्याच्या वाणीमध्ये जो अधिकार आहे त्यामुळे त्या वाणीचे परिपालन आज सातशे वर्षांवर होऊन गेले तरी चालू आहे. किती कष्ट असतात! आणि चालत जायचंय. नुसतं कांही वाहानात बसून जायचे नाही. पुढे कुठे उतरायचे, सोय आहे की नाही. कोणीही पत्रव्यवहार केलेला नसतो. कोणाच्या परिचयातले असतील ते जात असतील. पण नागपूर, विदर्भापासून बायका, मुले, सर्व मंडळी येत असतात. त्यांच्या मनामध्ये उत्पन्न झालेल्या विश्वासामुळे संघटनाही निर्माण झालेली आहे. एकमेकांबद्दल सौहार्द्र निर्माण होऊन सगळी मंडळी एकत्र येऊन जातात. हे जे त्यांच्या मनामध्ये विचार दृढ झालेले आहेत, ते दृढ कसे झाले? आणि तेच दृढ होऊन त्याप्रमाणे जर आचरण सुरू झालं, भगवत् भक्ती अंतःकरणामध्ये वाढत राहिली तर त्या शक्तीच्या प्रभावाने, ज्याला मोक्ष म्हणून शास्त्रकार म्हणतात- सर्व दुःखांची कायमची निवृत्ती, जी सर्वांनाच इष्ट आहे-ती सुद्धा प्राप्त होते, असं ते सांगतात.

म्हणून ईश्वराची भक्ती आपल्या अंतःकरणामध्ये उत्पन्न व्हावी. ईश्वर भक्तीचाच प्रसार सर्व संत महात्म्यांनी केलेला आहे. तो आवश्यक आहे. ज्ञानमार्ग मोठा आहे. शंकराचार्य महाराजांनी संन्यास दीक्षा धारण करून ज्ञानाचा प्रसार केला. उपनिषद वगैरे ग्रंथांमध्ये आत्मस्वरुपाचे प्रतिपादन केलेले आहे. ते सर्वही ग्रंथ ऐकावेत. त्याचे पूर्ण मनन करावे, विचार करावा, सारखा निदिध्यास करावा आणि आत्मज्ञान, परमात्म स्वरुपाचे ज्ञान करून घ्यावे. आणि मुक्त व्हावे. हा जरी उपाय त्यांनी सांगितला असला तरी भक्तीवर त्यांचा विशेष जोर आहे. ईश्वरभक्ती हे मोठे साधन आहे. असे ते सांगतात. त्यांचा एक श्लोक प्रसिद्ध आहे.

**शरीरं सुरूपं तथा वा कलत्रं**
**यशश्वारू चित्रं धनं मेरूतुल्यम् ।**
**मनश्वेन्न लग्नं गुरोरङ्घ्रिपद्म**
**ततः किं ततः किं ततः किं ततः किम् ।।**

व्यक्तिरेक रूपाने सांगितले आहे. हरिची जर भक्ती झाली नाही, हरिच्या चरणाजवळ जर आपलं मन दृढ झालं नाही, तिथं राहिलं नाही तर याचा काय उपयोग आहे. असे ते विचारताहेत. भक्तीचे महत्व हे ह्या रुपाने सांगितले आहे. भक्ती झाली म्हणजे काय होतं हा एक मुद्दा त्यांना सांगायचा आहे. आणि ती जर झाली नाही तर याचा काहीही उपयोग नाही, त्यांच्या मताने.

शरीर चांगले मिळालेले आहे, उत्तम सौंदर्य आहे. त्यामुळे लोकांमध्ये आणखी मान मान्यताही आहे. शरीरा बरोबर बाकीचेही पदार्थ याठिकाणी त्यांनी सुचिवले आहेत. चांगले आरोग्य पाहिजे. शरीर नुसते मिळून काय उपयोग ? आरोग्य जर नसेल तरी शरीराचा काहीच उपयोग नाही. आपल्याला व्यवहारातही कांही करता येत नाही, संसारातही कांही उपयोग नाही. मग परमार्थामध्ये तर दूरच राहिले. म्हणून चांगल्या शरीराबरोबर उत्तम आरोग्यही मिळाले पाहिजे.

त्याचप्रमाणे उत्तम ज्ञानही आहे. व्यवहारामध्ये जे उपयुक्त ज्ञान आहे. 'सुरूपं' याचा अर्थ नुसते " सुरूपं " नाही शरीराला एकंदर ज्या ज्या साधनांनी, गुणांनी सौंदर्यवादी होत असेल त्या सगळ्या गुणांनी युक्त असे शरीर आहे. उत्तम ज्ञान आहे. ज्या ज्ञानाच्या योगाने स्वतःच्या वैयक्तिक हिताचाही विचार करता येतो आणि जिज्ञासूंनाही मार्गदर्शन करता येते. तर हे जे ज्ञान



आहे ते ज्ञानही वेगळे आहे. आरोग्य चांगले आहे. आणि त्यामुळे मानही आहे. सर्वांपेक्षा ज्ञानाला महत्व जास्त आहे. धनाची आपल्याला जरुरी आहेच. धनाशिवाय तर कोणचेही कार्य होत नाही. पण धनापेक्षा मान श्रेष्ठ आहे. आपला जर कोणी अपमान केला तर माणूस धन खर्च करून लगेच बेअब्रूची फिर्याद करतो. म्हणजे धनाचीसुद्धा पर्वा करीत नाही. मान राहिला पाहिजे. मानापेक्षाही ज्ञान श्रेष्ठ आहे म्हणतात. आपल्याला कांही ज्ञान मिळावं, आपली बुद्धी सुधारावी, आपल्याला शांती मिळावी, याकरता कांही विचार करण्याकरता ज्ञानी महात्म्यांकडे आपण जातो.मानी मनुष्य सुद्धा ज्ञानी माहात्म्याकडे जातो. मार्गदर्शनाची जरुरी आहे ना! म्हणजे मानापेक्षासुद्धा ज्ञान हे जास्त आहे. आणि ते ज्ञान जास्ती शुद्ध असले पाहिजे. त्यात भ्रांती उपयोगी नाही. हिताचे ज्ञान पाहिजे. आपल्याला ज्या ज्या वस्तू प्रिय आणि ज्याच्या योगाने सुख होईल असे वाटते तेवढ्याच वस्तूंचे ज्ञान असून उपयोग नाही. प्रियही कळलं पाहिजे. प्रियही मिळाले पाहिजे. आणि हितही झालं पाहिजे. तर हिताचं ज्ञान सर्व सामान्य मनुष्याला असतं असं नाही. जे आपल्या मनाला प्रिय वाटतं, जे बरं वाटतं, त्याचाच विचार आपण करतो, त्याच्याच आपण मागे लागतो. परंतु हित म्हणजे काय आपले कल्याण कशात आहे हा पूर्ण विचार केवळ व्यक्तीला, आपल्याला करता येत नाही.अज्ञान पुष्कळ असतं. म्हणून ज्यांच्या जवळ अज्ञान नाही, ज्यांनी ज्ञान मिळवलेलं आहे, स्वतःचा मार्ग निश्चित ठरवलेला आहे, स्वतःचे कल्याण करून घेतलेले आहे असे जे संत महात्मे त्यांच्याकडे आपल्याला जावे लागते तेव्हां मार्गदर्शन होते.

म्हणून आचार्य महाराजांनी सांगितले, शरीर सगळे चांगले

मिळाले आहे, उत्तम गुण त्याच्या बरोबर आहेत परंतु ईश्वराच्याकडे जर लक्ष लागलेले नसेल तर याचा उपयोग काय? 'ततः किं ' या प्रश्नाचा असाही अर्थ करता येईल किंवा त्याचा उपयोग नाही असाही अर्थ करता येईल. ' किम् ' शब्द प्रश्न अशा अर्थानेही वापरता येतो. म्हणजे ईश्वराच्या ठिकाणी जर आमचं मन स्थिर झालं नाही- आता ते नेहमीच स्थिर होणं, अखंड स्थिर राहाणं ही मोठी भूमिका आहे- पण कांही कांही वेळेला तरी ईश्वराची आठवण येईल की नाही. दुःखाच्या वेळेला ईश्वराची आठवण होतेच, सर्वांना होते असे नाहीये, पण ज्यांचे आणखी पूर्व सुकृत चांगले आहे, पूर्वीही आपल्या हातून जर सत्कर्म झालेले असेल तर या जन्मामध्ये तेच संस्कार आपल्या बरोबर आल्याकारणाने ईश्वर भजनाकडे आपली प्रवृत्ती होऊ शकते.

**बहुत सुकृतांची जोडी ।**
**म्हणूनी विठ्ठली आवडी ।।**

हे ज्ञानेश्वर महाराज मुद्दाम सांगताहेत.

केवळ दुसऱ्याच्या सांगण्याने कांही ईश्वराबद्दल आस्तिक्य बुद्धी राहील असे नाही. ही आस्तिक्य बुद्धी टिकवण्याकरता सर्व संतांचा प्रयत्न आहे, पहिल्यापासून. इतिहासामध्ये कितीतरी प्रतिकूल गोष्टी घडून आल्या. केवढ्या विरोधी राजसत्ता भारतामध्ये येऊन गेल्या पण तशाही स्थितीमध्ये सर्वही संत महात्म्यांनी ईश्वर भजन करावे, ईश्वराबद्दल आस्तिक्य बुद्धी असावी हे मुद्दाम सांगितले आहे.

ईश्वरावर विश्वास ठेवणे, श्रद्धा ठेवणे हा भारताचा मोठा गुण आहे. ईश्वराबद्दल आस्तिक्य बुद्धी भारतामध्ये आजही



इतकी आहे की कितीही सुधारणावादी मंडळी असली, सुधारणा होत असल्या, तरी ही आस्तिक्य बुद्धी बदलणे शक्य नाही. हे कौशल्य किंवा अधिकार संतांचा आहे. संतांनी भक्तीचे बी पेरून ठेवलेले आहे. ईश्वराबद्दल ज्यांच्या मनात आस्तिक्य बुद्धी आहे त्यालाच भारतात राहायचा अधिकार आहे. त्याचे स्वतःचे तो हित साधेल आणि इतरांच्याही हिताकडे तो लक्ष देईल. हा संतांचा उद्देश आहे. म्हणून भारतवर्षामध्ये ज्यांच्या मनामध्ये ईश्वर आस्तिक्य नाहीये त्याला चांगले शरीर, आरोग्य, धन, मानसन्मान सगळे मिळून काय उपयोग आहे ? काहीही उपयोग नाही. व्यवहारात उपयोग कदाचित होईल. मानू आपण.

आपल्याला संसार करायचाय. संसारात आपल्याला राहायचंय. आपण संसार सोडून जाणार कुठे ? संसार म्हणजे नुसते घरदार असा अर्थ नाही. मनामध्ये संसार आहे. बाहेरही संसार आहे. केवळ बाहेर संसार आहे असं नाही. मन जे आपले त्याच्यात लागलेले आहे. त्यामुळे घरदार जरी सोडून गेले तरी मनातला संसार गेला नाही. तो मनामध्ये असलेला संसार हा कमी कमी होत चालला पाहिजे. तुकाराम महाराजांनी हीच भक्तीची व्याख्या केली आहे-

**हेची थोर भक्ती आवडते देवा।।**
**संकल्पावी माया संसाराची ।।**

संसार वासनारुपाने आत बाहेर भरलेला आहे. तोच संसार बाहेर आपण वाढवतो. त्यांत गुंतून जातो. संसाराची माया जी जास्ती जास्ती वाढत चाललेली आहे त्यामुळे ईश्वराकडे लक्ष लागत नाहीये. साधुसंतांच्या उपदेशाकडेही लक्ष जात नाही.

त्यांची भेट होणे किती कठीण आहे! भेट झाल्यानंतर त्यांचा उपदेश योग्य आहे हे आपल्या मनाला पटणेही कठीण आहे. कारण संसारामध्येच आमचे मन गुंतून गेले आहे ना! आमची संसाराचीच माया जास्तीत जास्त वाढत चालली आहे. त्यामुळे आपले भाग्य एखादे वेळेला उदयाला आले आणि संत महात्म्यांची भेट होऊन त्यांनी आपल्याला उपदेश केला तर त्याप्रमाणे आपले वागणे होईल की नाही याबद्दलही संदेह आहे. म्हणून त्यांनी ईश्वरभक्तीचा मार्ग दाखवला आहे. ईश्वरभक्ती म्हणजे मनामध्ये ईश्वराबद्दल प्रेम निर्माण होणे. आणि तसे प्रेम मनामध्ये निर्माण झाल्यानंतर मग संसाराची माया आपोआप कमी होते.

**हेची दान देगा देवा ।**
**तुझा विसर न व्हावा।।**

म्हणून जे तुकाराम महाराज सांगताहेत. आता देवाजवळ मागताना देव बोलतो आहे त्यांच्याबरोबर. एकदा देवाचे अखंड भजन सुरू झाल्यावर सात सात दिवसपर्यंत तुकाराम महाराजांना देहाचीही शुद्ध नसायची. अन्न नाही, पाणी नाही, कांही नाही. त्यांना मिळालेली ही भूमिका, अवस्था आमच्या दृष्टीने कदाचित अयोग्य असेल. जेवत नाहीत, खात नाहीत. नुसते भजन करतात. पण नुसते भजन सात दिवस करतात. हे आम्हाला शक्य आहे का? इतकी मनाची स्थिरता, दृढता ही जी त्यांनी मिळवलेली आहे. आणि देवाचे विस्मरण होऊ नये, देवाचे अखंड स्मरण व्हावे हेच ते देवाजवळ जास्ती जास्ती मागताहेत. हे त्यांनी आपले स्वतःचे हित करून घेतलेले आहे. आणि दुसऱ्यांनाही त्याचा ते उपदेश करताहेत.



तर संसारातून मन बाजूला होऊन ईश्वराकडे अधिकाधिक लागले पाहिजे. ईश्वराबद्दल मनामध्ये कृतज्ञता उत्पन्न झाली पाहिजे, शरीर कोणाकडून मिळाले याची जाणीव पाहिजे. शरीर आम्हाला मिळालेले आहे, ते आम्ही मिळवलंय की काय? निसर्गाने दिले वगैरे उत्तरं बुद्धिवादाने दिली जातात. निसर्ग म्हणजे काय? निसर्ग शब्दाचा अर्थ काय? आपोआप झालं? कारण नको त्याला? ते निर्माण करणारा कोण आहे? गर्भामध्ये तो जीवात्मा कसा येतो? तो गर्भ कसा वाढतो? नऊ महिन्यांपर्यंत त्याचे परिपोषण कोण करतो? हा सगळा विचार आपण जर केला, त्याचे नुसते, ' निसर्ग ' हे उत्तर नाहीये, हे आपल्या लक्षात येईल. बुद्धिवादानं विचार करायचा म्हटला तर त्या बुद्धिवादानं ही सगळी कार्यकारण मीमांसा दाखवता आली पाहिजे. तुमचे आम्ही काहीच मानणार नाही. कर्ता कोणी नाही. ईश्वराचे अस्तित्व आम्हाला मान्य नाही. जर ईश्वर कोणीच नाही तर जग झालेच कसे? साधा विचार म्हणजे गर्भामध्ये तो गर्भ तयार कसा होतो? याला बुद्धिवाद उत्तर देऊ शकत नाही.

तसे कार्य हे कारणाशिवाय कसे उत्पन्न होते?

म्हणून हे सगळे विचार करून अनुभवाने साधुसंत सांगताहेत. ईश्वराचे कर्तुत्व आहे. सर्वही सृष्टीच्या कार्याचा कर्ता ईश्वर आहे. संरक्षण कर्ताही तो आहे. उपसंहार कर्ताही तोच आहे. ही ईश्वराची शक्ती त्यांनी आणखी मान्य केली, अनुभवली आणि मग लोकांपुढे ठेवली. अशा ईश्वराबद्दल तुमच्या मनामध्ये प्रेम जर उत्पन्न झाले तर तुम्हाला काहीही चिंता करायचे कारण नाही.

**तुझी चिंता त्यासी सर्व आहे।**

सांगतात ना! तर हा जो अनुभव संतांनी मांडला आहे जगापुढे, त्या अनुभवाप्रमाणे ईश्वराबद्दल मनामध्ये प्रेम निर्माण झाले पाहिजे. हे शरीराबद्दल आचार्यांनी सांगितले.

**'तथा वा कलत्रं'**

' कलत्र ' म्हणजे पत्नी. पत्नीही तशीच चांगली मिळावी. ती उत्तम विचारसंपन्न आहे, आरोग्यसंपन्न आहे. तिच्या ठिकाणी मार्गदर्शन करण्याची बुद्धी चांगली आहे. सर्वही संसारातील कार्यांवर देखरेख ठेवणारी, जबाबदारी स्विकारणारी अशी चांगली पत्नी आहे. पण-

**' मनश्चेन लग्नं गुरोरङ्घ्रिपद्मे ।'**

काय उपयोग म्हणाले. विषयभोग वगैरे चालूच आहे. प्रत्येक जन्मामध्ये आहे. मनुष्य जन्माला आल्यानंतर शरीराचे आणि पत्नीचे प्रयोजन असेल तर या जन्मामध्ये येऊन विशेष काय मिळाले? चांगलं शरीर मिळालेलं आहे. पशुपक्षी किंवा झाडाचे शरीर मिळाले असते तर! झाड हा सुद्धा एक जीव आहे. पूर्वीचे शास्त्रज्ञ तर सांगतातच आहेत, आधुनिक शास्त्रज्ञही तेच सांगताहेत. जगदीशचंद्र बोसांनी शोध लावला म्हणतात. की झाडालासुद्धा जीव आहे. योगशास्त्राप्रमाणे ' स्थावरांतः अधोगतिः ।' म्हणतात. अत्यंत पापाचे शेवटचे फल म्हणजे वृक्ष जन्म येणे. वृक्ष हे सुद्धा एक शरीर आहे. शास्त्रकारांच्या मताने पराधीन , किती पराधीन! पशुपक्षी यांना काय बोलता येतं की काय करता येतं ? मनुष्य शरीर मिळाल्यानंतर आपल्याला



बोलता येतं वाणी आहे. मनाने किंवा अंतःकरणाने आपल्याला सगळा विचार करता येतो, योग्य काय, अयोग्य काय. चांगले विचार मिळवण्यासाठी संत महात्म्यांच्या गाठीभेटी घेता येतात. त्यांच्याबरोबरही आपल्याला विचार करता येतो. चिकित्सा करू शकतो. त्या चिकित्सेतून व्यवस्थित मार्गदर्शन आपण मिळवू शकतो. हे सगळे मनुष्याला करता येते. म्हणून शरीर किंवा कलत्र सांगताना, मनुष्य शरीरच त्याच्या डोळ्यापुढे आहे. चांगलं मनुष्य शरीर मिळालं, चांगली पत्नी मिळाली, सगळ्या दृष्टीने सर्वगुण संपन्न तर ईश्वराकडे लक्ष जावं.

खाणंपिणं इतर व्यावहारिक सुखाचा उपभोग घेणं, तेच तेच पदार्थ आहेत. दुसरे आहे काय? नविन नविन काय पदार्थ आहे? आणि नविन नविन सुख आपण जे मिळवतो ते टिकणारं नाहीये. त्याच्याकरता सारखा प्रयत्न केला पाहिजे. संग्रह सारखा केला पाहिजे. जनसंग्रह करायचा त्याचप्रमाणे सुखाची सगळी साधनं जमा करायची. ती संपली की पुन्हा त्याकरता प्रयत्न करायचा. हाच जर मनुष्य जन्माचा उद्देश असेल तर नविन काय आहे? भागवतामध्ये सांगितले आहे, सर्व जन्मांमध्ये विषय आहेत. मनुष्य जन्म हा इतका चांगला मिळाला असताना मनामध्ये, श्रेष्ठ पुरूषांच्या दृष्टीने, हरिभक्ती उत्पन्न झाली पाहिजे.

त्या हरिभक्तीचा दुसऱ्या दृष्टीनेही उपयोग आहे. प्रेममय अंतःकरण झाल्यानंतर, मनामध्ये ईश्वराबद्दल प्रेम उत्पन्न झाल्यानंतर त्या परमेश्वराच्या स्वरुपाची आपल्याला जाणीव होते. ईश्वराचे खरं दर्शन फार दुर्लभ आहे. उपनिषदांमध्ये ईश्वर हा सर्वव्यापी आहे असं सांगितलं आहे. सर्वव्यापी याचा अर्थ अमुक एक देशातच परमेश्वर राहातो असं नाही. तसं असतं तर त्याला कोणीही भेटायला गेलं असतं. राष्ट्रपती दिल्लीला राहातात.

त्यांच्या भेटीला कोणीही जाऊ शकेल. त्यांची परवानगी असेल तर. त्यांच्याबरोबर मिटिंग घेऊ शकतो आपण. अमुक देशामध्ये ईश्वर आहे अशी मर्यादा नाहीये. आणि ही मर्यादा नसल्यामुळे ईश्वराचं खरं स्वरूप जाणून घेण्यासाठी नामदेवाला स्वतःला 'कच्चे मडके ' म्हणवून घ्यावे लागले. ईश्वर सर्व ठिकाणी आहे असे संपूर्ण ज्ञान ज्यांना झाले आहे अशा महात्म्यांनी नामदेवाला ' कच्चे मडके ' म्हटले. ते पांडुरंगाकडे तक्रार करत आले. " मला सगळे, संत ' कच्चं मडकं ' म्हणतात. कच्चं कसं मी? तुम्ही माझ्या बरोबर बोलता. घरून काही करून आणले तर माझ्या बरोबर जेवता प्रत्यक्ष. आणि मी कच्चं मडकं कसा? "

पांडुरंग म्हणाले," हो. पांडुरंग फक्त इथे राऊळातंच आहे एवढंच तुला माहिती आहे. सर्व ठिकाणी मी आहे हे तुला माहित आहे का? विष्णूसहस्त्रनामामध्ये ईश्वराला ' विष्णू ' हे नाम प्रथम दिले आहे. संपूर्ण विश्व हे माझं स्थान आहे. हे तुला जोपर्यंत कळालेलं नाही तोपर्यंत कच्चाच आहेस तूं." पक्का होण्याकरता त्याला (विसोबा खेचरांकडे) पाठवावे लागले. ज्यांना ईश्वराचे पूर्ण दर्शन झालं आहे अशा महात्म्यांकडे पांडुरंगांनी नामदेवांना पाठवून दिले.

औंढ्या नागनाथला ते विसोबा खेचर होते म्हणतात. नामदेव जेव्हां त्यांच्याकडे गेले तेव्हां विसोबा खेचर शंकराच्या पिंडीवर पाय ठेवून बसले होते. कदाचित म्हातारा आहे, उशाला काही पोते बिते घेतले असते. पण त्यावर पाय ठेवून निजले? नामदेव म्हणाले,"काय असल्या माणसाकडे पांडुरंगांनी मला पाठवले!" म्हणजे अजूनही संदेह आहे मनात. व्यवहारात असं कोणी करील काय? देवावर पाय ठेवून झोपेल ? पण शिवलिंग म्हणजेच देव आहे हे नामदेवांचे अज्ञान आहे.



नामदेव विसोबा खेचरांना म्हणाले, "देवावर पाय ठेवून निजलात? काय सांगायचे तुम्हाला." विसोबा खेचर म्हणाले, "माझ्या वयोपरत्वे मला समजत नाहीये. तूच माझे पाय उचलून जिथे देव नसेल तिथे ठेव." सहज बोलणे हाच उपदेश आहे. त्यात शक्ती आहे. नामदेव तसे करायला गेल्यावर प्रत्येक ठिकाणी शिवलिंगच दिसायला लागली. आता ठेवायचे कुठे पाय? एकदम सर्वत्र ईश्वर आहे हे ज्ञान झाले. हे ज्ञान व्हायला वेळ लागला नाही. ' कच्चं मडकं ' जरी सगळे म्हणत होते तरी ईश्वराचा साक्षात्कार झाला. ईश्वराबद्दल प्रेम अंतःकरणामध्ये होते. भक्ती होती त्यामुळे सर्वत्र एक ईश्वर आहे हे ज्ञान व्हायला वेळ लागला नाही. हे त्या भक्तीचे माहात्म्य आहे.

त्याप्रमाणे मनामध्ये निरनिराळे दोष असतात. मनाच्या शक्तीला मर्यादा आहे. सर्व विषयांचे ज्ञान मनाला होऊ शकत नाही. ईश्वरस्वरुपाचे ज्ञान होण्याकरता किती काल लागेल कांही सांगता येत नाही. म्हणून "सर्वत्र परमात्मा आहे" ही शेवटची बुद्धी आहे. त्याच्याकरताच प्रयत्न करायचा. पण त्याकरता आरंभाला "ईश्वरशक्ती काहीतरी असली पाहिजे" ही भावना पाहिजे, ती आपल्याला आणखी सहाय्य व्हावी यादृष्टीने तरी ईश्वराची भक्ती करायला पाहिजे.

योगाभ्यास म्हणजे प्रयत्नवादच आहे. मनाच्या शक्तीचा विकास करण्याकरता योगशास्त्र आहे. 'आमची मनाची शक्ती अत्यंत अल्प आहे'. म्हणतो आपण, बोलतो. चांगदेव हे आकाशातून वाघावर बसून आले म्हणतात. अशक्य नाहीये. योगशास्त्रकारांनी सांगितलेले जे प्रयोग आहेत ते प्रयोग केल्यानंतर त्याप्रमाणे आणखी फल मिळायला काय हरकत आहे? प्रयोग करून आम्ही बघतच नाही. त्याच्या अगोदरच म्हणतो " सगळं

खोटं आहे. आता लोक चंद्रावर गेलेले आहेत. ही असली (योगशास्त्रावरची ) पुस्तके वगैरे वाचून आता काय करायचंय" म्हणजे त्यांनी ही पुस्तके लिहूनच प्रयोग केले आहेत.

चंद्रावर ज्या विमानातून अंतराळवीर गेले त्या विमानविद्येची सर्व माहिती भरद्वाज ऋषींनी लिहून ठेवली आहे. त्यांच्याकडे हा सगळा ग्रंथ संग्रह आहे, अद्यापि. कोणचे बटन दाबले असता दुसऱ्याच्या विमानात काय चालले आहे ते सर्व त्यांना दिसू शकते. दुसऱ्याच्या विमानात काय काय बोलतात ते सर्व ऐकताही येते. एक बटन दाबले म्हणजे दुसऱ्याचे विमान कुठे आहे हे देखील समजून येते. हे सगळे प्रयोग त्यांनी करून पाहिले आहेत. पण ती विद्या आता लुप्त झाली आहे.

आपल्या पूर्वजांना जहाज बांधणीचे किती ज्ञान होते! लाकडाची परीक्षा कशी करायची लाकडात सुद्धा ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, क्षुद्र असे वर्गीकरण केले होते. कोणच्या जातीचे लाकूड टिकाऊ असते, कोणते लाकूड पाण्यात बुडत नाही वगैरे सगळे ज्ञान होते. मोठी मोठी जहाजे बांधली जात होती. ती परदेशाला जात होती. परकीयांना ती जहाजे हुबेहूब त्यांच्या जहाजांसारखी वाटली म्हणून आपल्या राजसत्तेच्या द्वाराने कांहीतरी कायदे करून आपली जहाजे बनवणे बंद केले.

ढाक्क्याची मलमल किती प्रसिद्ध होती! परंतु ब्रिटिशांनी त्याचे उत्पादनच बंद केले आणि इंग्लंडहून आलेले कापडच वापरले पाहिजे असा कायदा केला. कायदा झाला की संपले.

म्हणजे या देशातल्या लोकांनी हा जो बुद्धीचा, विद्येचा विकास करून घेतला होता तो बंद करून टाकला. म्हणून योगशास्त्र हे प्रयोगशास्त्र असल्याने त्या शास्त्राने सांगितलेले प्रयोग केले तर आपल्या बुद्धीचा वाटेल तेवढा विकास साधता



येतो. हा खरा बुद्धिवाद आहे. शास्त्रीय बुद्धिवाद आहे. "हे सगळं खोटं आहे, ह्यात काही अर्थ नाही." असं म्हणून स्वतः बाजूला होणं आणि तसं दुसऱ्यालाही सांगणं हा खरा बुद्धिवाद नाही. खोटं काय म्हणून?

वैज्ञानिक कांही लगेच चंद्रावर गेले नाहीत. त्यांचा आपल्या प्रयोगावर पूर्ण विश्वास आहे. कोट्यावधी रुपये त्यांनी संशोधनावर खर्च केले आणि त्यांच्या राजसत्तेने त्यांना सहाय्य केले आहे. देताहेत अजूनही. वैज्ञानिकांना वाटेल तितके साह्य मिळते आहे. समाजातील मंडळीही साह्य करतात. राजसत्ताही त्यांना साह्य करते आहे. म्हणून त्यांचे प्रयोग यशस्वी होतात. आधीच आपले हे सर्व खोटे आहे असे म्हणून ते गप्प बसले असते तर? चंद्रावर जाणे हा सुद्धा बुद्धीचा एक विकास आहे. तसाच बुद्धी विकास योगशास्त्रीय प्रयोग करून साधता येतो. परंतु त्याच्यामध्ये जर काही विघ्नं उत्पन्न झाली, आपली बुद्धी एकदम चालेनाशी झाली, शरीरामध्ये अचानक काही अस्वस्थता निर्माण झाली, प्रयोग सिद्ध झाला नाही; तर असे जे प्रतिबंध येतात हे प्रतिबंध दूर करण्याकरता ईश्वराचे सहाय्य घेतले पाहिजे. असे योगशास्त्रकार सांगतात.

साधनामार्गात येणारी सगळी विघ्ने दूर होऊदेत. तुमची शक्ती परिमित आहे. अगोदर आम्हाला त्या मार्गाने जाण्याची इच्छाच होत नाही. भारतातली जिज्ञासाच नष्ट झाली आहे हे दुर्दैव आहे. पाश्चिमात्य लोकांजवळ अजून जिज्ञासा आहे. दहा दहा हजार मैलावरुन ते लोक भारतात इथे पुण्यात येतात. भारतीय लोक मृत्यू झाल्यानंतर त्याचे काय काय क्रिया कर्मांतर करतात ह्याचा अभ्यास करण्यासाठी! एक अमेरिकन माणूस इथे दहा वर्ष येऊन राहिला होता. अशा विषयांवर संशोधन

करून ते पी. एच. डी करतात. त्यांना जिज्ञासा आहे. जिज्ञासू वृत्ती असेल तर प्रयोग होऊ शकतात. मनांत निराशा राहूं दे. पण आपल्याच ज्ञानाला आम्हीच 'चुकीचे' म्हणायला लागलो तर? काही नाही. पूर्वीच्या लोकांना काही कळत नव्हते, ते सगळे मागासलेले लोक होते हे आम्हीच सांगायचे? आमच्याकडची विद्या हस्तगत करण्यासाठी पाश्चात्य लोक जिज्ञासेने इथे येताहेत. आणि आम्ही मात्र त्या विद्येकडे पाठ फिरवून बसलो आहोत.

राम, रामायणाबद्दल आम्हाला केवळ स्वातंत्र्य असल्यामुळे आम्ही काहीही बोलायचे. वाटेल ते लिहायचे. हा काय स्वातंत्र्याचा अर्थ झाला? शास्त्राचं किंवा महात्म्यांचं काय म्हणणं आहे ह्याचा पूर्ण विचार केल्याशिवाय वाटेल ते बोलणं हा बुद्धिवाद ठरत नाही. ज्या बुद्धिवादानं आपलं स्वतःच पूर्ण हित साधता येईल आणि दुसऱ्यालाही योग्य मार्गदर्शन करता येईल, तो खरा बुद्धिवाद आहे. संतांचा, ज्ञानी महात्म्यांचा बुद्धिवाद फार वेगळा आहे.

काहीही घरात नसताना तुकाराम महाराजांनी शांतपणे सगळे कार्य केले, भक्ती केली. आणि सगळा अनुभव घेऊनच ते गेलेले आहेत. विपत्ती आली तरी हरकत नाही, संतती नको, संपत्ती नको, मानसन्मान नको, संकट आली तरी चालतील, पण ईश्वराचे ध्यान, ईश्वराची भक्ती मला मिळावी. तुकाराम महाराजांनी हा जो बुद्धिवाद पुढे मांडला त्याला काय आम्ही खोटे म्हणायचे? आम्ही खोटंच म्हणणार कारण आमच्या पुढे ते नाहीच आहे. आम्हाला खायला प्यायला व्यवस्थित मिळाले पाहिजे. शेवट पर्यंत आम्हाला पुरलं पाहिजे. कितीही मिळाले तरी कमीच पडतंय आम्हाला. हा आमचा बुद्धिवाद आहे.



**आम्हाला न मिळो खावया ।**
**न वाढो संतान ।**

हा तुकाराम महाराजांचा उपदेश हा कांही बुद्धिवाद म्हणून आम्ही घेणार नाही. पण हे कसं सांगितलं त्यांनी ? त्याकरता काही तर्क मांडला आहे शेवटी. हे का सांगतो मी-

**तुका म्हणे नाशवंत हे सगळं ।**
**आठवे गोपाळ तेचि हित ।**

हे आधुनिक बुद्धीवादाला उत्तर आहे. तुकाराम महाराज वेड्याप्रमाणे हे काय मागायला लागले. खायला प्यायला नको, संतती नको, संपत्ती नको, भक्ती पाहिजे. हे असलं कसलं मागणं? त्यांच्या बुद्धीवादाप्रमाणे हे सगळं नाशवंत आहे. त्याला आम्ही कोणीही उत्तर देऊ शकत नाही. संपूर्ण नाशवंत आहे. कोणच्या वेळेला काय क्षोभ होईल आणि सगळं नाश पावेल आम्ही काहीही सांगू शकत नाही. म्हणून मी देवाची भक्ती माझ्या चित्तामध्ये असावी असे मागणे मागतो. हे त्यांचे युक्तीवादाने दिलेले उत्तर आहे. म्हणजे केवढी त्यांची बुद्धी आहे. हे आपल्याला त्यावरून कळून येते.

तर यशही पुष्कळ मिळालं. सर्व लोक मानसन्मान करताहेत. योग्य आहे, चांगला वक्ता आहे, सर्वांना मार्गदर्शक आहे असेही म्हणायला लागले. आणि धनही पुष्कळ आहे. कीर्ती मिळाली आणि धनही पुष्कळ मिळालेलं असताना

**मनश्चेन्न लग्नं गुरोरङ्घ्रिपद्मे ।**

हे जर नसेल तर या बाकिच्या सगळ्यांचा उपयोग काय? आम्ही सुखी झालो. सुखी शब्दाचा अर्थ काय आहे? तेच तेच विषय वारंवार मिळवायचे. चांगल्या मार्गाने मिळवायचे. वाईट मार्गाने मिळवायचे. त्याकरता आमची बुद्धी न्यायी अन्यायी कशी झाली तरी त्याचा विचार करावयाचा नाही आणि हे स्वतःपुरतं घ्यायचं. स्वार्थाशिवाय दुसरा कोणचाही विचार आमच्या मनात नाही. त्यापेक्षा अधिक काय करता येईल? हाच उपयोग ना! स्वार्थ साधणं एवढाच उपयोग आहे ना!

## भूता परस्परे पडो मैत्र जीवांचे ।

ज्ञानेश्वर महाराज प्रार्थना करताहेत. सर्वांच्या मनांत परस्परांबद्दल सौहार्द्र भावना निर्माण व्हावी. सगळे एकरूप व्हायला पाहिजेत. हे त्यांचे मागणे राष्ट्राकरता आहे. हे काही त्यांनी त्यांच्या स्वतःकरता मागितले नाही.

तर हा सगळा मानसिक शक्तीचा विकास शेवटच्या पसायदानामध्ये ज्ञानेश्वर महाराजांनी मांडलेला आहे. भारताचा असा बुद्धीविकास होण्याकरता प्राचीन राजेलोक काय, संतलोक काय, ऋषीमुनी काय, मोठे मोठे शास्त्रज्ञ, वैज्ञानिक काय त्या सर्वांनी हा बुद्धीविकास मान्य केला. ज्ञानेश्वर महाराजांनी पसायदानामध्ये जो बुद्धीविकास म्हणून ईश्वराजवळ मागितलेला आहे तो बुद्धीविकास खरा विकास आहे. आणि त्यामुळेच राष्ट्र सुखी राहू शकते. परस्परांबद्दल मैत्री उत्पन्न झाल्यानंतर कोणता परकीय देश आपल्याकडे वाकड्या नजरेने पाहू शकेल काय ? इस्त्रायल राष्ट्र किती लहान आहे. कोट्यावधी शत्रू लोक



सभोवतालचे त्यांचा द्वेष करणारे आहेत. पण इस्त्रायल त्यांना डोकं वर काढून देत नाही. त्यांच्या मनात ऐक्य भावना आहे. ती शास्त्रीय दृष्टीने झाली तर चांगलंच आहे. संत महात्मे हेच सांगताहेत. दुसरा जीवही माझाच आहे. ईश्वररूप आहे. सगळेही जग हे ईश्वररूप आहे. ही दृष्टी मनामध्ये उत्पन्न झाल्यानंतर दुसऱ्याबद्दल प्रेमच वाटणार, द्वेष कशाला वाटेल?

तर हे सगळेही मानसिक दोष दूर झाले पाहिजेत. आणि मनाचा, बुद्धीचा विकास झाला पाहिजे. त्याच्यामध्ये येणारे जे प्रतिबंध आहेत ते आपण दूर करू शकत नाही. त्याकरता ईश्वराची भक्ती, ईश्वराचे सहाय्य पाहिजे. योगशास्त्रकारांनीही ते मान्य केले आहे.

तर अशाप्रकारे जरी जगाच्या दृष्टीने आपल्याला सगळं मिळालं, चांगलं शरीर आहे, चांगलं ज्ञान आहे, चांगली किर्ती आहे, धनही पुष्कळ मिळालं, तरीसुद्धा तेवढ्याने कार्य होणार नाहीये. बुद्धीची सुधारणा जर झालेली नसेल तर हे सगळं मिळून काहीही उपयोग नाही. स्वतःच्या शिवाय दुसरीकडे पाहाण्याची आपल्याला कल्पनाच येत नाहीये. मेरूइतके धन मिळाले तरी काय उपयोग आहे? तरी मनातली धनाची इच्छा जात नाहीये. अजून धन पाहिजे. त्याचा उपयोगही दुसऱ्याच्याकरता होत नाहीये. कालीदासाने पूर्वीच्या राजे लोकांचं वर्णन असं केलंय की ते पैसा संग्रह करीत होते. नुसता साम्यवाद साम्यवाद म्हणून राष्ट्राचं कार्य होतं असं नाहीये. संग्रह अवश्य पाहिजे.

अर्थसंग्रहाशिवाय राष्ट्रातली निरनिराळी कार्ये होऊ शकत नाहीत. ती कार्यं करण्याकरता कितीतरी पैसा पाहिजे. पण तो पैसा मिळाल्यावर त्याचा उपभोग मीच घेणार ही बुद्धी आड येते आहे. ही बुद्धी सुधारण्याचा प्रयत्न ईश्वराच्या कृपेने, ईश्वराच्या

भक्तीने होतो. संत महात्म्यांच्या मार्गदर्शनामुळे आपल्या बुद्धीची सुधारणा होऊ शकेल. आणि ही बुद्धीची सुधारणा होण्याकरता, ईश्वरभक्तीची जरुरी आहे. हा सगळा विचार करून सर्व संत महात्म्यांनी हाच मार्ग मान्य केला आहे. शुद्ध बुद्धी झाली पाहिजे. म्हणजे सर्वांचेही कल्याण आपल्याकडून होऊ शकते. सर्वांना घेऊन आपण जाऊ शकतो. केवळ एकट्यानेच भोग घेऊन उपयोग नाही. त्याच्याकरता कायदे करावे लागत नाहीत. आपोआप सर्वांना हे करण्याची बुद्धी उत्पन्न झाली, सर्वांच्या उपयोगी पडायची बुद्धी निर्माण झाली तर उपयोग सर्वांनाच आहे.

दामाजीपंतांकडे प्रांतातले सगळे लोक आले. म्हणाले, "आम्हाला धान्य द्या, महाराज." दामाजीपंतांनी काय सांगायचे, "थांबा, मी आता बादशहाला विचारतो. त्याचा हुकूम आल्यानंतर तुम्हाला देईन." तोपर्यंत ही मंडळी जिवंत राहातात की नाही कोणास ठाऊक. काय करायचे त्यांनी? पण दामाजीपंतांना देवाने दिलेली बुद्धीच इतकी सात्विक आहे की त्यांनी धान्याची सगळी कोठारे खुली करून दिली. म्हणाले," घेऊन जा. तुम्ही प्रजाजन आहात. तुमच्याकरता धान्य ठेवलंय." इतकी निर्भयता बुद्धीमध्ये उत्पन्न झाली पाहिजे. ती बुद्धी योग्य रीतीने तयार होण्याकरता ईश्वराची प्रार्थना आहे. ईश्वराची भक्ती व्यवहारातसुद्धा उपयोगी पडणारी आहे. शुद्ध बुद्धी झालेला महात्मा जसे कार्य करेल तसे कार्य अशुद्ध बुद्धीच्या माणसाला करता येणार नाही. कारण अशुद्ध बुद्धीचा मनुष्य स्वतःचे अगोदर बघणार. माझा यात काय फायदा आहे? जरी समाजकार्य करायचे झाले आणि ही बुद्धी थोडी जरी असली तरी समाजकार्य बरोबर होणार नाही. समाज हा ईश्वराचे स्वरूप आहे ही भावना उत्पन्न झाल्यानंतर दामाजीपंतांनी संपूर्ण धान्य देऊन टाकले. असा अधिकारी मिळेल



का आता? वरचा हुकूम आला पाहिजे याचा अर्थ माझे आसन स्थिर झाले पाहिजे. मला भीती आहे. मी माझ्या बुद्धीने दिले तर? प्रजाजन मेले तरी हरकत नाही, मी माझी बुद्धी वापरणार नाही. म्हणजे फक्त हुकूम मानतोय हा. पण दामाजीपंतांकडे निर्भयता आहे. धान्य गेले तर गेले. फाशीची शिक्षा होईल. होऊं दे. हे इतके जीव तरी जगतील की नाही. निष्ठेने, अनुभवाने, निर्भयपणाने परंतु संत हेच सांगत आले, ईश्वराबद्दल आस्तिक्य बुद्धी ठेवा.

**किंबहुना सर्व सुखी।**
**पूर्ण होऊनी तिन्ही लोकी।**
**भजिजो आदि पुरुषी अखंडीत।**

सगळी सुखं तुम्ही मिळवा, म्हणाले. पण त्या आदि पुरुषाचे भजन विसरु नका. ते जर तुम्ही करत राहिलात तर तुमचेच नव्हे तर तुमच्या परिवाराचे, समाजाचे आणि शेवटी राष्ट्राचे कल्याण होणार आहे.

**तुझिया सत्तेने तुझे गुणगाऊ।**
**तेणे सुखी राहू सर्वकाळ।**

म्हणताहेत तुकाराम महाराज. जगामध्ये असे दुसरे कोणतेही साधन सापडणार नाही. या साधना शिवाय दुसऱ्या कोणत्याही साधनाने आपण सर्वदा सुखी राहू शकतो असे नाही. कायदे, नियम सारखे बदलतात. एका कोर्टाने दिलेला निर्णय दुसऱ्या कोर्टाला मान्य होत नाही. सुप्रीम कोर्टाने दिलेल्या फाशीच्या शिक्षेबाबत, फाशी कशाने द्यायची याचा निर्णय घेण्यातच सहा

सहा महिने जातात.

ही बुद्धीतली अपूर्णता दूर झाली पाहिजे. निर्णय करण्याचे सामर्थ्य त्या बुद्धीत आले पाहिजे. तर वैयक्तिक, सामुदायिक कल्याण साधता येतं. आणि त्याकरता परिपूर्ण शक्तीसंपन्न जो परमेश्वर आहे त्याची उपासना, त्याची भक्ती, त्याच्याबद्दल प्रेम आपल्या अंतःकरणामध्ये निर्माण झाले पाहिजे म्हणजे सगळेही कार्य आपोआप होते. म्हणून आचार्य महाराजांनी हा सिद्धांत मुद्दाम सांगितला आहे-

**शरीरं सुरुपं तथा वा कलत्रं**
**यशश्चारु चित्रं धनं मेरुतुल्यम्।**
**मनश्चेन्न लग्नं गुरोरङ्घ्रिपद्मे**
**ततः किं ततः किं ततः किं ततः किम्।।**

त्यांच्याजवळ काहीही नाहीये. प्रचार साधन कोणतेही नाही. हल्ली राष्ट्रीय संत म्हणून जे असतात, त्यांना मोटार दिलेली असते. प्रचार करून कुठे धर्माची जागृती होते का! आज धर्माच्या नावाखाली किती भयंकर वादळ उठले आहे. राजसत्तेलासुद्धा त्यामुळे चिंताग्रस्त व्हायची वेळ आली आहे. आता, सगळेच विचारी लोक असतात असे नाही. अविचारी लोकही असतात. आपला स्वधर्म समजून घेतला पाहिजे. त्याच्याबद्दल आपल्या स्वतःला अभिमान पाहिजे. शिवाजी राजांनी स्वधर्माचा अभिमान धरूनच कार्य केले. स्वतंत्र राष्ट्र निर्माण केले. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीमध्ये एकट्याने केले. ही एकट्याची शक्ती सर्वांच्या द्वाराने कशी विकसित झाली असेल. परंतु बुद्धी त्यांना मिळाली. चांगली बुद्धी मिळालेली आहे. आणि चांगल्या



बुद्धीचे लोक त्यांना सहाय्यक मिळाल्यामुळे कार्य होऊ शकले. मुलाचे लग्न ठरलेले आहे आणखी शिवाजी महाराजांना आमंत्रण देण्यासाठी तानाजी मालुसरे निघाले इतक्यात महाराजांचाच निरोप आला, कोंडाणा किल्ला घ्यायचाय. हे ऐकल्यावर मुलाचे लग्न बाजूला ठेवले आणि निघाले लढाईला.

लढाईला जायचे म्हणजे कुठे ट्रिपला जायचे नाही. आम्ही ट्रिपला जातो तेव्हां अगोदर आमची उतरायची सोय झालेली असते. आम्ही गेल्या गेल्या आम्हाला गरम गरम चहा मिळतो. युद्ध म्हणजे ट्रिप नाहीये. जिवंत राहू न राहू सांगता येत नाही. पण ही राष्ट्राची जबाबदारी आहे. त्यासाठी संसार बाजूला ठेवला. राष्ट्रासाठी आपला देह अर्पण केला. स्वामींना (शिवाजीराजांना) सुद्धा," गड आला पण सिंह गेला " या शब्दात आपल्याला झालेले दुःख व्यक्त करावे लागले. ही बुद्धी राष्ट्रामध्ये निर्माण व्हायला पाहिजे की नको! केवळ धनाने किंवा मानसन्मानाने अशी बुद्धी निर्माण होणार नाही.

म्हणून संत सांगताहेत. बुद्धीची सुधारणा अगोदर झाली पाहिजे. बुद्धी जर उत्तम प्रकारची मिळाली तर राष्ट्र आपोआप वर येते. शास्त्रकारांनी बुद्धीचा विकास हा भौतिक विकासापेक्षा श्रेष्ठ मानलेला आहे. आणि तो विकास होण्याकरता ईश्वराची भक्ती आवश्यक आहे. ईश्वराच्या शक्तीची त्यांना कल्पना आलेली आहे. त्यामुळे ते अनुभवाने सांगताहेत. केवढी मोठी शक्ती आहे! कर्तुम् अकर्तुम् अन्यथा कर्तुम् सामर्थ्य त्या ईश्वराचे आहे. हे ज्यांना समजून आले आहे त्यांच्या प्रेमाला काही अंत नाही. त्यांच्याकरता ईश्वर नेहमी अवतार घेतो. सहाय्य करतो. म्हणून भारतवर्षामध्ये आस्तिक्य बुद्धी महत्वाची आहे. ईश्वराच्या भक्तीने साम्यवाद निर्माण होऊ शकतो.

हा साम्यवादच आहे. सर्वांच्या बरोबर प्रेमाने वागणे,' कोणाही जीवाचा न घडो मत्सर। वर्म हे सर्वेश्वर पूजनाचे।' हा साम्यवाद आहे. महात्म्यांचा जो बुद्धिवाद, त्यांच्या दृष्टीनें हा साम्यवाद आहे. कोणाचाही मत्सर किंवा द्वेष करायचा नाही.

भारतवर्षामध्ये ईश्वर आस्तिक्य बुद्धी ही महत्वाची आहे. अनेक संतमहात्मे इथे झाले, होताहेत, चालू आहे कार्य. ईश्वराचे अनेक अवतार झाले आहेत. आमच्या पूर्वजांचे प्रत्येक विषयाचे ज्ञान चांगले होते. चांगले आहे. ते परत चांगल्या रितीने उपयोगात आणणे शक्य आहे, ही अस्मिता निर्माण झाली पाहिजे. गुणग्राहक बुद्धी झाली पाहिजे. गुणग्राहकता म्हणजे फक्त दुसऱ्याचेच गुण जाणणे नाही तर आपल्याकडेही काय गुण आहेत हे समजले पाहिजेत. 'आपल्याजवळ काहीच गुण नाहीत. आपल्या राष्ट्रात काहीच अर्थ नाही, दुसऱ्या राष्ट्रात आहे.' ही काही गुणग्राहकता नाही. दुसऱ्याने सांगितल्याप्रमाणे आपली बुद्धी जाणे हा आपला दोष आहे. आपल्या जवळही पुष्कळ ज्ञान होते, पुष्कळ आहे, पुष्कळ मिळवू शकतो. आणि त्याच्याकरता ईश्वराची आराधना, भक्ति हा एक मार्ग संतांनी घालून दिला आहे. आणि त्या शुद्ध प्रेमाच्या बलाने ऊन असो, पाऊस असो, थंडी असो, हजारो लोक पंढरपूरला जाताहेत. चाललेले आहे. कितीही आणखी गर्दी असली तरी थांबताहेत. चार चार पांच पांच तास उभे राहून दर्शन घेऊन जाताहेत. ही त्यांची स्थिर बुद्धी संतमहात्म्यांनी निर्माण करून दिलेली आहे. ती पिढ्यान् पिढ्या चालत आलेली आहे. तशा प्रकारची बुद्धी राष्ट्राच्या, समाजाच्या ऐक्याला ही



पूरक आहे. 'ईश्वराची भक्ति करा' म्हणजे राष्ट्र सोडून जा असे नाही. राष्ट्राला सुद्धा ते ईश्वरच मानतात ना!



म्हणणारे संत महात्मे. त्यांच्यापुढे राष्ट्रवाद नाही असे कोण म्हणेल? पण त्यांचा मार्ग हा. त्यांनी मांडलेल्या बुद्धीवादाचा आम्ही विचारच करीत नाही. म्हणून त्याला सोडून द्यायचे आणि आपल्या बुद्धीप्रमाणे कार्य करायचे असं चाललेले आहे. त्यात तरी प्रत्येक वेळी कुठे यश येते? स्वातंत्र्यप्राप्तीनंतर आम्हाला अजून घडी बसवता आलेली नाही. आचार्य महाराज संन्यासी होते, तत्वज्ञानी होते. केव्हांही समाधि लावून कुठेही बसू शकत होते. संपूर्ण देशभर संचार करून सर्वांना मार्गदर्शन त्यांनी केले. भक्तीमार्गाचा पुरस्कार केला. त्यांच्या मार्गदर्शनाप्रमाणे ज्ञानेश्वर आणि इतरही संतमहात्म्यांनी भक्तीमार्गाचा पुरस्कार केला. आणि तो मार्ग आपल्या राष्ट्रामध्ये जास्त वाढला तरच ही गुणसंपत्ती निर्माण होईल. आमची बुद्धी मर्यादित होत चालली आहे. तिचा विकास थांबला आहे. ती मर्यादित बुद्धी अमर्याद झाली पाहिजे. सर्वच वासुदेव आहे हे समजणारा महात्मा असू शकतो. महान आत्मा म्हणजे ज्याची बुद्धी विशाल झालेली आहे. त्या विशाल बुद्धीचे, वासुदेवच सर्वत्र आहे हे समजणे, द्योतक आहे. सुख दुःख हे पूर्व संचिताप्रमाणे मिळत असते वगैरे सिद्धांत त्यांच्या बुद्धीला पक्के पटलेले आहेत. त्यामुळे त्यांच्या मनात स्वार्थ नाही. महाराष्ट्रातील संतांनी इतके ग्रंथ करून ठेवलेत की ते आपल्याला पहायला सवड नाही. कारण त्याची जिज्ञासाच नाही. सगळा हा बाहेरचा देखावा, तेच ज्ञान खरे आहे हीच आमची

बुद्धी झाली आहे. आपल्याकडे किती ज्ञान आहे, संतांनी शांतीचे किती मार्ग सांगितले आहेत ते सगळे पहायची आपल्याला बुद्धी व्हावी, त्याचप्रमाणे त्यांनी केलेल्या मार्गदर्शनाप्रमाणे वागण्याचीही बुद्धी झाली पाहिजे. बुद्धीतले दोष जाऊन ती बुद्धी ईश्वरप्रेमाने भरुन गेली पाहिजे. म्हणजे ती गुणसंपन्न होऊन कार्य सुलभ होईल. अशी बुद्धी होण्याकरता भगवान् गणेश म्हणा भगवान् वासुदेवांच्या चरणी प्रार्थना करुया.

**।।अवधूत चिंतन श्री गुरुदेव दत्त।।**



# संतसंग देई जरा

**मालाकमंडलुरधः करपद्मयुग्मे।**
**मध्यस्थपाणियुगुले डमरुत्रिशूले।।**
**यस्य स्त ऊर्ध्वकरयोः शुभशंखचक्रे।**
**वंदे तमत्रिवरदं भुजषट्‌कयुक्तम्।।**

**श्री नारायण** महाराजांचा जन्मशताब्दी महोत्सव आज वर्षभर चालला आहे. आज विशेष रुपाने या ठिकाणी पुण्यामध्ये तो केला गेलेला आहे. सत्यनारायण व्रताचे अनुष्ठान केडगांव बेटामध्ये पुष्कळ वेळेला आणखी पुष्कळ प्रकारांनी झालेले आहे. शेवटी इथे जे सत्यनारायण झाले ते सात दिवस अहोरात्र चालू होते. चोवीस तास. बाकीची पुष्कळ अनुष्ठाने झाली. वेदपारायणे त्याचप्रमाणे पुराणादिकांची पारायणे, कीर्तने, प्रवचने असे अनेक कार्यक्रम त्यावेळेला सात दिवस अखंड चाललेले होते.

तर महाराजांचा जन्मशताब्दी उत्सव आहे. आणि या महिन्याच्या शेवटच्या सप्ताहामध्ये बेटामध्ये त्याची सांगता होणार आहे. संतांचे जीवन काय असतं हे शास्त्रकारांनी सांगितले आहे. सर्वांचे हित करावे इकडे त्यांची नैसर्गिक प्रवृत्ती असते. आता सर्वांचे हित करणं हे काही सामान्य व्यक्तीला शक्य नाहीये. सामान्य जीवाला तशी शक्ती नाहीये. काही संतांची चरित्रं वाचून म्हणा, प्रवचनांचा अभ्यास करून म्हणा काही

प्रवचन रुपाने सांगता येईल. पण जीवाचे हित करायचे, जीवाचा उद्धार करायचा ही शक्ती काही सर्व जीवांमध्ये नाहीये. ती शक्ती अशा प्रकारचे जे महापुरुष असतात त्यांची शक्ती आहे. वस्तुतः भगवान् अशा महापुरुषांना 'सर्व संकल्प संन्यासी' म्हणतात. कांहीही संकल्प नाही पण पुन्हा त्यांनी सांगितले "सर्व भूत हिते रतः " कोणचाही संकल्प नाही असेही त्यांचे वर्णन केले आणि " सर्व भूत हिते रतः " म्हणतात. लक्ष आहे. सर्वही भूतांचे हित व्हावे इकडे लक्ष आहे. ही जी काही त्यांची स्थिती आहे, लोकोत्तर महापुरुषांची, त्यामुळे सर्वही भूतांच्या हिताचा मार्ग ते दाखवू शकतात. त्याप्रमाणे आचरण करणे हे आपले काम आहे. मार्गदर्शन करण्याचे त्यांचे कार्य अखंड चाललेले आहे.

त्यांनी केलेल्या मार्गदर्शनात जर आमच्या मनात काही शंकाकुशंका निर्माण झाल्या, संदेह निर्माण झाले आणि आम्हीच जर संकल्प विकल्प करीत बसलो तर (त्यांच्या मार्गदर्शना प्रमाणे) आचरण काय त्यांनी करायचे काय? कसं वागावं लोकांनी आणि आपला उद्धार करून घ्यावा हे सांगण्याकरता संतांचा अवतार होतो. भगवान दत्तात्रेयांचा अवतार हा सद्गुरु स्वरूप अवतार आहे. रामकृष्णादि अवतार झाले ते एका विशिष्ट कार्यासाठी होते. रावणाचा नाश करायचा होता, कंसाचा नाश करायचा होता. धर्मविरोधी वृत्तीच्या लोकांचा नाश करूनच भगवंतांना धर्माची स्थापना करायची होती. त्याशिवाय कांही झाली नसती. तसं इथे कार्य नाहीये. दत्तात्रेय अवतारामध्ये प्रत्यक्ष शस्त्र हातात घेऊन कोणाचा नाश केला आहे असे नाही.

सर्वांचा हितकारक मार्ग कोणचा आहे. तो दाखवून देण्याचे काम ते करतात. म्हणजे ज्ञानशक्तीही मोठी असली पाहिजे. अनंत जीव आहेत. त्या अनंत जीवांना मार्गदर्शन करून त्यांचा



उद्धार करण्याकरता हा अवतार घेतलेला आहे. म्हणजे या अवतारालाही मर्यादा नाहीयेत. रामकृष्णादि अवतारांचे कार्य हे मर्यादित होते. त्यांनीही उपदेश केलेले आहेत. परंतु मुख्यतः जे काही दुर्जन निर्माण झालेले होते किंवा त्यांचे अनुयायी या सर्वांचा नाश करून धर्मशील सज्जनांना निर्वेध मार्ग करून देणं आणि धर्माची स्थापना त्यांच्या द्वाराने करणं हे कार्य झाल्याबरोबर त्या अवताराची परिसमाप्ती झाली.

आता हे दत्तात्रेय अवताराचे कार्य मर्यादित का नाहीये तर हा अवतार सद्गुरू अवतार आहे. मार्गदर्शक अवतार आहे. अज्ञान नाश करण्याकरता झालेला अवतार आहे. जीवांना मुक्त करण्याकरता झालेला हा अवतार आहे. जीवांची संख्या काही सांगता येत नाही. किती जीव आहेत. आज अंदाजाने मानवांची संख्या सांगता येते. लोक गणना केली जाते पण ती अगदी निश्चित असते असे कांही म्हणता येणार नाही. पण या मानवाच्या पेक्षा सुद्धा इतर योनींमध्ये जन्माला आलेले पुष्कळ जीव आहेत. त्यांचा विचार करायचा की नाही? कदाचित त्या योनीतून पुन्हा मानव जन्मात पुढे येणार असतील ते जीव. त्यांनाही मार्गदर्शन करायचे आहे. भूतकाळात होऊन गेलेले जीवात्मे, आज असणारे, पुढच्या काळामध्ये होणारे जीवात्मे, या सगळ्यांनाही मार्गदर्शन करणारा हा अवतार आहे. म्हणजे या अवताराला कालमर्यादा नाहीये.

ईश्वर नित्य आहे असे सांगतात योगसूत्रकार. ईश्वर सर्वांचा गुरू आहे कारण त्याला कालमर्यादा नाहीये. कालमर्यादा जीवात्म्याला आहे. जन्माला जरी आला तरी त्याच्या आयुष्याची कालमर्यादा ठरलेली आहे. मानव जन्मामध्ये सुद्धा पूर्ण आयुष्य पदरात पडेल असे काही सांगता येत नाही. अशी कालमर्यादा

जीवांना आहे. ईश्वराला ती मर्यादा नाहीये. म्हणून सर्वही कालांमध्ये असणारे जे अधिकारी जीवात्मे आहेत त्यांना मार्गदर्शन करण्याचे कार्य ईश्वर करू शकतो. म्हणून ईश्वर गुरू आहे.

ब्रह्मादिक जीवांनासुद्धा मार्गदर्शन करून त्यांच्या द्वाराने सृष्टीकार्य ईश्वर करतो आहे. म्हणून दत्तात्रेय अवतार हा अनंत आहे. त्याला मर्यादा नाहीये. आणि देश मर्यादाही नाहीये. भगवान् दत्तात्रेयांची पुष्कळ रुपं आहेत. त्रिभुज आहे, चतुर्भुज आहे, षड्भुज आहे. अनुसूयेच्या पोटी अवतार घेऊन दत्तात्रेयांचे कार्य अविच्छिन्नपणे चालले आहे. याही रुपामध्ये त्यांचा सर्वत्र संचार आहे म्हणून सांगतात. दत्तात्रेयांची दिनचर्या एका स्तोत्रामध्ये सद्गुरू वासुदेवानंद सरस्वती महाराजांनी लिहिलेली आहे. नक्षत्र मालिका नावाचे ते स्तोत्र आहे. सत्तावीस श्लोकांचे.

**यस्यास्ति माहुरे निद्रा निवासः सिंहपर्वते ।**
**प्रातःस्नानं च गंगायां ध्यानं गंधर्व पत्तने ।**
**कुरूक्षेत्रे चाचमनं धूतपापेश्वरे तथा।**
**विभूतीधारणं प्रातःसंध्या च करहाटके।**
**कोल्हापुरेस्य भिक्षा च पांचालेऽपि च भोजनं।**
**तिलको विठ्ठलपुरे तुंगापानं दिने दिने।**
**पुराणश्रवणं यस्य नरनारायाणाश्रमे।**
**विश्रामो रैवते सायंसंध्या पश्चिमसागरे।**

ही भगवान् दत्तात्रेयांची दिनचर्या आहे.

माहूर क्षेत्रामध्ये अत्रिअनसूयेचा आश्रम आहे. तिथे त्यांचे वास्तव्य आहे. आणि तिथून ते रोज सबंध भारत वर्षात संचार करतात.



काशीमध्ये त्यांचे रोज प्रातःकाळी गंगास्नान होते. आणि कऱ्हाडला कृष्णा-कोयना संगमावर ते प्रातःसंध्या करतात. आता ही दिनचर्या ठेवायची म्हणजे त्यांच्या जवळ काय हेलिकॉप्टर आहे का विमानाची सोय आहे? आणि इतकी सोय करणे कोणाला शक्य आहे काय ? कशाकरता करायची? त्यात तुमचा फायदा काय? हल्लीची राष्ट्रीय संत मंडळी आहेत त्यांची यायची जायची सगळी व्यवस्था सरकार करते. स्पेशल गाडी दिलेली आहे. अशा संतांनी लोकांमध्ये चांगली बुद्धी निर्माण करण्याचा प्रयत्न करावा असे सरकारला वाटते. म्हणजे राजसत्तेलासुद्धा आपल्यापेक्षा संतांची शक्ती जास्त आहे असे वाटते म्हणायला हरकत नाही. धर्मातीत राजशासनाची घोषणा त्यांनी जरी केली असली तरी अशी व्यवस्था त्यांनी केली आहे. बुद्धीला कांही तरी मार्गदर्शन करणारी मंडळी पाहिजेत.

तर भगवान् दत्तात्रेयांचा सर्वत्र संचार रोज असतो म्हणतात. याचा उद्देश काय आहे? अनेक ठिकाणी जीवात्मे आहेत. साधक मंडळी पुष्कळ स्थानांत आहेत. भाषेचा अभिमान असणे स्वाभाविक आहे. त्यामुळे भाषावार प्रांतरचना झाली. पण ईश्वराच्या जवळ सगळे प्रांत सारखे. 'आमची अमुक भाषा आहे, ' असे ईश्वर म्हणत नाही. सर्वच भाषा त्याच्या आहेत. सर्वच प्रांत त्याचे आहेत. सर्वही जीवात्म्यांची बुद्धी कशी आहे? त्या बुद्धीची योग्यता काय आहे? हे निरीक्षण फक्त एक परमात्माच करू शकतो.

**ईश्वरः सर्वभूतानां हृद्देशेऽर्जुनतिष्ठति**

हे गीतेच्या शेवटी सांगितले आहे.

ईश्वर आम्हाला दिसत नाही. मग कशाला तो मानायचा, वगैरे पुष्कळ चिकित्सा आपण करतो. ईश्वर दिसत नाही खरा पण तो हृदयस्थ आहे, प्रेरक आहे असे त्याचे स्थान स्वतः ईश्वरानेच सांगितले आहे. बुद्धीला प्रेरणा करायची आहे. म्हणजे किती कठीण काम आहे. आणि सर्वांच्या बुद्धीला प्रेरणा करणारी ईश्वरशक्ती जी आहे त्याला अंतर्यामी म्हटलेले आहे, बृहादारण्यक उपनिषदामध्ये! सर्वत्र अंतर्यामी तो आहे. सर्वांच्या बुद्धीला प्रेरणा करायची म्हणजे त्याची किती शक्ती असली पाहिजे? त्याकरता सर्व ठिकाणी त्याचे वास्तव्य पाहिजे. सर्वांच्या हृदयात त्याचे अस्तित्व असले पाहिजे. आणि त्या बुद्धीला प्रेरणा करून कार्य करवून घ्यायचंय म्हणजे तेवढी शक्ती पाहिजे. म्हणजे कोण जीव कोणत्या योग्यतेचा आहे हे पहाण्याकरता दत्तात्रेय रोज सर्वत्र संचार करतात.

चंदन लावण्यासाठी दत्तात्रेय पंढरपूरला जातात. भिक्षा मागायला कोल्हापुरामध्ये जातात. आणि जेवण्याकरता पांचाळेश्वरला, गोदावरीच्या तीरावर. तर अशा अनेक स्थानामध्ये जे साधक जीव असतील त्यांना काय अडचणी आल्या आहेत हे ते स्वतः पाहातात. प्रतिबंध कोणाचे आहेत या साधकांच्या साधनामार्गात हे पहायचंय. अनेक प्रकारचे प्रतिबंध असतात. प्रयत्न करतो आहे मनुष्य. प्रपंचामध्येही आपण प्रयत्न करतो. पारमार्थिक प्रयत्न करणारीही मंडळी आहेत. नाही असं नाहीये. पण त्या प्रयत्नांमध्ये प्रतिबंधही पुष्कळ आहेत. अनेक प्रकारचे प्रतिबंध उत्पन्न होतात. ते सगळे प्रतिबंध दूर करून साधकांचा मार्ग निर्वेध करणं, त्यांचा प्रयत्न सफल करणं, त्यांना सहाय्य करणं हे कार्य दुसरं कोण करणार? आपल्या आपल्या स्थानामध्ये त्यांना जिथे राहाता येईल तिथं ते बिचारे राहातात, साधनाभ्यास



करताहेत, उपासना करताहेत त्या ठिकाणी दुसरा सहाय्य करणारा कोण आहे? आणि बुद्धीची सुधारणा ही काय राजशासनाला करता येणे शक्य आहे? आज आपण सगळीकडे चाललेल्या संघर्षाबद्दल वाचतो, ऐकतो. बुद्धीमध्ये सुधारणा कायद्याने होणार नाही. निरनिराळ्या प्रकारांनी कायद्याच्या विरुद्धही वापरली जाणारी बुद्धि आपण पहातो. त्यातून कायद्याच्या विरुद्ध न वागता कायद्याला अनुसरून आपल्याला अनुकूल असेही चतुरपणे वागता येते. हे बुद्धीचे चातुर्य आहे. ही जी बुद्धि आहे ह्या बुद्धीवर नियंत्रण करण्याची शक्ती राजशासनात नाहीये. कारण तेही जीवच आहेत ना! शासनकर्ते तरी जीवच आहेत. त्यांच्या बुद्धीची शक्ती मर्यादित आहे. मर्यादित बुद्धीच्या शक्तीने दुसऱ्याच्या बुद्धीचे नियंत्रण करणे शक्य नाही. कोणचा दोष उत्पन्न झालेला आहे बुद्धीमध्ये याचे अगोदर ज्ञान पाहिजे. पूर्ण ज्ञानशक्ती असल्याशिवाय नियंत्रण शक्ती निर्माण होऊ शकत नाही. नाही तर रोग असायचा एक आणि औषध दिले जायचे दुसरे. अशा प्रकारची योजना होऊन जायची.

म्हणून ही जी सर्व ज्ञानशक्ती आणि क्रियाशक्ती आहे ह्या शक्तीचा अविर्भाव या दत्तात्रेय अवतारामध्ये झालेला आहे. आणि सद्गुरू नारायण महाराजांनी दत्तात्रेयांचीच उपासना पुष्कळ दिवस केली आहे. नरसोबाच्यावाडीलाही त्यांचे येणे जाणे होते. आमच्या घराजवळच एक पुजारी राहातात त्यांच्या माडीवर ते येऊन राहायचे. आम्ही लहान होतो त्या वेळेला. गाणगापुरामध्येसुद्धा त्यांनी पुष्कळ उपासना केलेली आहे. आणि तिथून त्यांना आदेश झाल्यावर ते इकडे आले.

भगवान् दत्तात्रेयांचे कृतयुगापासून कार्य चालू आहे. अनेक अवतार आहेत, त्या त्या अवतारांची कार्यं चालू आहेत. प्रत्येक

जीवांची अभिरुची वेगळी वेगळी आहे. त्या त्या उपासकाच्या अभिरुचीप्रमाणे तशी तशी स्वरूपं धारण केलेली आहेत भगवंतांनी. आणि उपासनामार्गामध्ये कोणचीही उपासना करायला परवानगी आहे. उपासनामार्गामध्ये प्रतिबंध नाही. मंत्रशास्त्रामध्ये उपासकाच्या अधिकाराचा विचार केला जातो. कोण कोणच्या मंत्राचा जप करावा किंवा न करावा हा सगळा विचार करावा लागतो. योगशास्त्रामध्येसुद्धा प्राणायामादिक ज्या प्रक्रिया आहेत त्यांचा अभ्यास करण्याचा अधिकारी कोण आहे हा विचार केला जातो. वाटेल त्याला त्याप्रमाणे अभ्यास करणे शक्य नाहीये. पण या उपासनामार्गामध्ये मात्र त्यांनी पुष्कळ परवानगी दिलेली आहे.

भगवत् गीतेमध्ये भगवंतांनी सांगून ठेवले आहे.

**यो यो यां यां तनुं भक्तः श्रध्दयार्चितमिच्छति।**
**तस्य तस्याचलां श्रध्दां तामेव विदधाम्यहम्।।**

ज्यांना ज्यांना ज्या ज्या स्वरुपाबद्दल श्रद्धा वाटत असेल, भक्ती, प्रेम वाटत असेल त्यांना त्या स्वरुपाची भक्ती करायला हरकत नाही. म्हणून आपल्या घरामध्येसुद्धा कुलदेवता म्हणून एक असते निराळी, परंपरेने चालत आलेली आणि इष्ट देवता म्हणून एक निराळी आहे. ज्याची भक्ती ज्या स्वरुपाच्या ठिकाणी स्थिर असेल ती देवताही त्याला ग्राह्य आहे. असा उपासनामार्गामध्ये प्रतिबंध ठेवलेला नाही. कोणीकडून तरी जीवाचे अंतःकरण विषयापासून बाजूला होऊन ईश्वराच्या ठिकाणी लागणं यालाच महत्व आहे.

त्यातल्या त्यात कृतयुगापासून चालत आलेल्या दत्तात्रेय



अवताराची कार्यं चालू आहेत. केवळ दत्तात्रेयांचे भक्त असणारे पुष्कळ आहेत. आणखी दत्तात्रेयांनी श्रीपादश्रीवल्लभ आणि नरसिंह सरस्वती हे जे दोन अवतार धारण केले त्यांचीही उपासना करणारी मंडळी महाराष्ट्रात पुष्कळ आहेत. श्रीपादवल्लभांचा अवतार आंध्र प्रांतात झालेला आहे. नरसिंहसरस्वतींचा महाराष्ट्रात झाला. त्यांचे चरित्र, त्यांची उपासना महाराष्ट्रात सर्वत्र प्रसिद्ध नाही. आंध्र प्रांतात पीठापूर क्षेत्रात त्यांचा जन्म झाला एवढीच माहिती आहे. गुरूचरित्रामध्ये त्यांचे थोडेसे चरित्र दिले आहे. दोन चार कथा आहेत. पीठापूर क्षेत्रामध्ये श्रीपाद आडनांवाची मंडळी आहेत. पण श्रीपादश्रीवल्लभ अवताराची आम्हाला कांहीही माहिती नाही असे ते सांगतात. ज्ञानेश्वर महाराजांच्याही पूर्वी हा अवतार झाला असावा. पण या कलियुगामध्ये अवतार धारण करून त्यांनी जे कार्य केले, त्यांचीही उपासना पुष्कळ ठिकाणी चालू आहे. म्हणजे दत्तात्रेयांचीच उपासना चालू आहे. या रूपाने चाललेली आहे.

तर भगवान् दत्तात्रेयांची उपासना ही वाढावी म्हणून महाराजांनी पुष्कळ प्रयत्न केले. आता अशा सत्पुरुषांच्या किंवा महापुरुषांच्या बुद्धीमध्ये जरी एखादी देवता असली किंवा त्या देवतेचे मंदिर त्यांनी बांधले तरी बाकीच्या देवतांबद्दल अनादर असण्याचे कारण नाही. एकच परमात्मा सर्वत्र आहे. आणि त्यानेच ही भिन्न भिन्न रुपे धारण केली आहेत. ही तत्वदृष्टी त्यांना पक्की असल्यामुळे त्यांच्या मनांत कांही चलबिचल नाही. लोकांच्या कल्याणाकरता म्हणून त्यांनी ही उपासना सांगितली. तर अशा महापुरुषांचे कार्य भारतवर्षामध्ये अखंड चाललेले आहे. सद्गुरू नारायण महाराज यांचे आणखी कर्मयोगावरतीही विशेष लक्ष होते. संध्योपासनेची त्यांची वेळ कधीही चुकलेली नाही, मग

प्रवासात असोत किंवा आणखी कुठे असोत. कारण सर्वही मार्ग शास्त्रीय आहेत ना! शास्त्र म्हणजे ईश्वराची आज्ञा आहे. ईश्वराने कर्मयोगाचे, भक्तीयोगाचे आचरण करण्यास सांगितले आहे. अधिकार असेल तर योगाभ्यास करण्यास सांगितले आहे. पण त्यातल्या त्यात ब्राह्मणधर्म या दृष्टीने संध्योपासना, गायत्री जप वगैरे महत्वाचा आहे हे त्यांनी स्वतःच्या आचरणाने दाखवून दिले आहे.

किती कार्यं चाललेली असायची! हा कर्मयोग आहे. भक्तीयोग तर दिसतोच आहे. सर्व लोकांकरवी सत्यनारायण करण्याचे कार्य चालू आहे. त्याचप्रमाणे ज्ञानयोगाचेही उदाहरण आहे.

ज्ञान ज्ञान म्हणजे भगवंतांनी तेराव्या अध्यायामध्ये जे सांगितलेले आहे.

**अमानित्वमदाम्भित्वमहिंसा क्षान्तिरार्जवम्।**
**आचार्योपासनं शौचं स्थैर्यमात्मविनिग्रहः।।**

हे गुण सांगितले आहेत. तेच ज्ञान आहे. अमानित्व सिद्ध झालं म्हणजे ते ज्ञानच आहे. ज्ञान आणखी दुसरे कोणते? 'अहम् ब्रह्मास्मि' नुसते म्हणत बसणं वेगळे. पूर्ण अमानित्वाची व्याख्या ज्ञानेश्वर महाराजांनी करताना म्हटलं आहे-

**पूज्यता डोळा न देखावी।**
**स्वकीर्ति कानी नायकावी।**
**हा अमुका ऐसी नोहावी।**
**सेची लोका।।**



हे अमानित्वाचे लक्षण आहे. ह्या अमानित्वाचा अभ्यास व्हायला किती काळ जायला पाहिजे! चार किंवा सहा वर्षांचा महाविद्यालयातला कोर्स आहे का हा? पूज्यता डोळा न देखावी।

हे शक्य आहे काय? कितीही अभ्यास करू देत. आपल्या गळ्यात हार घातलेला पहायला मिळावा, आपली पूजा केलेली पहायला मिळाली, आपली स्तुती केलेली पहायला मिळावी. तिकडे ज्ञानराज म्हणतात,'स्वकीर्ति कानी नायकावी।' हे शक्य कसं आहे? ह्या सगळ्याचा आमचा जन्मापासून अभ्यास झालेला आहे. आणि माझी आठवण कोणालाही होऊ नये, ही शेवटची अमानित्वाची व्याख्या आहे. भगवंताने सांगितलेला एकेक गुण, ज्याचे भगवंताने ज्ञान म्हणून वर्णन केलेले आहे. तो पूर्णपणे आपल्या अंगी बाणवायचा हा अभ्यास किती तरी जन्म केला तरी पूर्ण होणार नाही. त्यातही कांही तरी प्रतिबंध येतात. कांही तरी प्रयत्न शिल्लक राहातो. बळीराजाने दान केल्याची कथा सर्वांना माहीत आहे. वामन वेषात भगवंतांनी येऊन त्याच्याकडे तीन पावले भूमी मागितली. बळीराजाने हसून म्हटले,"माझ्यासारख्या राजाजवळ फक्त तीन पावले भूमी मागतोस? निदान शेदोनशे एकर जमीन तरी मागून घे. म्हणजे तुला जन्मभर कसली विवंचना करावी लागणार नाही." म्हणजे हे बोलणे अहंकाराचेच आहे.

वामनांनी सांगितले,"नको मला तेवढी पुरे. जास्ती घेण्याची आवश्यकताच नाही." आणि ज्या वेळेला बळीराजाने दान केले व भगवंतांनी आपले विश्वरुप प्रगट केले तेव्हां त्या तीन पावलात सर्वस्व घेतले. स्वर्ग आणि भूमी दोन पावलात घेतली. पण त्या दानाचे फळ त्याला मिळाले. त्या दानाच्या निमित्ताने बळीराजाला विश्वरुप दर्शन झाले. हे मोठे फल आहे. विश्वरुपात दर्शन

घेण्यासाठी अर्जुनाला प्रार्थना करावी लागली. त्याला पुन्हा दिव्य दृष्टी द्यावी लागली. त्याशिवाय तो विश्वरुप पाहू शकत नव्हता. सगळी तयारी करून भगवंतांनी विश्वरुप दाखवले. बळीराजाला आपोआप विश्वरुप दर्शन झाले. हे फल मिळाले. पण मनामध्ये त्याच्या थोडा अहंकार शिल्लक राहिलेला आहे. मानित्व आहे, अमानित्व नाहीये. वामनांनी विचारले,"तिसरा पाय कुठे ठेवायचा? नरकात?"

बळीराजाने सांगितले,"मी जे काही दान केलेले आहे ते पूर्ण करायला मी तयार आहे." वामन म्हणाले,"कुठे ठेवायचा पाय? जमीन संपली की." बळीराजा म्हणाला," हे माझे शरीर शिल्लक आहे की. माझ्या मस्तकावर तिसरा पाय ठेवा. म्हणजे त्रिपाद भूमी देण्याचा माझा संकल्प पूर्ण होईल की नाही? माझा संकल्प मी पूर्ण करणार." आत्मनिवेदन केले. बळीराजाने शरीरही देऊन टाकले. बाह्य दृष्टीने अतिशय मोठे दान आहे. राहायलासुद्धा जागा नाही. शरीरसुद्धा परतंत्र झालेले आहे. वामन सांगतील तसे ऐकावे लागेल. हे सगळे जरी झाले तरी बळीराजाच्या बुद्धीमध्ये जो दोष राहिला आहे तो त्याच्या पत्नीने प्रकट केला आहे. तिने प्रार्थना केली," देवा, ह्यांच्या बुद्धीत थोडी सुधारणा होणे आवश्यक आहे. तेवढी आपण सुधारा. हे अजून म्हणताहेत- माझे शरीर आहे त्याच्यावर तिसरा पाय ठेवा, त्रिपाद भूमी द्यायचा माझा संकल्प आहे. तुमचे विश्वरुप दर्शन होऊनसुद्धा काही उपयोग नाही. ह्यांचे शरीर जे हे म्हणतात ते त्यांनी कुठून आणले? पंचमहाभूतं जी निर्माण केली आहेत ती कोणाची आहेत? पंचमहाभूतांच्या अंशापासून निर्माण झालेले हे मानवी शरीर हे ह्यांनी कधी तयार केले? आईच्या उदरामध्ये पंचमहाभूतांचे अंश कसे जमा झाले? ते वाढले कसे? गर्भावस्था कशी कशी



परीणत झाली? हे काय ह्यांचे सामर्थ्य आहे? म्हणजे देहाबद्दल कोणच्या रुपाने ह्यांचे कर्तव्य आहे? कांही नाही. असं असतानासुद्धा हा माझा देह मी अर्पण करतो असं कसं हे म्हणतात? मग या दानाचा काय उपयोग ? याला दान म्हणता येत नाही." ईश्वराला सर्वस्व दान करुनसुद्धा मानित्व गेलेले नाही. हे अमानित्व सिद्ध करायला किती अभ्यास केला पाहिजे. केव्हांही मनांत अशाप्रकारचा अभिमान उत्पन्न न होणं ही वृत्ती निरंतर राहिली पाहिजे.

**'अहंकाराचा वारा न लागो राजसा।**
**माझिया विष्णुदासा भाविकांसी।'**

नामदेव महाराजांनी मुद्दाम देवाजवळ ही प्रार्थना केली आहे. हे मागणे मागितले आहे. हे एवढे द्या. हे तुम्हीच देऊ शकता. बुद्धि शुद्ध करण्याचे कार्य ईश्वराशिवाय कोणीही करु शकणार नाही. जरी पुष्कळ तपश्चर्या केली आणि त्या तपश्चर्येचाच अभिमान उत्पन्न झाला तर! तपश्चर्येने बुद्धि शुद्धी होते. यात कांही वाद नाही. पण त्याच बरोबर, 'मी तपश्चर्या केली,' हा एक दोष त्या बुद्धीत निर्माण होतो. या सगळ्याही चक्रव्यूहातून सुटायचे आहे. आणखी अत्यंत शुद्ध बुद्धीने ईश्वराजवळ जायचे आहे. हे मानवाच्या प्रयत्नांनी कसे शक्य आहे? कोणी शिकवून तरी कसे शक्य आहे? म्हणून ईश्वराचीच उपासना सर्वांनी करावी असे संतांचे सांगणे आहे.

**किंबहुना सर्व सुखी।**
**पूर्ण होऊन तिन्ही लोकी।**
**भजिजो आदि पुरूषी अखंडीत।**

अखंड भजन चालू ठेवा. ज्ञान झालं तरी सोडू नका. केव्हां अभिमान होईल कांही सांगता येत नाही. ज्ञान झाले तरी पूर्णावस्था येण्याकरता भक्तीची आवश्यकता आहे. आरंभी कर्मभूमिकेत, भक्तीभूमिकेत, योगभूमिकेत तर भगवंताचे सहाय्य आवश्यकच आहे. केवळ आपल्या प्रयत्नांनी होऊ शकत नाही. यात पराधीनता आहे असा याचा अर्थ नाही. ईश्वराची भक्ती करणं, ईश्वराचे सहाय्य मिळवण्यासाठी प्रार्थना करणं म्हणजे स्वतःचे पौरुष काय राहिले, स्वतः जीवाने काय करायचे? सहाय्याची याचना करायला नको का? ईश्वराचे सहाय्य मागणे हा कांही दोष नाही. स्वतःची बुद्धि आहे. परंतु त्या बुद्धीमध्ये कोणच्या वेळेला बिघाड निर्माण होईल याचा काही नेम नाही. बिघाड निर्माण झाल्यानंतर त्याचे शोधन कसे करायचे? हे कसे समजणार? म्हणून निर्दोष फक्त परमात्मा आहे असे भगवान सांगताहेत.

निर्दोष परमात्माच सर्वांच्या बुद्धीत उत्पन्न झालेले दोष दूर करु शकतो. म्हणून त्याच्या सहाय्याची अपेक्षा आहे. सर्व ही जी साधनं सांगितलीत, ती करायची जीवांनी. कर्म योग आहे, उपासना योग आहे. योगाभ्यास आहे. सगळी साधनं आहेत. पण जीवांचे कर्तुत्व पूर्णतेला जाण्याकरता ईश्वराच्या सहाय्याची आवश्यकता आहे. म्हणून ईश्वर प्रणिधान योगशास्त्रकारांनी सुद्धा मान्य केले आहे.

याकरता संत, देवांची चरित्रं सांगून देवाकडे लोकांचे लक्ष लावून हित करतात. म्हणून भगवंतांनी संतांचे वर्णन 'सर्वभूतहितेरतः' असे केले आहे. सर्व भूतांचे हित मुख्य आहे. ईश्वराकडे लक्ष लागणे हे त्यांचे हित आहे. त्याकरता किती प्रतिबंध उत्पन्न होतात. जरी ईश्वराची चरित्रं ऐकली तरी ईश्वराकडे लक्ष लागेल असं सांगता येत नाही. म्हणून संतांचे हे मोठे कार्य



चाललेले आहे. आणि त्यांची संगती दुर्लभ आहे असे आचार्य महाराज सांगतात. महापुरूषांची सतत संगती घडली पाहिजे. ते वारंवार उपदेश करीत असतात. मानापमानाकडे त्यांचे बिलकुल लक्ष नाही. मान आणि अपमान हे दोन्ही विकार त्यांनी जिंकले आहेत. कोणी स्तुती केली तरी तिकडे लक्ष नाही. उपेक्षा आहे. निंदा केली तरी उपेक्षा आहे. फक्त समोर आलेल्या जीवात्म्याचे कल्याण व्हावे म्हणून अंतःकरणामध्ये अत्यंत दया आहे. हा संतांचा स्थायी भाव आहे. म्हणून त्यांच्याकडून उपदेश हा दया बुद्धीने केला जातो. स्वतःच्या शक्तीने ते त्या जीवाला स्थिर करवू शकतात म्हणून सद्संगतीचे महत्व शास्त्रकारांनी विशेष रुपाने सांगितले आहे. योगाभ्यास करणाऱ्यांना तर संतांची संगत अत्यंत आवश्यकच आहे. त्यांच्या संगतीत राहिल्याशिवाय प्राणायाम वगैरे योगाभ्यास करू नये असे सांगितले आहे. पुस्तके वाचून जर एखादा प्राणायाम करायला लागला तर त्याची काय अवस्था होईल याचा काही नेम नाही. त्यामुळे त्या वेळेला तर अशा शास्त्रज्ञ पुरूषांची संगती जरुरीची आहे. परंतु इतर वेळेससुद्धा आपल्याला मार्गदर्शन करणारे, अंतःकरणात दया असणारे जे आहेत त्यांची संगती अत्यंत उपकारक आहे. म्हणून परमेश्वराने जरी निरनिराळ्या वेळी अवतार धारण केले असले तरी संत हेही परमेश्वराचेच अवतार आहेत. त्यांना विभूती म्हणायला हरकत नाही. विशिष्ट तेज त्यांच्या ठिकाणी आहे. अमानित्व जे आहे, त्याला भगवान ज्ञान म्हणतात. ते ज्यांच्या चरित्रामध्ये आपल्याला पदोपदी दिसून येते आहे, त्यांना ज्ञानी भगवत् स्वरूप म्हणायला काही हरकत नाही.

नारायण महाराजांच्या अमानित्वाबद्दलची गोष्ट पाहिली होती. ती सांगतो. इथे अखंड सत्यनारायणाचे अनुष्ठान झाले

तेव्हां त्याला निमंत्रण करायच्या ब्राह्मणांच्या याद्या केल्या. धारवाडहून काही ब्राह्मण यायचे होते. त्यांना कोणत्या गाडीने निघायचे, कुठे उतरायचे, त्यांची स्टेशनवरून आणायची काय सोय केली आहे वगैरे सगळे पत्राने कळवले होते. त्याप्रमाणे सगळी मंडळी आली. आम्ही सगळे एक तंबूत बसलो होतो. इतक्यात महाराज बाहेर आले. आमचे धारवाडचे गुरुजीही त्यांच्याबरोबर होते. महाराजांच्या पायात पादत्राण होते. त्यांनी आम्हाला पायात घालून आत आलं तर चालेल का असे विचारले. हा प्रश्न ऐकून आम्हाला आश्चर्य वाटले, ज्यांच्या संकल्प शक्तीने हे कार्य चाललेले आहे. ते एखाद्या सामान्य माणसाप्रमाणे हा प्रश्न विचारतात म्हणजे एवढ्या मोठ्या कार्याबद्दल कर्तृत्वाभिमान जरा देखिल नाही. जणू काही इथे आपला काहीही संबंध नाही. ही केवढी अमानित्वाची भूमिका आहे.

तर अशा नारायण महाराजांच्या संगतीचा लाभ ज्यांना झालेला आहे अशी मंडळी आजही आहेत. या मंडळींना महाराजांचे असंगत्व, अमानित्व कसे होते हे अनुभवाला आले असेल, महाराजांची वृत्ती कशी होती हे समजले असेल तर भगवंतांनी ह्या गुणांनाच 'ज्ञान' म्हणून संबोधन केले आहे. दुसरे ज्ञान नाही. हे गुण संपादन केले पाहिजेत किंवा दोष असतील ते दूर केले पाहिजेत. त्यांनी सांगितले, अमानित्व हा गुण आहे, ज्ञान आहे आणि मान म्हणजे अज्ञान आहे तो दोष आहे. कोणचे दोष आहेत, कोणचे गुण आहेत हे सगळे भगवंतांनी स्वतः सांगितले आहे आणि ते समजून घेण्याकरतासुद्धा संत संगती झाली पाहिजे. नुसते अमानित्व हा गुण म्हणजे त्याच्या ठायी मानाची कल्पनाच नाही. ज्ञानेश्वर महाराजांनी लिहिले आहे, स्वतःची पूजा पाहायची इच्छा होऊ नये वगैरे सर्व विवरण केले आहे. तर हे कसं असू



शकतं प्रत्यक्ष कुठे पाहायला मिळते? नारायण महाराजांसारख्या सत्पुरुषांच्या संगतीत आपल्याला पहायला मिळते. त्यांचे स्वतःचे पूजेकडे लक्ष नाही, कीर्तीकडे लक्ष नाही. सामान्य जीवांप्रमाणे व्यवहार चालू आहेत. हे जे अमानित्व आहे हे प्रत्यक्ष पाहायला मिळण्याकरता अशा महापुरुषांच्या संगतीचा लाभ झाला पाहिजे. त्यावरून हे अमानित्व असं असलं पाहिजे, कसं संपादन केले पाहिजे, आपण निरभिमानी आहोत हे खरे आहे का? हे समजून घेण्याकरता अशा प्रकारच्या महापुरुषांच्या संगतीचा उपयोग होतो.

तर भारतामध्ये अशा प्रकारचे महात्मे सर्वत्र वेळोवेळी ईश्वराच्या इच्छेने अवतीर्ण होतात. ईश्वराच्या उपासनेचा, भक्तीमार्गाचा त्यांच्याकडून प्रचार होत असतो. तो भक्तीमार्गाचा प्रसार याकरता आहे. मनुष्याची बुद्धी शुद्ध झाली पाहिजे. राष्ट्रकार्य असो, वैयक्तिक, सामुदायिक कार्य असो किंवा पारमार्थिक दृष्टीने स्वतःचे कोणते कार्य असो या कार्याला बुद्धीची शुद्धी ही अत्यंत आवश्यक आहे.

पांडवांना वनवासात जावे लागले. तरीसुद्धा त्यांनी संतांच्या आज्ञेप्रमाणे ईश्वराच्या आज्ञेप्रमाणे आपले कर्तव्यकर्म कधीही सोडले नाही. वनवासात राहूनसुद्धा पांडवांनी तीर्थयात्रा केल्या. ऋषीमंडळी त्यावेळी त्यांच्या बरोबर असायची. पायाने तीर्थयात्रा करायचे. ते जरी राजे असले तरी वनवासात त्यांची जायची सोय वगैरे काही नाही. सर्व भारतभर त्यांनी भ्रमण करून तीर्थयात्रा केल्या. मातृदेवोभव, पितृदेवोभव, आचार्यदेवोभव, अतिथीदेवोभव ह्या शास्त्राच्या आज्ञाच आहेत. उपासना करण्याकरता कुठल्यातरी क्षेत्रातच जाऊन राहिले म्हणजेच उपासना होते असे नाही. घरापासून उपासना आहे. पुंडलिकाने मातापित्यांची

उपासना केल्याचे आपण ऐकतो. इतरही तसे लोक असतील नाही असे नाही. ईश्वर बुद्धीदाता आहे. कर्म करवून घेणारा परमात्मा समर्थ आहे. कुठे कुठे मातृभक्त, पितृभक्त पुष्कळ असतील. आम्ही वाटेल तितके पैसे देतो पण मातापितरांना वृद्धाश्रमात ठेवून घेतो असे म्हणणारेही आहेत. पण त्यांची सेवा करणारेही असतील. नाही असे नाही. 'बुद्धि कर्मानुसारीणी' असा सिद्धांत शास्त्र सांगते. ह्या ज्या उपासना सांगितल्या आहेत त्या बुद्धि शुद्ध झाल्याशिवाय कशा होतील? मातापित्यांची देव मानून पूजा करणे म्हणजे देवाबद्दल अनादर आहे असे नाही. त्याचा अर्थ तो नास्तिक आहे असे नाही.

भगवत् गीतेच्या दहाव्या अध्यायात विभूती सांगितल्या आहेत. ज्या पदार्थात भगवंताचा विशेषरूपाने अविर्भाव झालेला आहे त्या विभूती. भगवंताचा विशेष अविर्भाव. त्या विभूतींनाच ईश्वर समजून उपासना करावी. त्याप्रमाणे माता, पिता,आचार्य, अतिथी वगैरे विभूती आहेत. त्या रुपाच्या ठिकाणी ईश्वरभाव धारण करून उपासना होऊ शकते. ती शास्त्रसंमत आहे. निश्चित व शुद्ध बुद्धीने त्यांची उपासना करणारे जे आहेत त्यांना फल मिळते. ईश्वर साक्षात्कार आपोआप घरी बसून होतो आहे ना!

## पुंडलिकाचे भेटी परब्रह्म आले गा।

नामदेवांनी वर्णन केलेले आहे. ज्यांना ईश्वर साक्षात्कार झालाय त्यांनी पुंडलिकाला ईश्वर साक्षात्कार झाल्याचे सांगितले आहे. ईश्वराला न पाहाणाऱ्याने सांगितलेले नाहीये. पण पांडुरंग आले तरीसुद्धा पुंडलिकाने त्यांना 'थांबा' सांगितले. माझ्या देवाची पूजा चाललेली आहे. माझी पूजा झाल्यावर मी बोलायला मोकळा



होईन. आत्ता माझी पूजा चालली आहे. हे प्रत्यक्षात सर्वेश्वर परब्रह्माला सांगितले आहे. ही बुद्धि निर्दोष झाल्याशिवाय एका विशिष्ट ध्येयाच्या ठिकाणी स्थिर होऊ शकत नाही. बुद्धीमध्ये अनेक दोष निर्माण होतात, अज्ञान आहे, अश्रद्धा आहे. बुद्धीचे कितीतरी दोष असू शकतात. ते दोष दूर करण्याकरता कर्ममार्ग आहे, भक्तीमार्ग आहे. भक्तीमार्ग हा जास्त सुलभ आहे म्हणतात. त्याच्यामध्ये कोणताही प्रतिबंध नाही. केवळ अंतःकरणाचीच आवश्यकता आहे. भक्तीमार्गात बाह्योपचारांची काही आवश्यकता नाही याचा अर्थ बाह्योपचार नसले तरी चालतील असा नाही. षोडषोपचार व्यवस्थित केले पाहिजेत नाही असे नाही. परंतु अंतःकरण जर प्रेममय असेल तर त्या केवळ प्रेममय अंतःकरणाने दिलेले कांहीही ईश्वर स्वीकारतो. सुदामजींनी प्रेममय अंतःकरणाने आणलेले पोहे भगवान् गोपालकृष्णांनी मागून घेतले. आणि "मी तृप्त झालो" असे सांगितले. तर या भक्तीमार्गाचा प्रसार सर्व संतांनी मुद्दाम केलेला आहे.

तानाजी मालुसरे मुलाच्या लग्नाचे आमंत्रण देण्यासाठी निघाले असताना महाराजांचा निरोप आला, कोंढाणा किल्ला सर करण्यासाठी तुम्हाला निघायची महाराजांची आज्ञा आहे. थांबले, लगेच थांबले. असं शक्य आहे का? याकरता बुद्धीची स्थिरता पाहिजे. युद्ध झाल्यानंतर लग्न करु. युद्धामध्ये काय निर्णय लागेल सांगता येते का? आपण जिवंत राहू किंवा नाही. जीविताचा संदेह ज्या कार्यामध्ये आहे त्या कार्याला जायचा निश्चय केलेला आहे. नंतर लग्न करु. पण नंतर आम्ही असलो तर ना! अगोदर लग्न आटोपून गेले तर काय हरकत आहे? नाही. ही बुद्धीची स्थिरता राष्ट्रकार्यालासुद्धा उपयोगी पडते आहे. हे करण्यापूर्वी तिकडे गेले तर ह्याचे काय होईल या संशयामध्ये

मन गुंतले तर राष्ट्रकार्य कसे होईल.

म्हणून बुद्धीची आवश्यकता प्रत्येक कार्यामध्ये आहे. बुद्धि सुधारण्याकरता ईश्वरभक्तीचा मार्ग संतांनी दाखवलेला आहे. सगळे आयुष्य संतांनी या कार्यात घालवलेले आहे. आधी केले मग सांगितले म्हणतात. मिळालेल्या सर्व द्रव्याचा विनियोग नारायण महाराज या (धर्म) कार्याकरता करीत होते. अखंड कार्य चालले होते. अनेक उत्सव होताहेत. असे विशेष जे उत्सव आहेत ते पुष्कळ झालेले आहेत. अशा रीतीने लोकांच्या बुद्धीमध्ये कांही तरी चांगले संस्कार निर्माण करावेत. आणि त्या संस्कारांनी संस्कृत झालेली बुद्धि कार्यकारी होते. ईश्वराचा साक्षात्कार होणं म्हणजे कांही सोपे काम नाहीये. ईश्वर दिसत नाही म्हणून आम्हाला मान्य नाही हे कोणीही म्हणेल. आंधळ्याचे डोके खांबावर आपटले. त्याला खांब काय करणार? आंधळा मनुष्य शंकरांना पाहू शकत नाही हा त्या शंकरांचा अपराध नाहीये. जो शंकरांच्या दर्शनाची योग्यता संपादन करेल त्याला शंकर दिसू शकतात. ही ईश्वर दर्शनाची योग्यता सर्वांना मिळाली पाहिजे ही तळमळ आहे. संतांच्या मनांत निश्चित ज्ञान आणि कळकळ असल्यामुळे आपल्या मानापमानाचा विचार न करता, निराश न होता उपदेशाचे कार्य त्यांच्याकडून होत असतं.

मोठी मोठी आक्रमणं आली. संस्कृती नामशेष करण्याचा प्रयत्न होऊनही ही भारतीय संस्कृती नामशेष न होता शिल्लक राहिलेली आहे. याचे कारण म्हणजे ईश्वराबद्दल भक्ती, प्रेम अंतःकरणामध्ये जागृत ठेवण्याचे कार्य ह्या साधू पुरुषांनी केलेले आहे. आणि त्यामुळे ही भारतीय संस्कृती अखंड राहिलेली आहे. अशा प्रकारचे संत पुरुष निर्माण होताहेत.

तर आज या जयंती उत्सवाच्या निमित्ताने सद्गुरूंचे स्मरण



आपण करायचे आहे. अधिकारी साधकांची महाराजांनी सांगितलेली उपासना नेहमी चालू असणारंच. महाराजांची संगती ज्यांना घडली त्यांना महाराजांची नेहमी आठवण येत असेल. पण अशा वेळेला विशेष रुपाने त्यांच्या चरित्राचे स्मरण करणं, त्यांचे मार्गदर्शन कसे झालेले आहे याचे स्मरण ठेवणे. त्याचप्रमाणे आपली बुद्धी, चित्त हे जास्तीत जास्त शुद्ध व्हावे म्हणून त्यांच्याजवळ प्रार्थना करायची आहे. ज्यांनी आपलं अंतःकरण निर्दोष बनिवलं, निर्दोष टिकिवलं याला महत्व आहे. दोष घालिवणं शक्य आहे पण दोष पुन्हा येणार नाहीत त्याची काय खात्री देता येईल? ते शक्य आहे का?

शांतीचे आपण वर्णन करतो. नाथमहाराजांची शांती. दत्तात्रेयांनी जे चोवीस गुरू केले त्यापैकी पहिला गुरू पृथ्वी आहे. शांतीकरता पृथ्वीला गुरू केले आहे. सर्व सहन करायचे ही शांती नुसती सांगून ऐकून कांही होत नाही. पैसे देऊन एका माणसाची नेमणूक नाथमहाराजांच्या अंगावर शंभर वेळा थुंकण्याकरता झाली होती. नाथांना राग आला तर आणखी पैसे मिळणार होते. राग येण्याकरता तो प्रयोग करतो आहे. पण तितक्या वेळेला नाथमहाराज स्नानाला गेले, हे आपण किती तरी वेळा वाचलेले आहे आणि ऐकलेले आहे. पण आमच्या मनांत राग केव्हां येतो आणि त्या रागाचा अतिरेक केव्हां होतो हे आम्हाला समजत नाही. राग अनावर होऊ नये एवढे तरी जपा म्हणतात भगवान्. राग येऊ नये हे फार कठीण आहे. काम क्रोध उत्पन्नच होत नाहीत ही फार लांबची गोष्ट आहे. संत सर्वत्र अशाप्रकारे सतत निर्दोष राहू शकतात. त्यांच्या चित्तामध्ये नारायणाचे नाम अखंड असल्याने त्यांच्या मनांत दोष येऊच शकत नाहीत. " विषय तो त्यांचा झाला नारायण "

म्हणतात. त्या चित्ताला, बुद्धीला दुसरा विषय नाही. भगवान् नारायणच नेहमी चित्तात असल्यामुळे झालेले दोष जातात आणि नविन दोष उत्पन्न होणेच शक्य नाही. ही योजना ज्यांनी करून ठेवली अखंड नामस्मरण करून, त्या साधुपुरूषांचे चिंतन आपण करायचे आहे. या निमित्ताने आपल्या चित्तात किती दोष आहेत, आपला राग किती गेला, किती राहिला, किती वाढला हा सर्व जमाखर्च केला पाहिजे. रोजच्या रोज साधुसंतांच्या चरित्राचाही विचार करायचा आणि आपल्याही एकंदर चित्ताचे निरीक्षण करायचे. संतांच्या चित्ताचे निरीक्षण करायचे कारण त्यांच्या चित्तामध्ये कोणचेही दोष दिसत नाहीत. कामक्रोधादिक दोष उत्पन्न होण्याची परिस्थिती असतानाही ते उत्पन्न होत नाहीत. म्हणजे इतका त्यांचा ताबा त्यांच्या चित्तावर आहे. आणि आमचा आमच्या चित्तावर बिलकुल नाही. आमचे चित्त केव्हां विकारांच्या आधीन होते याचा नेम नाही. होऊ दे. कामक्रोधाचे सगळे आवेश होऊ देत. ही सगळी कार्य लगेच होऊन जातात.

आमचे चरित्र आणि संतांचे चरित्र यांचे निरीक्षण याकरता करायचे आहे. त्यांच्या चित्तामध्ये त्यांनी विकार उत्पन्न होऊ दिले नाहीत. विकार उत्पन्न होण्याची परिस्थिती असताना त्यांच्या चित्तात विकार उत्पन्न होत नाहीत. आणि आम्ही मात्र काल्पनिक काहीतरी परिस्थिती घेऊन विकारी चित्त बनवतो. आणि अशांती निर्माण करतो, आमच्याही आणि सगळ्यांच्याही. हे काय आहे काय? याकरता संतांच्या चरित्राचे चिंतन करायला योगसूत्रकारांनीही मुद्दाम सांगितले आहे. चित्त स्थिर करण्याचे अनेक उपाय त्यांनी दाखिवलेले आहेत.

प्राणायाम हा एक मोठा उपाय आहे. त्यात त्यांनी आणखी एक उपाय सांगितला आहे-



**वितरागविषयं वा चित्तम् ।**

मनातली इच्छा संपली की क्रोध, लोभ वगैरे सगळे संपले. असे निर्विकार ज्यांचे चित्त झाले आहे अशा महात्म्याच्या चरित्राचे वाचन, मनन हे अखंड करावे म्हणतात. त्यामुळे आपले चित्त स्थिर होते. प्राणायाम, योगाभ्यास वगैरे सगळ्यांना शक्य नाही. त्यासाठी अगोदर आहार विहारावर नियंत्रण सांगितले आहे. योगाभ्यास करणाऱ्याने अर्धे जेवावे म्हणतात. सरकारची कदाचित परवानगी मिळेल. ते म्हणतील, बरंय, धान्य बिन्य कमी आहे त्यामुळे तुमच्या योगाभ्यास करण्यास आमची परवानगी आहे. पण ते अर्धपोटी राहिले पाहिजेत ना! राहाता आले पाहिजे ना!

आहार अर्धा भाग, पाणी चतुर्थांश आणि वायू चतुर्थांश ही प्राथमिक भूमिका आहे. आणि मग इथून नंतर सात्विक आहार कोणचा, तामसी आहार कोणचा हा सगळा विचार आहे. सात्विक आहारामध्ये रसनेंद्रियाला आणखी विशेष वाव नाहीये. या सगळ्या गोष्टी योगाभ्यास करणाऱ्या सगळ्यांना पाळणे शक्य आहे काय? आहारातच तो सापडतो. रोज नविन नविन पदार्थ खायला मिळायची इच्छा करतो. तिथे योगाभ्यास कुठला होणार?
योगाभ्यासाने, प्राणायामाने चित्त स्थिर होते. प्राण स्थिर झाला की चित्त स्थिर होते. चित्त स्थिर झाले की मन स्थिर होते. मन स्थिर झाले की प्राण स्थिर होतो. हे एकमेकांवर अवलंबून आहेत. मनाच्या स्थैर्याला आणखी उपाय म्हणजे-

**वीतरागविषयं वा चित्तम् ।**

हे मुद्दाम स्वतंत्र सूत्राने सांगितले आहे. असे जे वीतराग सर्वत्र आहेत त्यांच्या चरित्राचे जर आपण चिंतन करायला

लागलो तर आपले चित्तही स्थिर होते. त्यांच्या चरित्राच्या अभ्यासाने आपल्या विकारांचे उपशमन होते, चित्त शांत होते. हा एक स्वतंत्र उपाय शास्त्रकारांनी सांगितला आहे.

## सत्कर्मयोगे वय घालवावे ।

सांगतात समर्थ. सत्कर्म निरंतर करायचे आहे पण या सत्कर्माचरणात येणारी विघ्नं दूर करण्याकरता कोणाचे तरी मार्गदर्शन जरुरी आहे. तो मार्गदर्शन करणारा महात्मा समर्थ पाहिजे. त्याची संगती आपल्याला घडली तर उत्तम धर्माचरण घडू शकते. आणि त्या महात्म्यांची संगती मिळवण्याकरता ईश्वराची उपासना आवश्यक आहे. ईश्वराचा प्रसाद झाल्याशिवाय संतांची भेट होत नाही. ईश्वर साक्षात्कार संपन्न महात्मे, जीवाचा उद्धार करण्याचे पूर्ण सामर्थ्य ज्यांच्याकडे आहे अशा महात्म्यांची संगती ही ईश्वर कृपेनेच होते. यासाठी ईश्वराची उपासनाही आवश्यक आहे. सर्व संतांनी याचाच प्रसार सर्वत्र केलेला आहे.

सद्गुरू नारायण महाराजांनी यावज्जीव हे कार्य केले. स्वतः करून दाखविलेले आहे. कितीतरी शास्त्रीय, वेदोक्त मोठ्या मोठ्या कर्मांचे अनुष्ठान झालेले आहे. मुख्यतः दत्तात्रेयांच्या भक्तीमार्गाचा प्रसार व्हावा, सर्वांनी आत्मकल्याण करून घ्यावे अशी त्यांची तळमळ आहे. काही अनुष्ठानात आम्ही बेटाचे वैभव जाऊन पाहिले आहे. त्यावेळी ज्यांनी ज्यांनी हे पाहिले असेल त्यांना ते माहीत असेल. म्हणून अशा संतांचे नित्य स्मरण आपल्याला घडावे प्रत्यक्ष ज्ञानेश्वर महाराज किंवा तुकाराम महाराज यांची संगती शक्य आहे का आम्हाला? त्यांचे ग्रंथ आहेत. ग्रंथरुपाने त्यांची संगती मिळू शकते. प्रत्यक्ष ज्ञानेश्वरांचे



दर्शन घेणारी मंडळी आजही आहेत. एकशे आठ वेळा ज्ञानेश्वरी वाचणारे, ज्ञानेश्वर महाराजांचा दृष्टांत झालेले लोक आजही आहेत. तशी तळमळ उत्पन्न झाल्यावर त्यांचेही दर्शन होते. त्यांची वैचारिक संगती घेऊन त्यांच्या मार्गदर्शनाप्रमाणे वागण्याचा प्रयत्न करायचा. वस्तुतः संतांचे कार्य सर्वत्र एकच आहे. ह्या संताचे निराळे, त्या संताचे कमी, ह्यांचे जास्ती असे कांही नाही. भगवंतांनीसुध्दा,'मी सांगतो म्हणून तू असा वाग' असे अर्जुनाला सांगितलेले नाही. ' शास्त्र प्रमाण आहे. शास्त्राचा विचार करून योग्य अयोग्य शास्त्राचा विचार करून योग्य अयोग्य ठरीव. नुसते तुझ्या बुद्धीने ठरवू नको. शास्त्र काय आहे हे समजून घे, त्यावर नीट विचार कर आणि मग योग्य तो निर्णय घे.' श्रीकृष्णांनी स्वतःचे (माझे) ऐक असे अर्जुनाला सांगितले नाही. तेच संतही सांगताहेत.

त्यांचे मार्ग विविध असले तरी जीवांचे प्रकारही अनेक आहेत. त्यांना उपयोगी पडणारे मार्ग त्यांनी दाखिवलेले आहेत. त्या मार्गांचा विचार करून त्या मार्गाने जाण्याचा प्रयत्न आपण केला पाहिजे. तशी बुद्धि आपल्याला सद्गुरु नारायण महाराज, दत्तात्रेय प्रभू यांनी द्यावी आणि मानव जन्मामध्ये हा बुद्धिविकास व्हावा. बुद्धीची शुद्धी दुसऱ्या कोणत्याही जन्मामध्ये करता येणे शक्य नाही. उत्कर्ष करून घ्यायचा आहे. उन्नती किंवा अवनती ह्या दोन्हीही मानव जन्मामध्ये करून घेता येतात. पशुपक्षाच्या जन्मात पापपुण्याचा संबंध नाही. वाघाने पुष्कळ लोकांना खाल्ले किंवा पुष्कळ जनावरे मारली म्हणजे कांही त्याला पाप लागले असे म्हणता येत नाही. त्याचा जन्म पापयोनीमध्येच आहे. त्यावेळेला पापही नाही, पुण्यही नाही. याच जन्मामध्ये आपल्या कर्तृत्वाने, ईश्वर प्रसादाने, सद्गुरुंच्या प्रसादाने आपल्याला वाटेल

तेवढी उन्नती करून घेता येते. ' नर करणी करे सो नर का नारायण बन जाये' म्हणतात. नारायण स्वरुप होता येते.

म्हणून अशा या दुर्लभ मानव जन्मामध्ये महाराजांच्या कृपेने, ईश्वराच्या कृपेने सन्मार्गदर्शन घडावे, आपल्या हातून उत्तम साधनाभ्यास व्हावा, आपली बुद्धि निर्दोष व्हावी. तीच बुद्धि आपली पुढच्या जन्मात आपल्या बरोबर येणारी आहे. अर्थात् ह्या जन्मात ती निर्दोष बनिवली तर पुढच्या जन्मामध्ये जास्ती जास्ती आपली प्रगती होणे शक्य आहे. एवढीच प्रार्थना महाराजांच्या चरणी करून ही वाङमय सेवा त्यांच्या चरणी अर्पण केलेली आहे. सर्व मंडळींनी पुण्यासारख्या ठिकाणी हा मोठा उत्सव केला, त्यांना महाराजांचे स्मरण घडले त्यात मलाही ही सेवा करण्याची संधी दिल्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करतो.

**अवधूत चिंतन श्रीगुरुदेवदत्त।।**



# सततं कीर्तयंतो मांम...

**अलीकडे** कीर्तनाचा अभ्यास करण्याकडे लोकांची प्रवृत्ती होत नाही. पूर्वी अनेक अधिकारी महात्मे कीर्तन करत. व्यवहारात राहूनही त्यांचा संस्कृत भाषेचा अभ्यास चांगला होता. ते एखादा श्लोक घेऊन त्यावर निरूपण करत. संस्कृतचे पाठांतर पुष्कळ असल्याने निरुपणालाही पुष्कळ सहाय्य होते ना! सिद्धांत माहिती असल्यानंतर अनेक सुभाषितांचे सहाय्य वर्णनात होते.

संस्कृत भाषेविषयी राजशासनही अलिप्त आहे. ते आपल्याला दिसतंच आहे. कीर्तनाचा अभ्यास वास्तविक लोकोपयोगी आहे. ' अर्थवान विद्या ' हाच सिद्धांत मनामध्ये धारण करण्याची प्रवृत्ती सध्याच्या काळात आहे. कीर्तन विद्या अर्थवान आहे की नाही हाही एक प्रश्नच आहे. कीर्तनापासूनही पुष्कळ अर्थप्राप्ती होऊ शकते. लोकांचा विश्वास, अनुराग निर्माण झाला म्हणजे संपत्ती आपोआप मिळते. ह्या दृष्टीने आणखी जास्तीत जास्त प्रवृत्ती कीर्तनाकडे का नाहीये याकरता कीर्तन बोर्डाची स्थापना करण्याची वेळ आलेली आहे. संत वाङमयाच्या सहाय्याने कीर्तनाचा अभ्यास करण्याकडे प्रवृत्ती का नाही? प्रवृत्ती झाल्याशिवाय अभ्यास कसा होणार?

**तया सत्कर्मी रति वाढो ।**

ज्ञानराजांनीही इच्छा केलेली आहे. सत्कर्म चांगलं आहे पण ते अत्यंत रुचीपूर्ण झालं पाहिजे. आवडीने धर्माचरण झालं पाहिजे. तर त्याचं फल मिळतं. तरीही या दृष्टीने इकडे प्रवृत्ती कमी कमी होत आहे. ही अर्थ विद्या असूनसुद्धा त्याला काही व्यासंग पाहिजे. अभ्यास पाहिजे. अभ्यासाशिवाय सिद्धी मिळणार कशी? एकदम काही वर्षं अभ्यास केला आणि प्रमाणपत्र मिळावे अशी एखाद्या कोर्स प्रमाणे ही कीर्तन विद्या नाही. संगीताची आवश्यकता आहे. संगीताचे ज्ञान पाहिजे. जो विषय मांडायचा त्याचे सखोल ज्ञान आणि तो सुसंगत मांडायची तयारी पाहिजे. असे पुष्कळ विषय या कीर्तन विद्येत अभ्यास करण्याकरता आहेत. पाठशक्ती पुष्कळ पाहिजे. संतांच्या ग्रंथांचे आलोचन व्हायला पाहिजे. मोरोपंतांच्या आर्या आहेत. अशा निरनिराळ्या आख्यानांचा संग्रह करून त्याचे मनन केले म्हणजे वाणीमध्येही सामर्थ्य उत्पन्न होते. आणि श्रोत्यांच्या मनावरतीही परिणाम होतो.

यादृष्टीने हा अभ्यास अखंड झाला पाहिजे. याचे प्रयोजन काय हा मोठा महत्वाचा विचार आहे. कीर्तन कशाकरता करायचे? तर भगवत् भक्ती प्रतिपादन करण्यासाठी. भक्तीचा प्रसार झाला पाहिजे. भगवत् भक्तीचा प्रसार झाला तर त्यात राष्ट्रभक्ती आणि इतर काही भक्ती असतील, त्यांचा प्रसार व त्यांचा अंतर्भाव आपोआप होतो आहे.

नामदेवांनी महाराष्ट्रातून उत्तरेत जाऊन भक्तीमार्गाचा प्रसार केला. तो कीर्तन संप्रदायाच्या माध्यमातूनच. दुसरे कांही नाही. त्या भक्तीच्या योगाने श्रोत्यांच्या चित्तवृत्ती शुद्ध झाल्या आहेत. सगळ्यांची सद्शील वृत्ती बनायला पुष्कळ उपयोग झाला आहे.



हे काही वेदांत श्रवणाने होणार नाहीये किंवा कथनाने होणार नाहीये.

भगवंताच्या कथा श्रवणाने, गुण समजून घेतले तर अंतःकरण निर्मल होते. अंतःकरण हे द्रवयुक्त होते म्हणतात. आणि धारावाहिकता त्याला प्राप्त होते. अशी धारावाहिक अंतःकरणाची एक अखंड वृत्ती आहे. ईश्वराचे अस्तित्व मान्य पाहिजे. ईश्वरशक्तीबद्दल पूर्ण श्रद्धा पाहिजे. अशा दृष्टीने त्या सर्वेश्वराबद्दल जी मनोवृत्ती आहे तिला मधुसूदन सरस्वती भक्ती असे म्हणतात.

आमच्या मनोवृत्ती पुष्कळ होतात. अनंत वृत्ती आहेत. कधी मन थांबलंय असं कधी होत नाही. परंतु ही जी भक्तीरुपी वृत्ती आहे ती प्रयत्नाने मिळेल असे नाहीये. ईश्वराजवळ,' मला भक्ती द्या,' असे मागावे लागते. भक्तीची इच्छा करणाऱ्या अशा भगवत् भक्तांच्या चित्तात पूर्ण वैराग्यही असायला लागते, नित्यानित्य विवेक पाहिजे. क्षेत्रक्षेत्रज्ञ विवेक पाहिजे. हेयोपादेय विवेक पाहिजे. अशी विवेकपूर्ण मनोवृत्ती जेव्हां भगवत् प्रेममय होऊन जाते आणि ते मुख्य प्रयोजन कीर्तन संस्थेचे आहे. संस्था असो किंवा व्यक्तिशः असो. ज्याच्या अंतःकरणामध्ये अशी भक्ती दृढ झालेली आहे त्याच्या वाणीचा प्रभाव श्रोत्यांच्या मनावर आपोआप होतो.

तुकाराम महाराजांच्या जवळ कुठे काय होते? संघटना कुठली आणि काय! परंतु त्यांनाही कांही ईश्वर प्रसाद मिळालेला होता. थोड्या अवधीत कार्य करून ते गेले. परंतु शिवाजी राजांनाही त्यांच्याकडे जावे लागले. भगवत् भक्तीचा प्रभाव त्यांनी दाखिवला. आणि ही भक्ती जर सर्वांच्या अंतःकरणात उत्पन्न करता आली तर संपूर्ण राष्ट्राचा उद्धार होऊ शकतो. त्याच्या करता प्रचाराची गरज नाही कांही नाही. आपोआप ते होते.

याप्रमाणे ईश्वरभक्ती हे कीर्तनाचे मुख्य प्रयोजन आहे. हे प्राचीन मोठमोठ्या शास्त्रज्ञांच्या ग्रंथावरून लक्षात येते. आणि ईश्वरभक्ती ज्या मानवाच्या अंतःकरणात उत्पन्न झाली तो समष्टि ईश्वररुपच बनून जातो. त्यामुळे त्याला निर्भयता प्राप्त होते. अभयं सत्वसंशुद्धी ज्ञान— ही दैवी संपत्ती आपोआप त्याला प्राप्त होते. आणि दैवी संपत्ती प्राप्त करून घेतलेल्या वक्त्याच्या वाणीत किती सामर्थ्य आहे हे आपल्याला प्राचीन शास्त्रज्ञांच्या उदाहरणावरुन पहायला मिळते. संत महात्म्यांच्या उदाहरणावरुन पहायला मिळते. आपण नुसते पाठ केले तरी किती समाधान मिळते. " एक तरी ओवी अनुभवावी" या अवस्थेपर्यंत जे जाऊन पोहोचलेले आहेत त्यांना किती समाधान मिळत असेल! याकरता संस्कृत भाषेचा अभ्यास पाहिजे. संस्कृत ग्रंथावरून आपल्याला बऱ्याच गोष्टी समजून येतात. त्याचप्रमाणे संतमहात्म्यांनी सांगितलेल्या सिध्दांतांचा अभ्यास झाला पाहिजे. म्हणजे कीर्तनकाराला फार अभ्यास करावा लागतो. संगीताचे ज्ञान तर आवश्यक आहेच आहे परंतु त्या ज्ञानाबरोबर संतवाङ्मयाचाही अभ्यास झाला असला पाहिजे. स्मरण शक्ती पाहिजे. पाठांतर शक्ती पाहिजे. उत्तम प्रतिभा शक्ती असली की त्याचे कार्य सहज घडून जाते.

'लोक जमवणे' हा लोकसंग्रह शब्दाचा अर्थ नसून कुमार्गाला जाणाऱ्या लोकांना कुमार्गापासून परावृत्त करणे, सन्मार्गाला लावणे हा लोकसंग्रह शब्दाचा अर्थ आहे. आणि हा लोकसंग्रह फक्त ईश्वरकृपेनेच करता येणे शक्य आहे.

याठिकाणी आता ही संस्था स्थापन झालेली आहे. या संस्थेचा उद्देश अध्यक्ष महोदयांनी सांगितला आहे. संस्कृत भाषेचाही अभ्यास ते आपल्या आपल्या बुद्धीने करतील. कीर्तनकाराची



योग्यता त्याप्रमाणे जास्ती जास्ती वाढत जावी, यादृष्टीने प्रयत्न व्हावा. समाजामध्ये केवळ अज्ञानीच लोक असतात अशी समजूत करून घेऊन उपयोग नाही. चांगले, उत्तम विचार करणारे लोकही समाजात आहेत. आणि मोठ्या मोठ्या पंतप्रधान किंवा राष्ट्रपतीपदापर्यंत पोहोचणाऱ्यांनासुद्धा याची जरुरी आहे. भारतीयांच्या मनामध्ये ईश्वराबद्दल आस्तिक्य बुद्धी राजकारणात पडले तरी आहे आणि ती आस्तिक्य बुद्धी निर्माण करून जास्ती वाढवण्याचा प्रयत्न सर्व संत महात्म्यांनी केलेला आहे.

**किंबहुना सर्व सुखी।**
**पूर्ण होऊनी तिही लोकी।**
**भजिजो आदि पुरुषी।**
**अखंडित।**

त्या आदि पुरुषाचे भजन सर्वांनी करावे म्हणजे अंतःकरणशुध्दि होईल. दुरित गेलं पाहिजे. दुरित दूर करण्याचे काम राजशासनही करु शकणार नाही. त्यातूनही कांही मार्ग निघतात. चाललंय. या करता सर्वांच्या चित्तामध्ये ईश्वरभक्ती उत्पन्न झाली पाहिजे. म्हणजे एक उत्तम कीर्तनकार ज्या ज्या ठिकाणी जाईल त्या त्या ठिकाणी श्रोत्यांच्या मनामध्ये भगवत् भक्ती निर्माण करील. त्याकरता कीर्तनकार दैवी संपत्तीयुक्त पाहिजे. त्याच्याजवळ उत्तम भाषाज्ञान पाहिजे. वक्तृत्व पाहिजे. संगीत ज्ञान पाहिजे. लोकांना ईश्वरपरायण बनविण्याची शक्ती पाहिजे. समर्थांनी कीर्तनाबद्दल बरेच विचार लिहून ठेवले आहेत.

कांही तरी उद्दिष्ट डोळ्यापुढे ठेवून ही संस्था स्थापन झाली आहे. इतर प्रांतातही भाषा वेगळी असली तरी कीर्तन हा

प्रकार असेल. ही जरी अखिल भारतीय कीर्तन संस्था असली तरी इतर प्रांतात कीर्तनकार कसे आहेत, कीर्तन कसे होते याचाही विचार करावा लागेल. कर्नाटकामध्येसुध्दा उत्तमोत्तम कीर्तनकार होऊन गेले.

बऱ्याच वर्षांपूर्वी धारवाड जिल्ह्यातील मुळगुंद गांवी उत्तम कीर्तनकार होऊन गेले. त्यांना पुष्कळ पदं मिळाली होती. त्या भागामध्ये कीर्तन करायला जात होते. त्यांच्या कीर्तनात ते तुकाराम महाराज, नामदेव महाराजांचे अभंग सांगत. ते अभंग घेऊन कानडीमध्ये निरूपण करीत असत. तर ही भाषावार प्रांतरचना झाल्यामुळे हे जरासे बदलून गेले आहे. प्रांताभिमान, भाषाभिमान विलक्षण वाढलेला आहे. सध्याचे कीर्तनकार कसे आहेत कोणाला ठाऊक ! ते तुकाराम महाराज, नामदेव महाराजांचे अभंग घेऊ शकतात की नाही कोणाला ठाऊक !

'बहुरत्ना वसुंधरा' म्हणतात. या सर्वांची संघटना करणे हे मोठे काम आहे. ईश्वराचे अधिष्ठान मान्य करून त्याप्रमाणे प्रयत्नशील राहाणे एवढेच आपले कर्तव्य आहे. ईश्वराच्या कृपेने त्या प्रयत्नाला सहज यश मिळते. तेव्हां हे कार्य आजच्या या उत्सवात सुरु झाले आहे. सर्वही मंडळी त्याचा पूर्ण विचार करणारी आहेत. सांगोपांग विचार करणारी आहेत. आणि तो विचार करून सर्वांचीही प्रवृत्ती अधिकाधिक इकडे लागावी. आबालवृध्दात सर्वांचीही प्रवृत्ती झाली पाहिजे. लहान वयामध्ये सुध्दा कीर्तन यायला पाहिजे. कीर्तन म्हणजे काय गायनच यायला पाहिजे असा अर्थ नाही. पण लहान वयातसुध्दा ते विचार बुद्धीमध्ये येऊ शकतात. ध्रुवासारखे महात्मे होऊन गेलेले आहेत. तेव्हां ईश्वराच्या प्रेरणेने बुद्धीमध्ये काय होईल सांगता येत नाही. परंतु जर हे संस्कार असले आणि त्या संस्कारांचा लाभ



लहानपणापासून मिळत गेला तर पुढच्या काळामध्ये उत्तम प्रकाराने त्याची बुद्धी सुसंस्कृत होईल. त्याप्रमाणे उत्तम ज्ञानसंपन्न होऊन सर्व लोकांचे समाधान करण्याची शक्ती त्याच्या वाणीमध्ये आपोआप प्राप्त होईल. या संस्थेच्याद्वारा सर्व समाजाचा बुद्धी विकास व्हावा, बुद्धी शुद्ध व्हावी, भौतिक विकास असेल. बौद्धिक विकास मुख्य आहे. भौतिक विकासावर किती बाजूंनी आक्रमण होण्याची भीती आहे हे आपण रोज वाचतो. बौद्धिक विकास जास्तीत जास्त करण्याकडे संतांचे लक्ष आहे. शास्त्रज्ञ पुरुषांनी बौद्धिक विकासाकडे जास्त लक्ष दिले आहे. तो बौद्धिक विकास करण्याकरता ही कीर्तनसंस्था अत्यंत उपयुक्त आहे.

'सकाळ' संपादकांनीही कीर्तनाबद्दल पूर्वी चांगले लेख लिहिले आहेत. लोकमान्य(टिळक) म्हणत,' मी राजकारणात पडलो नसतो तर कीर्तनकार झालो असतो. म्हणजे ही संस्था सर्वांनाच उपयुक्त वाटणारी अशा प्रकारची आहे. पण तिचा तसा अभ्यास झाला पाहिजे. आपली प्रवृत्ती तशी भक्तीप्रधान झाली पाहिजे. ईश्वराचे अधिष्ठान आपल्या चित्तामध्ये आहे असा विश्वास निर्माण झाल्याशिवाय लोकांना काय सांगणार ? केवळ शब्द प्रपंचाचा उपयोग नाही. म्हणून हा सगळाही विचार करून बुद्धीचा सर्वांगीण विकास झाला पाहिजे. वाणीचाही विचार झाला पाहिजे. आचरणही त्याप्रमाणे व्यवस्थित असले पाहिजे. म्हणजे या सर्वांचाही परिणाम श्रोत्यांच्याही मनावर झाल्याशिवाय राहात नाही. अशा दृष्टीने अनेक प्रकारची प्रयोजनं तयार करणं त्याचप्रमाणे साधन विचार वगैरे सर्व करून सर्वही प्रांतामध्ये असणारे जे महात्मे आहेच त्यांचेही सहाय्य मिळवणं हे मोठं काम आहे. संस्था करायची म्हणजे त्याला संकुचित राहून उपयोगी नाही. निराश होऊन उपयोगी नाही. 'अशक्य ' असं

म्हणायचं नाही.

आमच्या भारतीय संस्कृतीमध्ये आशावाद मुख्य आहे. निराशा नाहीये. तेव्हां या दृष्टीने सिद्धी प्राप्त होण्याकरता उत्साहसंपन्न राहून ईश्वराची कृपा असावी अशी प्रार्थना करून हे कार्य सुरु झालेले आहे. या कार्याला भगवान् मंगलमूर्तींनी पूर्ण यश द्यावं. सर्वही कार्य करणारी मंडळी त्यांना सहाय्य करणारी मंडळी या सर्वांच्याही बुद्धीला प्रेरणा करणारी शक्ती म्हणजे ईश्वर. त्याला सिध्दीबुध्दिपति म्हणतात ना! अंतःकरणामध्ये प्रेरणा करणारी आणि कार्यसिध्दी करणारी शक्तीही तीच आहे. त्याकरता भगवान् मंगलमूर्तींच्या चरणाजवळ एवढीच प्रार्थना आहे की सर्वांनी उत्साहाने, सद्‌बुद्धीने, सद्‌हेतूने स्थापन केलेली ही जी संस्था आहे त्या संस्थेचा सर्वांगीण विकास होऊन सर्वही समाजाचे बुद्धीशुद्धीद्वारा कल्याण व्हावे.

**।। मंगलमूर्ती मोरया ।।**



# नामस्मरणाचे महत्त्व

**ईश्वराची** उपासना भारतवर्षामध्ये वेदशास्त्र परंपरेने अनादि कालापासून चालू आहे. शुक्राचार्य, नारदांसारखी मोठी मोठी ज्ञानी मंडळी संसारमुक्त होऊन भगवंताची भक्ती करतात. आणि लोकांनाही तसाच उपदेश करतात. व्यास महर्षींनी ईश्वराची लीला वर्णन करण्याकरता भागवत ग्रंथाची रचना केलेली आहे. भगवंताची लीला काय आहे हे भागवतामध्ये सांगितलेले आहे.

संपूर्ण विश्व निर्माण करणं, त्याचं संरक्षण करणं, त्यानंतर पुन्हा संहार करणं, हे कार्य चालू आहे. त्यावरून ईश्वरशक्तीची कल्पना लोकांना यावी. त्यांच्या मनांतला स्वतःबद्दलचा अहंकार दूर व्हावा हा त्यांचा उद्देश आहे. ईश्वराच्या अनंत गुणांचे वर्णन करून त्यांनी प्रसार केलेला आहे. तर ही उपासना, भक्ती परंपरा भारतवर्षामध्ये प्रधान आहे, मुख्य आहे. ज्ञानी मंडळी ही कमी असतात.

**अनेक जन्म संसिद्धः ततो यांतिम् परांगतीम् ।।**

भगवान सांगताहेत.

वैराग्य, विवेक पाहिजे. श्रवण, मनन, निदिध्यासन वगैरे सगळं घडून नंतर मग ज्ञान उत्पन्न होणार. तोपर्यंत आपल्या मनाची, बुद्धीची योग्यताही वाढली पाहिजे. ज्ञान योग्यता वाढायला पाहिजे. त्याकरता ईश्वरभक्ती हा मार्ग सर्वही संतांनी लोकांपुढे ठेवला आहे.

एकंदर जीवांचे तीन वर्ग त्यांनी केले आहेत. तीन प्रकृती. सात्विक प्रकृतीला दैवी प्रकृती म्हणतात. राजस प्रकृती, तामस प्रकृती, यांना असुरी किंवा राक्षसी प्रकृती असेही म्हणतात. भगवत् गीतेच्या सोळाव्या अध्यायामध्ये दैवी संपत्ती आणि असुरी संपत्ती अशा दोनच प्रकारांचा उल्लेख आहे.

नवव्या अध्यायामध्ये त्यांनी तीन प्रकार सांगितले आहेत. असुरी प्रकृती, राक्षसी प्रकृती, आणि दैवी प्रकृती.

**मोघाशा मोघकर्मणोः मोघज्ञानाविचेतसः**
**राक्षसीमासुरीं चैव प्रकृतिं मोहिनीं श्रिताः ।**

हे अगोदर सांगितले. राक्षसी आणि असुरी प्रकृतीमध्ये सापडलेले जे जीवात्मे आहेत ते प्रयत्न करतात. परंतु त्यांचे प्रयत्न हे निष्फल होतात. असं भगवान् स्वतःच सांगतात. असुरांच्या, दैत्यांच्या पुष्कळ कथा पुराणामध्ये व्यास महर्षींनी सांगितल्या आहेत. दैवी प्रकृतीचे जे राजे लोक झाले किंवा देव झाले त्यांच्याही कथा आहेत.

सृष्टी निर्माण करीत असताना जीवांच्या कर्माप्रमाणे अनेक स्थानं ईश्वराने सृष्टीमध्ये निर्माण केली. देवांच्याकरता स्वर्गलोक हे स्थान आहे. भूलोक किंवा मनुष्यलोक हा मानवांच्याकरता आहे. असुर किंवा दैत्यांना राहाण्याकरता पातालापैकी रसातल



हा लोक आहे. स्वर्गलोकाप्रमाणे सर्व सुखसाधनं, सुखसमृद्धी तिथे आहे. काही कमी नाही.परंतु दैत्यांची प्रकृतीच अशी आहे की त्यांना वाटते आपल्याला स्वर्गलोकामध्ये जाऊन का राहाता येऊ नये? दैत्यांना स्वतःचे स्थान आहेच. ईश्वराने दिलेले आहे. पण त्या स्वतःच्या स्थानात असूनसुद्धा आणखी नवीन स्थान पाहिजे अशी एक प्रकारची त्यांची वृत्ती आहे. ईश्वराने जे सगळे लोक निर्माण केले आहेत, त्या स्थानामध्ये कोणचा कोणचा जीव कसाकसा राहू शकतो हेही सांगितले आहे. यज्ञयागादिक पुण्यकर्माचे अनुष्ठान करून त्याला स्वर्गलोकात जाता येते. मग तो मानव असो किंवा इतर कोणीही जीव असो त्या जीवाने जर अशाप्रकारचे कर्मानुष्ठान केले तर तो स्वर्गलोकामध्ये जाऊन राहू शकतो. कमी जास्ती प्रकार आहेत. ज्ञानाकडे प्रवृत्ती होण्याकरता त्या सर्व लोकांचे वर्णनही केलेले आहे.

स्वर्गलोक श्रेष्ठ असे जर मनाला वाटले तर तो प्राप्त करून घेण्याकरता योगयागादिक कर्मामध्येच मनुष्य गुंतून राहील. ज्ञानाचा विचार तो कधी करणार नाही. ईश्वर भक्तीकडे त्याचे लक्ष जाणार नाही. म्हणून शास्त्रकारांनी स्वर्गलोक कसा आहे याचे वर्णनही केले आहे. एक तपस्वी पुरुष मनांत कोणतीही इच्छा न धरता उत्तम अनुष्ठान ईश्वराच्या आज्ञेप्रमाणे सारखे करत होता. इंद्राने आपला दूत त्याच्याकडे पाठवला. त्या दूताने येऊन नमस्कार करून सांगितले," महाराज, आपल्याला स्वर्गलोकामध्ये इंद्राने बोलावले आहे. मी मुद्दाम आपल्याला नेण्याकरता आलेलो आहे." त्या तपस्वी पुरुषाने विचारले, "बाबा, तुझा स्वर्गलोक एकंदर कसा आहे, काय काय तिथे परिस्थिती आहे हे सांग बघू."

तो दूत म्हणाला,"स्वर्गलोकात किती सुख आहे. तिथे दुःखाचा

संबंध नाही. आणि मनामध्ये इच्छा झाल्याबरोबर सुख प्राप्त होते. सुखाची साधनं प्राप्त होतात." असे पुष्कळ वर्णन केले. त्या तपस्वी पुरुषानं सांगितले," बाबा, हे तुझे सगळे भाषण बरोबर आहे. पण तिथे काही दोष असले तर मला सांग. स्वर्गलोक झाला म्हणून काय झालं तिथेही दोष असतीलच की! सगळीकडे दोष आहेत."

तो दूत म्हणाला," तुमच्या मनुष्य लोकांप्रमाणेच तिथे सगळी स्थिती आहे. पुण्यकर्म झाल्यानंतर स्वर्गलोकामध्ये जाता येते. पण तिथेही उच्चनीचपणा आहे. पुण्यकर्मातसुद्धा कमीजास्तीपणा आहे. सामान्य यज्ञ करणं, अश्वमेधासारखे यज्ञ करणं. राजसूययज्ञासारखे यज्ञ करणं. ज्यांनी मोठे मोठे यज्ञ केलेत असे जीवात्मे तिथे श्रेष्ठ ठरतात. त्याठिकाणीसुद्धा श्रेष्ठ कनिष्ठ भाव आहे. कमी पुण्य असणाऱ्यांना सुख मिळतं पण त्यांचा दर्जा कमी मानला जातो. जशी इथे स्थिती आहे तशीच तिथे आहे. आणि दुसरी गोष्ट म्हणजे पुण्य जितके संपादन केले असेल तितका वेळच स्वर्गामध्ये राहाता येते. पुण्य संपले की लगेच खाली यावे लागते. तिथे कायम वास्तव्य नाही करता येत."

हे त्या तपस्वी पुरुषानं ऐकून घेतले आणि दूताला सांगितले," इंद्राला माझा नमस्कार सांग मला असल्या स्वर्गलोकात यायची इच्छा नाही.

## क्षीणे पुण्ये मर्त्यलोकेविशंति ।

पांच वर्षं झाल्यावर आपलं स्थान सोडावं लागतं की नाही इथं? निवडून आलं तरीसुद्धा! जास्ती राहाता येत नाही.



पुन्हा हवं तर निवडणुकीला उभा रहा. काय हवं ते कर. तेसुद्धा सध्या ठरलेला काळ मिळत नाही. एक वर्षभर टिकलं तर ठीक आहे नाही तर मुदत पूर्ण होण्यापूर्वीही पद सोडावे लागते. तशीच तिथे स्थिती आहे. पुण्य संपलं की झालं. मग काय तिथं येऊन उपयोग? "

त्या तपस्वी पुरुषांची दैवी प्रकृती आहे. ईश्वराची उपासना करायची. ईश्वराची कृपा संपादन करायची. मनांत अनेक प्रकारच्या इच्छा, वासना बाळगायच्या, त्या वाढवायच्या, त्या पूर्ण होण्याकरता दैवी, व्यावहारिक प्रयत्न करायचे. आणि त्या प्रयत्नाने मिळालेले सुखसुद्धा कायमचे मिळत नाही! मग काय काय करायचं, असलं सुखही आम्हाला नको आणि सुखाची साधनंही नकोत.जे पूर्ण सुख आहे, ज्या सुखामध्ये आणखी मर्यादा नाहीये, कमी जास्तपणा नाही ते हवंय. स्वर्गलोकामध्ये असणाऱ्या सुखामध्ये कमीजास्तपणा आहेच की. श्रीमंत माणसाचा बंगला मोठा असतो. त्याच्या बंगल्यातील सुखसामुग्री उत्तम प्रकारची असते. सामान्य मनुष्य असेल तर झोपडपट्टीत राहातो. त्याच्यापेक्षा थोडा मध्यम असेल एखादा. ही स्थिती सुखामध्ये, सुखाच्या साधनांमध्ये, इथे आहे त्याप्रमाणे स्वर्गलोकातही आहे. देव ज्या ठिकाणी राहातात त्या ठिकाणी अशीच अवस्था आहे. एकमेकांबद्दल स्पर्धा आहे. हा मोठा की तो मोठा, माझ्यापेक्षा त्याला जास्ती सुख आहे वगैरे इथे जशी स्पर्धा आहे तशीच तिथेसुद्धा स्पर्धा आहेच. जास्ती सुख भोगणारा देवात्मा जो असेल त्याच्याबद्दल इतर देवांना असूया वाटते.

मग तो तपस्वी महात्मा म्हणाला," मला हे असले सुखही नको आणि ती सुखाची साधनंही नको." कोणचे सुख पाहिजे हे समजत नाही. आणि ती सुखरूपी फलं सर्वांच्या समोर मांडली

आहेत, व्यास महर्षींनी. कोणच्या लोकामध्ये काय सुख असतं, परतंत्रता किती असते, स्वातंत्र्य किती असतं, काय असतं. देवेंद्रालासुद्धा आणखी जागा खाली करावी लागते ना! देव ज्याप्रमाणे प्रयत्न करतात तसे दैत्यसुद्धा प्रयत्न करणारे आहेत. तपश्चर्या तेही करतात. आणि तपश्चर्या करून ईश्वराचा वर मिळिवतात. आणि देवेंद्राला आणि देवांना घालवून देऊन स्वर्गाचे राज्य घेऊन आपणच तिथे जाऊन बसतात. अशीही परिस्थिती येते. देव आणि दैत्यांचे भांडण अखंड चालू आहे.

तैत्तिरिय उपनिषदामध्ये आनंदाचे वर्णन केलेले आहे. राजाच्या आनंदापासून आनंदाचे वर्णन केले आहे. सम्राट राजाचा आनंद त्यांनी पहिला गृहीत धरला. मनुष्यामध्ये अत्यंत श्रेष्ठ दर्जाचे सुख म्हणजे राजाचे आहे. त्याच्या तोंडून जो शब्द येईल त्याप्रमाणे घडून येते ना ! राष्ट्रपती जो हुकूम देईल त्याप्रमाणे सगळं घडतं की नाही! उच्च सत्ता ज्याला मिळालेली आहे त्याच्या हुकूमाप्रमाणे सगळे घडून येते. सगळ्या सुखसोयी त्याला असतात. कालमर्यादा आहे. काल कमी आहे हा एक मोठा दोष आहे. पण तो दोष सगळ्याच सुखात आहे. अमुक कालपर्यंतच सुख मिळेल. त्याच्या पुढे कोणाला इथे राहाता येणार नाही, असं असू नये. आणि आपल्या इच्छेप्रमाणे पारतंत्र्य असू नये. स्वातंत्र्य पाहिजे. ही सुखाची मुख्य व्याख्या सांगताना तैत्तिरिय उपनिषदामध्ये त्यांनी सांगितले एकापेक्षा शंभर पटीने जास्ती अशी पुष्कळ सुखं, आनंद आहेत.

आणि त्याच्या एका बाजूला ज्याच्या मनामध्ये कांहीही वासनाच नाहीये असा अकाम, श्रोत्रीय महात्मा आहे. त्याच्या मनांत कांहीही इच्छा नाही. ही स्थितप्रज्ञाची भूमिका आहे. भगवत् गीतेच्या दुसऱ्या अध्यायाच्या शेवटी भगवंतांनी ती भूमिका सांगितली



आहे. ते सांगतात् अशा महात्म्याच्या मनांत कोणतीही इच्छा, वासना राहिलेली नाही. हे सगळे आनंद त्याच्या जवळ आहेत. राजाचा आनंद आहे, देवांचा आनंद आहे, गंधर्वांचा आनंद आहे, ब्रह्मदेवांचा आनंद आहे. त्याच्या मनांत कसली इच्छाच नाही. निर्वासन अंतःकरण त्याचे झालेले आहे. मी आनंदरुप आहे. ज्याला आनंदरुप आत्मस्वरुप समजलेले आहे त्याला सगळे आनंद प्राप्त होतात. हे त्या तपस्वी पुरुषाला पाहिजे होते. सर्व आनंदांचा अंतर्भाव ज्याच्यामध्ये झालेला आहे असा आनंद त्याला मिळवायचा होता. स्वर्गातला आनंद नको होता.

तर दैवी प्रकृती याला म्हणतात. सात्विक प्रकृती. सांख्यशास्त्राप्रमाणे सर्व पदार्थ त्रिगुणात्मक आहेत. सत्व-रज-तम हे जे तीन गुण किंवा तीन पदार्थ आहेत या तीन पदार्थांपासून सर्व सृष्टी झालेली आहे असा शास्त्रसिध्दांत आहे. त्याच्या थोडे अलीकडे आले म्हणजे पंचमहाभूतांपासून सृष्टी झाली असे आपण समजतो. पण पंचमहाभूतेसुध्दा यांच्यापासूनच उत्पन्न झाली आहेत. भौतिक सृष्टी पंचमहाभूतांपासून उत्पन्न झाली आहे. चेतन असो अचेतन असो. मनुष्य असो देव असो दैत्य असो सर्वांचे देह पंचमहाभूतांपासून उत्पन्न होतात. परंतु त्या देहामध्येसुद्धा आणखी कितीतरी कमी जास्तीपणा आहे ना! एका सारखा एक कोणीच नसतो. दिसत नाही आपल्याला. तर ही जी दैवी प्रकृती ज्याच्याजवळ आहे त्याच्या प्रकृतीतील रजोगुण व तमोगुण जवळ जवळ संपल्यासारखे आहेत म्हणजे कार्य करु शकत नाहीत. सत्वगुणांचे प्राबल्य त्याच्या मनामध्ये आहे. सात्विक विचारच जास्ती मनामध्ये येतात. त्याच्या मनामध्ये रजोगुणाचे किंवा तमोगुणाचे विचार येतच नाहीत कधी.

रजोगुणाचे, तमोगुणाचे कार्य कसे आहे ते सांगितले आहे

त्यांनी. योग्य अयोग्य विचार नेहमी करणं, नेहमी ज्ञान विचारप्रधान वृत्ती असणं, आणि त्याप्रमाणे वागणं हे शुद्ध सत्वगुणांचे लक्षण आहे. रजोगुणाने सारख्या क्रिया होताहेत. जगातले सर्वही पदार्थ रजोगुणामुळे क्रियाशील आहेत असा एक सिद्धांत आहे. आधुनिक वैज्ञानिकांनाही तो मान्य आहे. सारखं कांहीतरी करायचे. आता ते योग्य असलं तर हरकत नाही पण त्रासही तितका होतो ना! व्याप तितका संताप म्हणतात. समर्थांनी,

**सत्कर्मयोगे वय घालवावे।**

अगोदर सांगितले. आपण वैयक्तिक उत्तम कर्म करायचे. चांगले वागायचे आणि

**सर्वांमुखी मंगल बोलवावे।**

हेही सांगितले. मनाप्रमाणे वागणं हे सत्कर्म नाही. शास्त्र हे ईश्वराची आज्ञा आहे. त्याप्रमाणे आपण वागलो तर आपलं कल्याण होणार आहे. धर्माचरणाने आपली उन्नती होणार आहे. पण केवळ आपली वैयक्तिक उन्नती झाली असली किंवा होत असली तरी आपल्याबरोबर इतरांनाही सहाय्य केले पाहिजे.

**एकमेका सहाय्य करु।**
**अवघे धरु सुपंथ।**

केवळ एकट्यानेच सन्मार्गाने जाण्यापेक्षा परस्परांना सहाय्य करून त्यांनाही आपल्या बरोबर सुपंथाला नेणे याच्यामध्ये विशेष समाधान



आहे. शांती आहे. मार्गदर्शन आहे. तोही उपदेश समर्थांनी केला आणि त्याप्रमाणे आचरण करून दाखिवला.

प्रयत्नवाद! सात्विक कोणचे आचरण आहे, राजस आचरण कोणचे आहे, तामस आचरण कोणचे आहे. प्रत्येकाचे विभाग शास्त्रकारांनी सांगून दिलेले आहेत. त्यामध्ये सात्विक जे असेल त्याप्रमाणे आपण वागायचे. तो प्रयत्न आपण करायचा. हा एक निश्चय मनामध्ये बाळगून त्याप्रमाणे वागणारा जो आहे त्याला पुष्कळ अडचणी आहेत. प्रातःकाली उठलं पाहिजे. सूर्योदयाच्यापूर्वी उठले पाहिजे. ईश्वराचं, सत्पुरुषांचं ध्यान केलं पाहिजे. थंडीचे दिवस आहेत, थंडी पडलेली आहे. पहाटे उठवत नाही आपल्याला. पण अशा वेळेला शरीराच्या सुखाकडे लक्ष द्यायचे की ईश्वराच्या आज्ञेकडे लक्ष द्यायचे? हा मोठा प्रश्न आहे.

प्रातःस्नान करणं, ईश्वराची स्तुती करणं, पूजा करणं, वगैरे जे कांही धर्म सांगितले आहेत त्या सगळ्यांचे आचरण करायचे म्हणजे शरीराची आसक्ती कमी झाली पाहिजे.

ध्येय तर आपलं ठरलेलं आहे. सत्कर्म करायचं आहे. ईश्वराच्या आज्ञेप्रमाणे वागायचे आहे. जर शरीराची आसक्ती कमी झाली असेल तर असे वागता येते. नाही तर झोप संपणारच नाही. हे सगळे धर्माचरण शरीराची आसक्ती कमी झाली तरच होऊ शकते.

दैत्य लोकसुद्धा स्वर्गप्राप्तीच्या इच्छेने तपश्चर्या करतात. किती तरी दैत्यांनी उग्र तपश्चर्या केली, सृष्टीकर्त्या ब्रह्मदेवांपासून वर मागून घेतला. आणि मग देवांना घालवून देऊन स्वर्गात जाऊन बसले. हे कांही सत्कर्म होणार नाही. देवांची स्थाने निराळी, दैत्यांची स्थाने निराळी. ईश्वराने सगळी योजना व्यवस्थित केली आहे. देवांना त्यांच्या स्थानांतून घालवून देऊन त्यांचे

स्थान घ्यायचे हा कांही न्याय्यमार्ग नाही. परंतु करतात. तशी प्रवृत्ती होते. आपल्याला जागा असली तरीसुध्दा दुसऱ्यांची जागा घ्यायची हा काही न्याय्य मार्ग ठरणार नाही. परंतु करतात. तशी प्रवृत्ती होते. आपल्याला जागा असतानासुद्धा दुसऱ्याची जागा घ्यायची आणि त्याठिकाणी राहायचे. असं चाललेलंच आहे.

मनामध्ये अशा प्रकारच्या ज्या वृत्ती उत्पन्न होतात त्याही कमी झाल्या पाहिजेत. ह्या राजस, तामस, वृत्ती आहेत.

**कोणाही जीवाचा न घडो मत्सर।**
**वर्म हे सर्वेश्वर पूजनाचे।**

महात्मे सांगताहेत. आपण त्यातले थोडे घेतले तर काय बिघडले असा विचार करून एखादा जर वागू लागला तर तो सात्विक मार्ग ठरणार नाही. ईश्वराच्या सृष्टीमध्ये तो अन्याय आहे. आमच्यासारखे लोक म्हणतात,' दुसऱ्याचे द्रव्य जसा तो घेतो तसा मी घेतो, मला काय दोष आहे.' अशा वृत्तीने जर हे सुरु झाले तर द्रव्य मिळेल, सुख सोयी कदाचित वाढतीलही परंतु ईश्वराच्या कृपेचा हा मार्ग नाही. ईश्वराच्या कृपेने जे संपूर्ण सुख मिळवायचंय, त्या तपस्वी पुरुषाने सांगितल्याप्रमाणे, ते पूर्ण सुख अशा मार्गाने जाऊन मिळणार नाही. त्यालाही कांही मर्यादा आहेत. त्याच्या वरतीही दुसऱ्या कोणाचा डोळा असणार, दुसरा कांही तरी त्याला त्रास देणार, असे पुष्कळ प्रसंग उत्पन्न होतात. हे आपण पुष्कळ वाचतो, ऐकतो.

तर शुद्ध सात्विक वृत्ती ही आपली वाढावी, आपण ईश्वराचं सात्विक भक्त व्हावं. अशी इच्छा असणारे जे आहेत ते या



मार्गाने जात नाहीत.

व्यास महर्षींनी कौरव पांडवांचा इतिहास महाभारतामध्ये लिहून ठेवला आहे. चांगलं कर्म केलं म्हणजे काय होतं, वाईट कर्म केलं म्हणजे काय होतं, हे दाखविण्याकरताच त्यांनी हा ग्रंथ लिहिला. धर्मराज आणि पांडव कसे वागले आणि दुर्योधन व कौरव कसे वागले! वास्तविक पांडवांच्यावर फार कठिण प्रसंग आलेले आहेत. पण शेवटपर्यंत त्यांनी धर्माचरण सोडलेले नाही. मात्र वनवास भोगावा लागला. अगोदर पांडवांनी साम्राज्य मिळिवले. धर्मराजाला राजसूय यज्ञ करायचा होता. त्याने गोपालकृष्णांना निमंत्रण केले. ते आल्यावर धर्मराजाने प्रार्थना केली," महाराज, मला राजसूय यज्ञ करून ब्रह्मलोकामध्ये जाऊन राहायचे आहे." म्हणजे पुनरावृत्ती नाही पुन्हा जन्म मरण नाही. ब्रह्मदेवाच्या जवळ राहायला मिळेल.

श्रीकृष्ण म्हणाले," राजसूय यज्ञ वाटेल त्याला करता येणार नाही. तो नुसत्या पैशाने होणारा नाही. संपूर्ण पृथ्वी आधी जिंकावी लागेल. सगळ्या राजांना मांडलिक करावे लागेल. सम्राट राजालाच राजसूय यज्ञ करायचा अधिकार आहे. म्हणजे शौर्यही पाहिजे." म्हणून चार बंधू चारी दिशांना त्यांनी पाठिवले. बहुतेक सगळे राजे जिंकले. कारण यज्ञाला पुष्कळ संपत्ती लागणार ना! पैशाशिवाय कसं होणार? सगळे राजे अनुकूल झाले. पुष्कळ संपत्ती मिळाली. एक जरासंध तेवढा अजिंक्य राहिला. मग गोपालकृष्णांनी भीम, अर्जुनाला बरोबर घेतले. जरासंधाकडे जाऊन द्वंद्व युध्दाची भिक्षा मागायला आम्ही आलोत म्हणून सांगितले. भीम आणि जरासंधाचे युध्द झाले पण भीम दमला शेवटी. तो म्हणाला,' मीं कांही याला मारु शकत नाही.' मग श्रीकृष्णांनी त्याला स्वतःची शक्ती दिली.

ज्याला शक्तीपात म्हणतात ती शक्ती त्यांनी दिली. आणि त्याच्याकडून जरासंधाला मारिवले. म्हणजे बहुतेक सगळे राजे लोक पांडवांचे मांडलिक झाले. सम्राट राजा झाल्यानंतर धर्मराजाने राजसूय यज्ञ केला. म्हणजे साम्राज्य पांडवांचे होते. त्यांनी मिळिवलेले होते. पण दुर्योधनाने द्यूतक्रिडा करण्याचे निमित्त काढले. शकुनी त्यांना सहाय्य करणारा होता. कपटाने हळूहळू सगळं राज्य जिंकून घेतलं, शस्त्र वगैरे सगळं हरण केलं, हा एक मोठाच प्रसंग आहे ना!

श्रीकृष्णांच्या नेतृत्वाखाली राजसूय यज्ञ उत्तम प्रकाराने पार पडला. पण प्रत्यक्ष फल काय मिळालं? राजसूय यज्ञ पार पडल्याबरोबर द्यूतक्रिडा झाली आणि त्यात हरल्यामुळे पांडवांना वनवासात जावे लागले. आणि दुर्योधनाला यज्ञ वगैरे काही न करता आयते साम्राज्य मिळाले. त्यामुळे आपल्या मनामध्ये संशय निर्माण होतो. दौपदीच्या मनामध्येही संशय निर्माण झाला. धर्मराजाला तिने वारंवार म्हणावं," धर्माचरणाचे फल आहे की नाही, असा मला प्रश्न पडला आहे. ईश्वर आहे की नाही जगात? कारण धर्माचरण करून, ईश्वराची भक्ती करून तुमच्या नशिबी शेवटी वनवासच आला. आणि यातले काहीच न करता दुर्योधनाला आयते सगळे साम्राज्य मिळाले. म्हणजे धर्माचे फल काही मिळत नाही असं म्हणायचं? ईश्वर नाहीये असं दिसतंय." असं दौपदीलासुध्दा वाटलं.

पण धर्मराजांचा आपल्या ध्येयावर पक्का विश्वास होता. तो म्हणाला," मी काही साम्राज्याकरता धर्माचरण करीत नाही. अमुक एक फलं मिळावं, सत्ता मिळावी म्हणून मी धर्माचरण करीतच नाही. ईश्वराची आज्ञा म्हणून मी धर्माचरण करतो. ज्याने जन्माला घातलंय त्याच्या आज्ञेचे पालन करणं एवढेच



माझे कर्तव्य आहे. अमुक एक फल मिळावं म्हणून धर्माचरण करणं म्हणजे धर्माचा व्यापार केल्यासारखा होईल. धर्माचे वाणिज्य होईल." तो खरा धर्मशील होता. त्याने असे उत्तर देऊन द्रौपदीचे समाधान केले.

पण प्रत्यक्ष काय झालं की पांडवांचे राज्य गेलं, राजसूय यज्ञ करूनसुद्धा! ही जी स्थिती प्राप्त झाली त्यामुळे कदाचित संदेह निर्माण होण्याचा संभव आहे. म्हणून अधर्माने का वागू नये, असं लोक विचारतातही. आणि नुसतं विचारुन थांबत नाहीत तर तसे अधर्माने वागायला लागतातही. अहो, त्याने इतका पैसा मिळविला(अवैध मार्गाने), एवढा मोठा बंगला बांधला आणि आम्ही कशाला धर्म धर्म करीत बसलो? असं म्हणतात. पण धर्म अधर्माच्या विचाराला शास्त्र प्रमाण आहे. आपण आपल्या बुद्धीने तो विचार करु शकत नाही. कोणचं धर्माचरण फुकट गेलेले आहे, किंवा काय, कोणच्या धर्माचे फल केव्हां मिळणार आहे हे सगळे जाणणारा तो सर्वज्ञ परमेश्वर आहे. त्याच्यावर ज्यांचा विश्वास आहे, त्याची उपासना करणारे जे आहेत ते आपल्या मार्गापासून केव्हांही बाजूला होत नाहीत.

म्हणून देव दैत्यांचे संबंध जे व्यास महर्षीनी इतिहासामध्ये, पुराणामध्ये वर्णन केलेले आहेत त्यात हेच दाखवले आहे; कसं वागावं आणि कसं वागू नये! संपूर्ण रामायण वाल्मिकी ऋषींनी लिहिले. रामचंद्रांच्या वाट्याला तरी काय आले? राज्याभिषेकाच्या वेळेलाच अरण्यामध्ये जाण्याची पाळी आली. प्रत्यक्ष आईनेच सांगितले. सावत्र आई असेल, पण सांगितले. पित्यालासुद्धा प्रतिबंध करता आला नाही. त्याला संकटातच पकडलं. रामचंद्र, बंधू आणि पत्नीबरोबर वनवासात गेले. चौदा वर्ष पूर्ण करून आले असते. तिथे त्या रावणाने त्यांची स्त्री पळवून नेली.

म्हणजे अरण्यातसुद्धा सुखाने राहायला मिळाले नाही. आता त्यांचा प्रयत्नही मोठा. ते ईश्वरावतार होते हा एक विषय वेगळा आहे. परंतु मानवाने कसे वागावे हे शिकवण्याकरता रामचंद्रांचा अवतार आहे. त्यांना मर्यादा पुरुषोत्तम म्हणतात. सगळ्या धर्ममर्यादा त्यांनी पालन करुन दाखिवल्या. भरत काय, लक्ष्मण काय, सीतादेवी काय सगळेच एकापेक्षा एक धर्मशील आहेत. त्यामुळे मुख्य नेता जो आहे रामचंद्र त्याचे धर्माचरण पाहून सर्वांच्या मनावर त्याचा परिणाम झाला.

तसं इकडेही महाभारतामध्ये वर्णन करतानासुद्धा धर्मराजाच्या धर्माचरणाला विशेष प्राधान्य दिले आहे. धर्मानेच संरक्षण होते. हा सिध्दांत मांडण्याकरता महाभारत लिहिले आहे. तेव्हां धर्मराजानेही आपले ध्येय शेवटपर्यंत सोडले नाही. रामचंद्रानीही आपले ध्येय सोडले नाही. न्याय्य मार्गाने प्रयत्न केले. परस्त्री हरण करणारा जो आहे त्याला शासन झालेच पाहिजे, असा त्यांचा निश्चय होता. पहायला गेलं तर ते फक्त दोघेच बंधू होते. जवळ काही सैन्य नाही काही नाही. रावण केवढा बलाढ्य होता. सुवर्णाची लंका नगरी आहे. कोट्यावधी राक्षस त्याचे नोकर आहेत. इंद्राचासुद्धा पराजय करणारा मुलगा आहे. किती त्याच्याकडं सामुग्री आहे. पण रामचंद्रांजवळ निराशा नाहीये. भारतवर्षामध्ये निराशेला जागा नाहीये. शास्त्रदृष्टीने धर्माधर्माचा विचार झाला तरच आशावादी दृष्टी उत्पन्न होते. आम्ही आत्तापर्यंत जे वागलेले आहोत त्याचे फल आत्ता जरी मिळाले नाही तरी पुढं मिळणार आहे. कारण देह म्हणजे मी नाहीये. देहात राहाणारा मी या ठिकाणी बदलून आलेला आहे. इथून माझी बदली होणार आहे. इथे केलेल्या कर्मामुळेच बदली झाली की नाही ! चांगला वागला म्हणूनच प्रमोशन मिळालं. हे प्रमोशन जे मिळणार आहे, या



देहातून चांगल्या देहात जायचे आहे. चांगल्या परिस्थितीत जायचे आहे हे केव्हां सांगता येईल? देहापेक्षा मी वेगळा आहे, मी अजरामर आहे हा मोठा सिद्धांत भगवत् गीतेच्या आरंभाला भगवंतांनी सांगितला आहे.

**अंतवंत इमे देहा नित्यस्योक्ताः शरीरिणः।**
**अनाशिनोऽप्रमेयस्य तस्माद्युध्यस्व भारत।।**

तुझे पुण्यकर्म, तुझे सत्कर्म तू केले पाहिजेस. शरीराकडे लक्ष देऊ नकोस. शरीर केव्हां तरी पडणार आहे. पण शरीरात तू आलेला आहेस, तू नित्य आहेस. अजरामर आहेस. कीर्ती मिळव. चांगली उन्नती करुन घे.

अर्जुनाला उपदेश करताना भगवंतांनी हा सिध्दांत मुद्दाम सांगितला की देहाकडे लक्ष देऊन तू वागू नकोस. चांगलं वागायचं याचा अर्थ चांगले वागणारा आत्मा आहे. देह माध्यम आहे. त्या देहामध्ये राहून जो ईश्वराच्या आज्ञेने चांगले वागेल त्याला त्याचे निश्चित फल मिळेल. कारण फल देणारा सर्वशक्तीसंपन्न आहे. ईश्वर सर्वज्ञ आहे. तो फल देणारा आहे ही जर निष्ठा असेल आणि देहापेक्षा मी निराळा आहे हे जर कळले तर ज्ञानमार्गामध्ये जास्ती जास्ती उन्नती होत जाईल. (पूर्ण ब्रह्मज्ञानाला वेळ आहे) तर या मार्गाने आपल्याला जायचे आहे. ज्या आनंदामध्ये सर्व आनंद सामावलेले आहेत असा पूर्ण आनंद आपल्याला मिळाला पाहिजे, अशी इच्छा धारण करुन जो प्रयत्न करणारा आहे त्याला कदाचित सुख येतील दुःख येतील जातील. तिकडे तो लक्ष देत नाही. किती तरी शरीरं मिळाली आणि गेली. तर शरीरं बदलली तरी माझी बुद्धि, माझं

मन घेऊनच मी त्या शरीरात जाणार आहे. ते मन, ती बुद्धि जर मी चांगली बनवली असेल तर नवीन शरीरात गेलो तरी माझा तिथे हाच प्रयत्न राहील. आपल्या भारतीय वैदिक संस्कृतीमध्ये हा जो पुनर्जन्मवाद आहे त्यातच आशा आहे. नाहीतर जे पुनर्जन्म मानत नाहीत त्यांना जर विचारले," तुम्ही इतके कां करता, इतका पैसा कां मिळवता? दान धर्म कां करता? इतके ज्ञान कां मिळवता?" तर ते काय उत्तर देतील? तुमचे आयुष्य संपल्यावर हे सगळं केलेलं फुकटच गेलं की! कशा करता करायचं? आणि कांही न करता मिळालं असंही म्हणावं लागेल. एकदम श्रीमंत मनुष्य झाला किंवा गरीब कुटुंबात जन्माला आला, सारखी दुःखं येतात याचे काय कारण आहे? हे त्यांना, पुनर्जन्म न मानणाऱ्यांना सांगता येत नाही. नवीन जन्माला आलो शेवटी इथंच पडणार. पुढंही नाही आणि मागेही नाही. त्या बाकीच्या सगळ्या संस्कृती निराशा उत्पन्न करणाऱ्या आहेत. अशा प्रश्नांची उत्तरे देऊ शकत नाहीत. फक्त भारतीय संस्कृतीमध्येच याला उत्तर आहे. म्हणून अजरामर असलेल्या आत्म्याला आपली उन्नती करुन घेण्यासाठी भक्तीमार्ग, ज्ञानमार्ग, योगमार्ग वगैरे सांगितले आहेत.

योगमार्ग हे तर प्रयोगशास्त्र आहे. चांगदेव चौदाशे वर्ष जगले होते. जगता येतं. नास्तिक बुद्धीला प्रयत्नवाद मांडता येत नाही. योगशास्त्रामध्ये सांगितलेले सगळे प्रयोग खरे आहेत असं कोण सांगू शकेल? त्याप्रमाणे प्रयोग करणारा जो आहे, त्याच्यावर विश्वास ठेवणारा जो आहे तोच सांगू शकेल. यात कांही विकास नाही, परदेशातल्या लोकांनीच बुध्दि विकास साधला आहे, त्यांचा विज्ञानवाद केवढा आहे, आमच्याकडे तसे कांहीच नाही असे म्हटल्यावर निराशाच उत्पन्न होणार.



म्हणून चांगली बुद्धि विकसित करावी आणि त्या बुद्धीतून कामना, वासना सगळ्या नाहीशा झाल्या की पूर्ण आनंद आहे. हे ज्याला पटलेले आहे तो स्वर्गसुखाची इच्छा करणार नाही. त्या तपस्वी पुरुषाने इंद्राच्या दूताला परत पाठवून दिले. " मला स्वर्गात यायचे नाही. आमच्यात आणि तुमच्या स्वर्गलोकात काय अंतर आहे?" तर अशी इच्छा करुन अनेक जन्म आपण घेऊ शकतो. पुढचा जन्म म्हणजे नवीन देह मिळू शकेल. नवीन देहामध्ये मी पुन्हा प्रयत्न करु शकेन, माझ्या कल्याणाकरता, उन्नतीकरता. आशा मनामध्ये असल्यामुळे निराशा मनामध्ये बिलकुल नाही. असा प्रयत्न करणाऱ्यांना सहाय्य म्हणून ईश्वरभक्ती हे मोठे साधन शास्त्रकारांनी सांगितले आहे. ईश्वर पूर्ण सर्वेश्वर आहे. सर्व ज्ञान त्याला आहे. कोणी कोणी किती कर्मं केलीत, कोणाचे किती जन्म झालेत, हे सर्व तो जाणणारा आहे.

अर्जुनाची बुद्धि ही फक्त देहापुरती होती. पण श्रीकृष्णांची बुद्धि फक्त देहापुरती नव्हती. श्रीकृष्णांनी अर्जुनाला सांगितले," तुला हा जो मी योगाचा उपदेश करतो आहे हाच उपदेश मी पूर्वी सूर्यनारायणाला केलेला आहे.

**इमं विवस्वते योगं प्रोक्तवानहमव्ययम्।**
**विवस्वान्मनवे प्राह मनुरिक्ष्वाकवेऽब्रवीत।।**

अशी परंपरा आहे," अर्जुनाने विचारले," तू सूर्य नारायणाला उपदेश केला? तुझे आणि माझे वय बरोबरचे आहे. आणि सूर्य किती अनादिकालापासून आहे. त्याला तू उपदेश कसा करणार? त्यावेळी तू होतास कुठे?" हा त्याने श्रीकृष्णांचे शरीर पाहूनच प्रश्न केला. श्रीकृष्ण म्हणजे समोरचे शरीर आहे आणि अर्जुन

म्हणजेसुध्दा आपले शरीरच तो समजतोय. आपले आयुष्य मर्यादित आहे. मग तू सूर्याला उपदेश कसा करणार?

म्हणून त्याला श्रीकृष्णांनी उत्तर दिले

**बहुनि मेव्यतीतानि जन्मानि तव चार्जुन।**
**तान्यहं वेद सर्वाणि न त्वं वेत्थ परंतप।।**

अशी किती शरीरं गेली आहेत तुझी आणि माझी हे मला माहीत आहे. हे सगळं समजून मी तुला उपदेश करतो आहे. तुझं हित कोणतं आहे हे तुला सांगतोय. त्याप्रमाणे वागलास तू तर तुझं कल्याण आहे. ह्या देहाच्या मागे कांही नाही पुढे कांही(मागचे पुढचे जन्म नाहीत) हेच विचार मनांत आणलेस तर तुझे कल्याण होणार नाही. तुझ्या बुद्धीचा विचार बरोबर ठरणार नाही. हे मुद्दाम त्याला सांगितले.

तर भगवान् श्रीकृष्ण सर्वज्ञ आहेत. सर्व शक्तीसंपन्न आहेत. हे संतांना माहिती आहे. संतांनी जाणलेले आहे. म्हणून ईश्वराची भक्ती करायला ते सांगतात. परमार्थातही पुष्कळ प्रयत्न करावा लागतो. संसारामध्येच प्रयत्न आहे असे नाही. ईश्वराची कृपा संपादन करण्याकरता पुष्कळ प्रयत्न करावा लागतो. ध्रुवासारखे थोडे बहुत अपवाद आहेत. चार पांच महिन्यात त्याने ईश्वर साक्षात्कार करुन घेतला. त्याच्यामागे नारदांची, सद्‌गुरुंची शक्ती होती. त्यांची कृपा होती म्हणून ते झाले.

तर अशा प्रकारची एक शक्ति आहे जगामध्ये. जीवात्मासुध्दा अजरामर आहे. शरीरं बदलणारी आहेत. हे सगळे सिध्दांत त्यांनी भगवत् गीतेमध्ये मुद्दाम सांगितले आहेत. जीवात्म्याने धर्माचरण करावे. ईश्वराची भक्ती करावी. त्याच्या भक्तीने



साधनामार्गामध्ये येणारे प्रतिबंध सगळे दूर करुन घ्यावेत. पुन्हा आपलं आचरण चालू ठेवावे. प्रतिबंध पुष्कळ येतात. आपल्या मनाने आपण एखादी गोष्ट करायची ठरवली तरी शरीर ताब्यात पाहिजे. शरीर ताब्यात रहात नाही. ऋतुमानात बदल झाला म्हणजे प्रकृती बिघडू शकते. त्यामुळेही उपासनेमध्ये खंड पडतो. हे सगळे प्रतिबंध दूर करण्याकरता ईश्वराची उपासना सांगितली आहे.

आणखी" मी कोण आहे?" " देह म्हणजे मी आहे की देहापेक्षा मी वेगळा आहे" हे आपल्याला समजून येत नाही. विचार केला असता तेवढ्या पुरतं कळतं. "काय हो, काल होता बिचारा. आज गेला" त्याला पोहोचवायलाही आम्ही जातो. त्याला अग्नि संस्कार करतो. म्हणजे तो जो जळून जातो. तो कांही हा नाहीये. हे तेवढ्या पुरतं पटतं. पण पुन्हा घरी आलं म्हणजे स्वतःला देह समजूनच आमचे सगळे व्यवहार चालू असतात ना! देहापेक्षा मी वेगळा आहे अशी आमची बुध्दि टिकते का?

पण हाही एक मोठा महत्वाचा सिध्दांत आहे की जीवात्मा अजरामर आहे. त्याने जर प्रयत्न केला, ईश्वराची भक्ती केली तर ईश्वरही त्याला सहाय्य करतो. त्याच्या उपासनेतले प्रतिबंध दूर करतो. त्याच्या इच्छेप्रमाणे ईश्वर फल देतो. मानवाने इच्छा कोणची करायची हे ठरविण्याकरतासुध्दा ईश्वराची कृपा पाहिजे. नाही तर आपल्या समोर जे सुख दिसेल तेच मिळावेसे वाटते ना! मनाची चंचल स्थिती असेपर्यंत आपल्याला कांही ठरविता येत नाही. एकदा एक पक्ष आवडतो कांही दिवसांनी दुसरा पक्ष चांगला वाटला की हा पक्ष सोडून दुसऱ्या पक्षात जायचे. म्हणजे बुद्धि स्थिर कधीच नाहीये. त्या पक्षात गेला म्हणजे

विचारपूर्वक गेला असे नाही. त्या पक्षात कांही मतभेद झाले की पुन्हा पहिल्या पक्षात यायची इच्छा व्यक्त करुन परत यायचे. असंही चालतं जगात. म्हणजे मनाच्या, बुद्धीच्या या चंचलतेमुळे कोणचे सुख आपण घ्यायचे हे देखिल आपल्याला समजत नाही. म्हणून ज्यांनी आपल्या स्थिर बुध्दीनें ईश्वराची कृपा संपादन करुन घेतली आहे त्यांच्या मार्गदर्शनाप्रमाणे वागल्यानंतर आपल्याला कोणचे सुख पाहिजे हे समजते. मग त्या सुखाची साधनं कोणची हे समजून घेऊन त्या प्रमाणे आपला साधनाभ्यास सुरु होतो. हा मोठा मार्ग आहे ना!

डिग्री घेतली. एम.ए. आहे, नंतर पी.एच.डी आहे ५/५ ६/६ वर्ष घालवावी लागतात. अभ्यास संपत नाही. ज्ञान साधना संपत नाही. व्यावहारिक ज्ञानार्जन पूर्ण होत नाही, तिथे ईश्वर विषयक ज्ञानाचा अभ्यास कसा पूर्ण होईल? त्याकरता प्रयत्नशील राहाता आले पाहिजे. मी अजरामर आहे ही कल्पना (हा विचार) जर पक्का असेल तर मनुष्य प्रयत्नशील राहू शकतो. त्याकरता त्याला इतकं सांगितलं. ईश्वरही सर्व फल द्यायला समर्थ आहे. त्याला कालमर्यादा नाही आणि प्रयत्न करणारा जो जीवात्मा आहे त्यालाही कालमर्यादा नाही. अमुक एक कालानंतर तू नामशेष होणार आहेस असे नाही.

हे सगळे सिध्दांत सांगून ईश्वराची भक्ती करावी हे शास्त्रकारांनी मुद्दाम सांगितले आहे. आणि साधू, संतमहात्म्यांचा हाच प्रयत्न आहे. नोकरी मिळवण्याकरता ते उपाय सांगत नाहीत. त्यांच्या ग्रंथातून हेच सांगितले आहे की ईश्वराची कृपा संपादन करा. स्वधर्माचरण तुम्ही केलेत तर त्याची कृपा होऊन तुमच्या सर्व इच्छा पूर्ण होतील. असंच ते सांगतात. तेव्हां परमेश्वराच्या उपासनेचा मार्ग साधूसंतांनी स्वतः आचरण करुन



आम्हा भारतीयांच्या पुढे ठेवला आहे.

आता परदेशातील लोकांनासुद्धा हरे राम पंथाच्या साधू महात्म्यांच्या उपदेशाचा परिणाम होऊन इकडे यावेसे वाटू लागले आहे. कृष्णभक्तीचा प्रसार तिथे झाला आहे. भारतातील कृष्णभक्त जसे वागतात तसे आपण वागावे असे परदेशी लोकांना वाटू लागले आहे. आपला आहार चांगला ठेवावा असं त्यांनाही वाटू लागले आहे. केवळ अर्थ कामाने आपण सुखी होणार नाही. ईश्वर भक्तीने आपण सुखी होऊ हे त्यांना पटले आहे. म्हणून ते या भक्तीमार्गाकडे वळले आहेत.

आपली तर बुध्दि परंपरेने आलेली आहे. त्यामुळे भगवान् गणेशांची आराधना आपल्याकडे मुख्य सांगितली आहे. बुध्दीचे, मनाचे, इंद्रियांचे, प्राणाचे संरक्षण करणे हे गणेशांचे कार्य आहे. वेदांत शास्त्रामध्ये ५ ज्ञानेंद्रिय, ५कर्मेंद्रिय, ५ प्राणमन आणि बुध्दीला सूक्ष्म देह म्हणतात. हे सतरा पदार्थ या शरीरामध्ये बसलेले आहेत. शरीर हे बाहेरचे आवरण आहे. मोटारीच्या पुढे जे इंजिन असेल तेच मुख्य आहे ना! तसे या शरीरामध्ये ज्ञानेंद्रिय आहेत, कर्मेंद्रिय आहेत, प्राणवायू आहे. त्याचप्रमाणे मन आहे. बुध्दि आहे. ह्या सगळ्या तत्वांचे संरक्षण करणारी गणेश देवता आहे. गण म्हणजे सर्व इंद्रियं, प्राण, मन, बुध्दि या सर्वांचा पति म्हणजे परमात्मा गणेश आहे. त्यांचीही उपासना शास्त्रामध्ये सांगितली आहे.

एकाच ईश्वराने ही वेगळी वेगळी रुपे धारण केली आहेत. गणेश आहेत त्याचप्रमाणे विष्णू आहेत, शंकर आहेत. सूर्यनारायण आहेत. देवी आहे. अशी विविध रुपे धारण केली आहेत. गणेशांचेही अनेक अवतार आहेत. विष्णूंचे आहेत. सूर्याचे आहेत. देवीचे आहेत. ज्या रुपाबद्दल आपल्या मनांत प्रेम उत्पन्न झाले

असेल तिकडे त्याने आपले मन लावावे, स्थिर करावे आणि त्या माध्यमाने आपली उपासना करावी. भक्तीमार्गामध्ये आपल्याला शास्त्रकारांनी पुष्कळ स्वातंत्र्य दिलेले आहे. अमुक एक देवाचीच भक्ती केली पाहिजे असे नाही. भक्ती करा, असे सांगून भक्ती होत नसते. एखाद्या देवतेबद्दलच्या नैसर्गिक प्रेमानेच भक्ती घडू शकते. आणि त्याला शास्त्रकारांनी परवानगी दिलेली आहे. कर्ममार्गामध्ये ज्याच्या त्याच्या अधिकाराप्रमाणे कर्मं सांगितली आहेत. पण अमुक एक स्वरुपाचीच भक्ती केली पाहिजे असा मात्र आग्रह नाही. देवीची भक्ती करा, गणेशांची भक्ती करा. विष्णूंची करा, सर्वत्र एक ईश्वरतत्व आहे. या दृष्टीने भगवान् गणेशांची उपासना ही श्रेष्ठ मानली आहे.

अथर्वशीर्षामध्ये गणेशांचे संपूर्ण वर्णन केले आहे. ही ब्रह्मादिक रुपं त्यांनीच धारण केली आहेत. असेही त्या ठिकाणी सांगितले आहे. तर ही ईश्वराची उपासना, गणेशांची असो, विष्णूंची असो, कोणाचीही असो, ईश्वरतत्वाबद्दल आस्तिक्य बुद्धि धारण करुन उपासना झाली तर या जन्मामध्ये असलेले प्रतिबंध दूर होऊन पुढच्या जन्मामध्येसुध्दा उन्नतीचा मार्ग कायम राहाणार आहे. म्हणून ईश्वराची उपासना आपल्या व्यावहारिक कर्माला उपयोगी अशी आहे. त्यातही ईश्वर समर्थ आहे, सर्वज्ञ आहे, सर्व शक्तीसंपन्न आहे हे मानून आपली इच्छा त्याच्याजवळ निवेदन करुन सकामही पुष्कळ अनुष्ठानं करतात की! संपत्ती मिळावी, संतती मिळावी, सत्ता मिळावी याच्याकरताही अनुष्ठाने आहेत. शास्त्रकारांनी सांगितलीत ती करावी की नाहीत हा प्रश्न आहे. तेही मार्ग शास्त्रकारांनी सांगितले आहेत. जो सर्वज्ञ आहे त्याला शरण गेल्यावर आपल्या सगळ्या इच्छा पूर्ण होतात. म्हणून ईश्वराचे सहाय्य हे जीवाला अत्यंत आवश्यक आहे.



जीव परतंत्र आहे. जीवाकडे आपल्या इच्छेप्रमाणे करायचे सामर्थ्य नाहीये, हे आज आपण पहातो. मग एक मनुष्य असो किंवा लोकशाहीतील लोकांचा समूह असो. सध्या समूहराज्य आहे. समूहराज्य मिळाले तरी चाळीस वर्षात काय झाले? सगळे गरीब श्रीमंत झाले काय? किंवा बहुसंख्य जनतेची अन्न वस्त्र निवाऱ्याची चिंता मिटली का? प्रतिबंध अनेक असतील. प्रतिबंध नाहीत असे नाही. जीवाची शक्ती अल्प आहे हे यावरूनच कबूल करावे लागते.

अर्थात पूर्ण शक्ती ज्याच्याजवळ आहे, त्याला जर संतांनी शरण जायला सांगितले, तर ते अयोग्य आहे, असे कसे म्हणणार? म्हणून शास्त्रकारांनी, सर्व साधू संतमहात्म्यांनी शेवटी हेच सांगितलंय की परमेश्वराला विसरू नका.

## किंबहुना सर्वसुखी.....

ज्ञानेश्वर महाराजांनी ज्ञानेश्वरीच्या शेवटी हे देवाजवळ दान मागितले आहे. सर्वही सुखं जरी मिळाली तरी घ्या. संत, 'संसार सोडा' असे सांगत नाहीत. 'सगळी सुखं मिळवा.पण ईश्वराला विसरू नका. त्याचे अखंड स्मरण ठेवा. म्हणजे तुमची बुद्धी चांगली राहील' असे सांगतात.

रावणाने सगळी सुखं मिळवली पण शेवटी त्याची बुद्धि भ्रष्ट झाली. रामाची स्त्री आणण्यापर्यंत त्याची बुद्धि गेली. किती स्त्रिया त्याला होत्या! त्याच्या पट्टराणीने त्याला सांगितले,"सीता परस्त्री आहे तिला देऊन टाका. नाहीतर इंद्रजित किंवा कुंभकर्णाला सांगून मी नेऊन देते." बिभिषणाने तर विरोधच केला होता. त्यानेही सांगितले,"हे तुमचे चांगले कर्म नाही.

सीतेला परत देऊन टाका." इंद्रजित त्याचा मुलगा. इंद्रजितानेही सांगितले. पण रावणाची बुद्धि अहंकारामुळे भ्रष्ट झाली. कितीतरी दोष बुद्धीमध्ये उत्पन्न झाले.

संत म्हणतात, सगळी सुखं देवाजवळ मागा. 'दाता एक रघुनंदन.' तोच सगळं सुख देणारा आहे. मागितलेली सगळी सुखं तुम्हाला मिळाली तरी परमेश्वराचे भजन सोडू नका. कोणालाही ईश्वराचे विस्मरण होऊ नये. जर सर्व सुखं मिळाली तर अहंकार उत्पन्न होणार, सत्तेचा मद उत्पन्न होणार. आणि सत्तेचा मद उत्पन्न झाल्यावर ती सत्ता आपली कायम राहिली पाहिजे अशी प्रबल इच्छा उत्पन्न झाली तर विरोध करणारा जिवंत रहात नाही.आपल्या हातात सगळी सत्ता राहिली पाहिजे अशी इच्छा प्रबल झाल्यावर कित्येक हत्या होतात, कितीतरी वाईट कर्मं होतात. ती बुद्धि चांगली राहाण्याकरता ईश्वराचे भजन करा हे मुद्दाम ज्ञानेश्वर महाराजांनी सांगितले आहे. तेव्हां बुद्धी चांगली झाल्याशिवाय रामराज्य होणार नाही. रामराज्य रामराज्य नुसते म्हणून काय होणार? त्याकरता अशाप्रकारचे जे मार्ग आहेत ते अवलंबले पाहिजेत. स्वराज्य हे सुराज्य व्हायला पाहिजे असे सगळ्यांना वाटतंय. पण ते कसं होणार? कसं मिळवायचं? त्याकरता सर्व संतांनी घालून दिलेला मार्ग म्हणजे ईश्वराचे स्मरण करायचे. ते स्मरण राहाण्याकरता अशाप्रकारचे उत्सव करावे लागतात.

वास्तविक अखंड स्मरण राहिले पाहिजे. श्वासोच्छ्वास आपले ज्याप्रमाणे अखंड चालू आहे त्याप्रमाणे ईश्वराचे विस्मरण कधीही होऊन उपयोगी नाही. इतकी तन्मय अवस्था झाली पाहिजे. तेव्हां त्या ईश्वराचे नाम सतत घ्यावे, त्याचे सतत स्मरण करावे.



श्वासोच्छ्वास घ्यायला आपल्याला काय विचार करावा लागतो का? तसे ईश्वराचे नामस्मरण जर अखंड झाले तर ईश्वर कुठेही जवळ आहे. ईश्वर स्वतंत्र आहे. तो सर्वशक्तीसंपन्न आहे. त्याच्याकडे अर्ज केल्यावर तुमचा अर्ज आलाच नाही, मिळालाच नाही, अशी उत्तरे त्याच्याकडून मिळत नाहीत. आणि त्याला यायला वेळही लागत नाही. ह्या ईश्वरी शक्तीवरती त्यांचा पूर्ण विश्वास किंवा श्रद्धा ज्यांची आहे तेच ईश्वराची उपासना करून पूर्ण कृतार्थ होतात. जगाला उपदेश करतात. मार्गदर्शन करून जगाचा उद्धार करायला तेच महात्मे समर्थ होतात.

हा गणेशोत्सव मोरेश्वरांनी चालू केला आहे. त्यांच्या इच्छेप्रमाणे या कार्याच्या पहिल्या दिवशी ही थोडीशी वाङमय सेवा करण्याचा प्रसंग त्यांच्याच आणखी आत्मीयतेने, प्रेमामुळे आलेला आहे. याचे स्मरण ठेऊन त्यांच्याच कडून अशाप्रकारचे कार्य भगवान् गणेशांनी करून घ्यावे एवढीच प्रार्थना करून थांबतो.

**। मंगलमूर्ती मोरया ।**